नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

दिवाळी अंक-१९६३

अनुक्रमणिका

युगवाणी

दि
वा
ळी
विशेषांक

ऑक्टोबर
१९६३
★
मूल्य
१ रुपया

* या अंकात *

श्री. आनंद जोग श्री. कृ. मा. घटाटे

संपादकः- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

हे मासिक एम्. जी. सराफ यांनी नागपुर टाईम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर–१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

:: संपादक मंडळ
भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे

युगवाणी

संपादकः--श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १८] सप्टेंबर-ऑक्टोबर १९६३ [अंक ५-६

संपादकीय

वाङ्मय तप

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते

—गीता १७-१५

[(मनाला) उद्वेग न देणारे, सत्य, प्रिय व हितकारक, असे जे भाषण ते, आणि स्वाध्यायाचा म्हणजे स्वकर्माचा अभ्यास, यांस वाङ्मय (वाचिक) तप म्हणतात. —गीतारहस्य]

वर दिलेल्या गीता श्लोकात वाङ्मय म्हणजे वाणीसंबंधी तप द्विविध सांगितले आहे. सत्य, प्रिय, हितकर व अनुद्वेगकर असे वचन हा एक प्रकार व स्वाध्यायाचा अभ्यास हा दुसरा प्रकार. येथे दुसऱ्या प्रकाराचा विचार कर्तव्य नाही. पहिल्या प्रकाराचा थोडासा विचार, कांही हेतूने, करावासा वाटला म्हणून तो मांडीत आहे.

सत्य हे कटु असतं असं पुष्कळ वेळा म्हटलं जातं. 'अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता हि दुर्लभः' असं महाभारतात विदुराने दुर्योधनाला सांगितलं असून तो श्लोकहि सुभाषितरत्न पावला आहे व अनेकांना परिचित आहे. गीता श्लोकावर टीका करीत असताना वामन पंडितांनी तर वाङ्मयतपाच्या या व्याख्येनुसार

प्रपंचवार्ता' बोललीच जाऊ शकत नाही असं म्हणून 'आत्मचर्चेवाचून वाङमय-तपाचा उपाय सापडणार नाही' असा निर्वाळा दिला आहे. त्यांचा युक्तिवाद मार्मिक आहे. ते म्हणतात,

शत्रु मारावया येतो, । हे सांगतांची तो भितो, ।
न सांगतां घात होतो, । नाही म्हणतां लागतें असत्य, ।।
जो करितो अधर्म, । त्यास अप्रिय सांगणे धर्म, ।
प्रिय बोलतां, तें कुकर्म । नेणार नरका, तें हित नव्हे ।।

—य. दी. १७/१७८–१७९

म्हणून अध्यात्मपर अर्थ लावताना ते म्हणतात—

की संसारउद्वेगहर । अध्यात्म वाक्य तें अनुद्वेगकर,
तें सत्य, तें प्रिय, तें हितकर, । या वेगळा अर्थ लागेना ।।

लौकिकातील सत्य बोलणं या व्याख्येनुसार वाङमयतपात बसू शकणार नाही असा वामनपंडितांचा हा जो निर्वाळा आहे त्यात पुष्कळच तथ्य आहे हे मान्यच करावं लागेल, परंतु लौकिक सत्य भाषणहि लौकिकदृष्टीने हितकर असूनहि बोलणाऱ्याच्या वृत्तीनुसार व शब्दयोजनेनुसार प्रिय–अप्रिय, अनुद्वेगकर, उद्वेगकर असे द्विविध राहू शकते हे विचारा अंती मान्य व्हावे. प्रस्तुत लौकिक अर्थानेच वाङमयतपाचा थोडासा विचार कर्तव्य आहे.

उपरोक्त श्लोकाचे स्पष्टीकरण करताना श्रीज्ञानेश्वरांनी जे दृष्टांत दिले आहेत ते जसे 'अविवेकाची फेड करणाऱ्या' व 'आपले अनादित्व भेटविणाऱ्या' वाक्याला लागू आहेत तसेच लौकिक उपदेशवाक्याच्या बाबतीतहि उपयोगाला पडण्यासारखे आहेत. ते म्हणतात—

तरि लोहें आंगतुंक । न तोडितांचि कनक ।
केलें जैसें देख । परिसे तेणे ।। २१५ ।।
तैसें न दुखवितें जें । जवळिलां सुख निफजे ।
ऐसें साधुत्व देखिजे । बोलणां जिये ।। २१६ ।।

ते बोलणं न दुखविणारं असावं, जवळच्यांना–ऐकणाऱ्यांना सुख देणारं असावं. याला 'साधुत्व' असे विशेषण ज्ञानेश्वरांनी लाविले आहे. इतरत्र सुद्धा ज्ञानेश्वरांचा कटाक्ष वाणीच्या सौजन्यावर विशेष दिसतो. १६ व्या अध्यायात अपैशुन्याचं लक्षण स्पष्ट करताना ते म्हणतात—

तैसें आपुलेनि गुणें । पुढिलाचें उणें ।
फेडूनिया पाहाणें । तेयाकडे ।।१४८।।

वांचूनि न विंधिजे वर्मीं। नांतुडविजे कर्मीं।
न बोलाविजे नामीं। सदोषि तिंहि ॥१४९॥

दुसऱ्याच्या वर्मावर घाव घालण्याला लोक टपलेले असतात. शारीरिक व्यंग अथवा मानसिक दोष लक्षात घेऊन, नेमका त्याचा उल्लेख होईल अशा रीतीने हाक मारणे, अशीच 'नांवे ठेवणें', यात तर लोक पटाइतच असतात. अशी ठेवलेली नांवेच आज कित्येक आडनांवांच्या रूपाने लोकातील पिशुनवृत्तीची साक्ष देत विद्यमान आहेत. या लोकस्वभावाच्या पार्श्वभूमिवर अपैशुन्याचे वरील लक्षण ध्यानात घेतले तर त्याचे महत्व विशेष ठसण्यासारखे आहे. या अपैशुन्याचा, वाणीच्या सौजन्याचा समावेश वाङ्मयतपात करण्यालाहि हरकत असू नये.

वाङमयतपात 'सत्या'चा उल्लेख आलेला आहे. सत्य हे कटुच असणार असा सामान्यतः समज आहे. पुष्कळांना सत्य गोडपणानं सांगताच येत नाही. विदुराच्या वर उद्धृत केलेल्या वचनात दुर्लभ शब्द आहे अशक्य शब्द नाही. त्यावरून सत्यहि प्रिय होण्याचा संभव सूचित होतो. सत्य हे हितकर असतंच. ते प्रियहि होण्याला मुख्यतः वक्त्याची वाणीच कारणीभूत होते. ज्ञानेश्वरांनी तर सत्याचं स्वरूपच अशा तऱ्हेचं वर्णिलं आहे की 'प्रियपणा' हा त्याचा स्वभावच त्यांनी मानला आहे असं वाटतं. पुन्हा हा प्रियपणा फसवा अगर फसविण्यासाठीचा नव्हे.

किंबहुना प्रियपणें। कोण्हातें हि झांकउं नेणें।
यथार्थ तऱ्ही खुपणें। नाही कव्हणा ॥११९॥

× × ×

तैसें श्रवणसुखचतुर। परिणामौनि साचार।
बोलणे अविकार। सत्य येथे ॥ १२३ ॥

प्रिय असूनहि फसवं नव्हे, यथार्थ असूनहि खुपणारं नव्हे, ऐकण्याला गोड पण परिणामी सत्य आणि ऐकणाऱ्याच्या मनात द्वेषादि विकार उत्पन्न न करणारं असं हे सत्य आहे. सत्याचं हे रूप लक्षात घेतलं तर सत्यहि प्रिय असू शकतं व ते अनुद्वेगकारकपणे सांगता येतं हे ध्यानात येऊ शकेल.

आज वाङमयकारांचं लिखाण पाहिलं तर त्यापैकी किती जणांच्या लिखाणात या 'वङमयतपा'चा कितीसा प्रत्यय येतो हे ज्यांनी त्यांनी व वाचकांनीहि स्वतःशी पडताळून पहावं. वाणीचं सौजन्य, वाणीचा संयम, वाणीचं साधुत्व

तिचं मृदुत्व व माधुर्य या गुणांचं महत्वच कित्येकांच्या ध्यानात आलेलं दिसत नाही. वृत्तपत्रातील लिखाणाच्या बाबतीत तर बोलायलाच नको. तिथे तर सत्य बाजूलाच राहतं, कठोरता पुढे येते व कटुताच शिल्लक राहते. अगदी योगविद्ये-सारखा गंभीर, चित्तवृत्तींचा निरोध करण्याला सांगणारा, विषय जरी असला तरी त्यासंबंधीचे लिखाण 'अविकार' राहत नाही हा केवढा दैवदुर्विलास ! श्री. विनोबांनी अेके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे, मुद्दा खोडणे बाजूलाच राहून माणसा-लाच खोडून काढणे सुरू होते.

वाणीच्या सर्व उपासकांनी, दीपावलीच्या निमित्ताने, गतवर्षी वाणीचा उपयोग आपण कसा केला याचा आढावा घ्यावा व दुरुपयोग केल्याचे आढळून आल्यास, पुढे जाणीवपूर्वक व सयमपूर्वक तो तसा करण्याचे टाळावे अशी आमची प्रार्थना आहे.

युगवाणीच्या लेखकांना, वाचकांना, हितचिंतकांना व सर्व सहाय्यकर्त्यांना ही दिवाळी आनंदाची जावो !

अनुक्रमणिका

बा ल क वि

(१३-८-१८९० -- ५-५-१९१८)

ले.–प्रा. भ. श्री. पंडित

–१–

बालकवि त्र्यंबक बापूजी ठोमरे यांचा जन्म अठराशे नव्वदात खानदेशात धरणगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांना पोलीस खात्यात नोकरी होती. त्यांच्या बदल्या वारंवार होत. त्यामुळे बालकवींच्या शालेय शिक्षणात खंड पडला. ते किमान प्रवेश परीक्षेपर्यंतहि सुरळीत व सुव्यवस्थित झाले नाही. मराठी त्यांची मातृभाषा होती. तेव्हां बालपणापासूनच त्यांनी तिच्या वाङमयाचा अव्याहत व्यासंग ठेवला असल्यास नवल नाही. मराठी भाषा व वाङमय यांच्या जोडीला त्यांनी संस्कृत भाषेचे व साहित्याचे एरंडोल येथे भारद्वाज यांच्या देखरेखीखाली आणि नाशिकास दूधमांडे यांच्या निर्देशनाखाली अध्ययन केले होते. ते पुढे त्यांच्या मराठी कवितालेखनास पोषक ठरले. बालकवींच्या कवितेत एकाच शब्दाची जी पुनरावृत्ति आढळते, ती त्यांनी 'मेघदूता'पासून उचलली असावी. त्यात 'मन्दं मन्दं नुदति पवनः' 'काले काले भवति भवतो', **'खिन्नः खिन्नः** शिखरिषु पदं', **'क्षीणः** क्षीणः परिलघुपयः' या प्रकारचे अनेक चरण आहेत. बालकवींच्या 'फुलराणी'त 'प्रणयचंचला त्या भ्रूलीला। अवगत नव्हत्या कुमारिकेला' ही जी सर्वजणांच्या अनुभवाची कमनीय कल्पना आहे, ती त्यांना कदाचित् 'मेघदूता'तील पुढील चरण युग्मकावरून स्फुरली असावी–

> 'त्वय्यायत्तं कृषिफलमिति **भ्रूविकारानभिज्ञैः**
> प्रीतिस्निग्धैर्जनपद वधू लोचनैः पीयमानः ॥'

मात्र बालकवींनी इंग्रजी भाषा आणि तिचे विविध विचारसंपन्न वाङमय यांच्याकडे जसे लक्ष द्यावे तसे दिले नाही. बालकवि विद्यार्थी असतानाच महाराष्ट्रात अठराशे सत्याण्णव व आठ्याण्णवच्या सुमारास दहशतवाद्यांची धरपकड चालू होती. पुढे वंगभंगाच्या प्रचंड चळवळीने सारा देश व्यापून टाकला होता. राष्ट्रसभेत जहाल व मवाळ असे देशभक्तांचे दोन तट पडले होते. राष्ट्रापुढे स्वराज्य, स्वावलंबन, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीचा कार्यक्रम हवा असा जहालांचा आग्रह होता. बालकवींचे वडील बंधु या चळ-

अनुक्रमणिका

वळीत पडले होते. त्यांच्या उदाहरणाने बालकवींनीहि इंग्रजी शाळेला व अभ्यासाला रामराम ठोकला. 'आर्यांची अवनती' या बालकवींच्या कवितेत 'हमालांचे जरि राष्ट्र असे कोठे। हिंदभूमी तो देश मला वाटे ।। आंग्ल विद्येच्या अध्ययनामाजी। अहा ! सुकते तारुण्यकळी ताजी' इत्यादि स्वाभिमानाचे जे विचार आढळतात, त्यांचे मूळ राष्ट्रीय शिक्षणाचे प्रवर्तक अण्णासाहेब विजापूरकर यांच्या पुढील श्लोकात आहे,—

'प्रधानत्व पावे जिथे आंग्लभाषा । जिथे मेळवी अर्धचंद्र स्वभाषा ।।
तिथे स्वाभिमाना कसा होय थारा? । अशा पारतंत्र्यीं असे देश सारा !।।
जयें निर्मिले कष्टकारी हमाल । तया मानिती शिक्षणाची कमाल ।।
परीक्षा तरी मेळवीती घबाडे । नव्हे, राहिलीं देहमात्रे चिपाडे ! ।।

मात्र पुढे नगरला व पुण्याला मिशनऱ्यांच्या साहचर्यात बालकवींनी इंग्रजीचा अभ्यास वाढवला. परंतु यावेळी त्यांचे विद्यार्जनाचे वय निघून गेले होते. या संदर्भात बालकवींच्या कवितेचे स्वरूप भारतीय आहे हे विधान लक्षात घेणे आवश्यक आहे. बालकवि कांही काळ बडोद्यास राहिले होते. खानदेश हाहि गुजरातला लागून आहे—तेव्हां बालकवींनी गुजराती कवितेचा थोडा फार अभ्यास केला होता आणि कलापी हा त्यांचा आवडता कवि होता असे म्हणतात. परंतु 'कई लाखों निराशा मां अमर आशा छुपाई छे' असे युयुत्सु वृत्तीचे व आशावादाचे उत्कट उद्गार काढणाऱ्या कलापीचा पुसट देखील ठसा बालकवींच्या कोणत्याहि कवितेवर दिसत नाही याचे आश्चर्य वाटते.

—२—

बालकवींना कविता वाचनाचा व कवितालेखनाचा छंद लहानपणापासूनच होता. 'नवनीत' हा ग्रंथ त्यांच्या वडील वहिणीचा अत्यंत आवडता होता. तिचे लहान दीर वासुदेव कृष्ण भावे बालकवींचे समवयस्क होते. त्यांनाहि कविता वाचनाचा व कविता लेखनाचा नाद होता. त्या दोघांच्या सहवासात बालकवींनी श्रीधर, महीपति व मोरोपंत या कथाकवींची काव्ये वाचन काढली. या संदर्भात बालकवींच्या उत्तमोत्तम कवितांचा आविष्कार कथनपर आहे हे सत्य लक्षात घेतले पाहिजे. वयाच्या तेराव्या वर्षी बालकवि व त्यांचे समवयस्क स्नेही भावे यांनी मिळून 'वनमुकुंद' ही कटावाच्या "चालीवरली" कविता लिहिली. ती उपलब्ध आहे. त्या कवितेत बालकवींची निसर्गाची ओढ व मुरलीची आवड प्रकट झाली आहे. स्वयंसिद्ध असणारी आणि निसर्गात रमणारी या दोन्ही दृष्टींनी बालकवींची कविता 'नैसर्गिक' आहे. प्रतिभेच्या दोन जाती असतात. एक नित्य नवे नवे उन्मेष पावणाऱ्या लतेसारखी असते: दुसरी झणझणाल

स्फुरण पावणाऱ्या विद्युल्लतेसारखी असते. एक आपल्या मंद मंद सुगंधाने रसिकांच्या अंतःकरणाला तृप्ति देते. दुसरी आपल्या प्रखर दीप्तीने प्रेक्षकांची दृष्टि दिपवून टाकते. एक पुष्कळ वेळपर्यंत दरवळत राहते. दुसरी एका निमिषात घनदाट घनात विलीन होते. बालकवींची प्रतिभा दुसऱ्या जातीची होती. तिचे काव्यविषय कोमल होते. तिची भाषा भावमधुर होती. पण तिची चमक जिवंत व उज्जवल होती. एकोणिसशे अकरा ते एकोणिसशे चवदा या तीन वर्षांच्या अवधीत ती लकाकून गेली. त्यापूर्वी किंवा त्यानंतर तिची चमक फारशी जाणवली नाही. प्राध्यापक पाटणकरांनी 'बालकवींची समग्र कविता' मुद्रित केली आहे. तिच्या शेवटी बालकवींनी पूर्ववयात रचलेल्या कांही कविता जोडल्या आहेत. त्यांच्याविषयी बालकवि 'प्रस्तावने'त म्हणतात,—"या जुन्या कविता मी वयाच्या ११–१२ व्या वर्षी केल्या आहेत. या प्रसिद्ध व्हाव्या अशी माझी इच्छा नाही. कारण लोकांना अपक्व पाक वाढण्यापेक्षा तो न वाढलेला बरा. परंतु माझ्या कवितेची वाढ कसकशी होत गेली व हल्ली ती कोणत्या पायरीवर आहे हे समजावे म्हणून ती एकत्र लिहून ठेवीत आहे." बालकवि म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या या कविता खरोखरच प्रसिद्धीच्या योग्यतेच्या नाहीत. त्यांच्या अशाच कांही कवितांचे एक बाड भावे यांच्या संग्रही होते. भावे नागपुरास सेवासदनात शिक्षक होते. आता ते सेवानिवृत आहेत. ते सांगतात, 'सुप्रसिद्ध कवि बाळ सीताराम मर्ढेकर लहानपणी असोदे येथे होते. त्यांचे वडील भाव्यांचे शालेय गुरू होते. बाळ मर्ढेकरांना आपल्या वडिलांकडून भाव्यांजवळील बालकवींच्या कवितांच्या बाडाचा सुगावा लागला. ते असोद्याहून अमळनेरास आले आणि त्यांनी भाव्यांकडून ते बाड हस्तगत कले. मर्ढेकर ते बाड घेऊन असोद्यास परतत होते तो रस्त्यात त्यांना आगगाडीचा अपघात झाला. ते घायाळ होऊन रक्तबंबाळ अवस्थेतच अपरात्री घरी पोचले. त्या अपघातात रस्त्यात पडलेले बाड उचलण्याचे भान त्यांना राहिले नाही. ते बाड कुठे तरी नाहीसे झाले. मर्ढेकर बालकवींच्या कवितांचे भक्त होते हे सर्वश्रुतच आहे. भक्त आणि त्याचे आराध्य दैवत या दोघांच्याहि चरित्रातील हा अपघाताचा योग विलक्षण व विस्मयकारक म्हटला पाहिजे !

—३—

एकोणिसशे चार पांचच्या सुमारासच बालकवींचे शालेय शिक्षण जवळ जवळ संपुष्टात आले होते. एकोणिसशे सहात ते एरंडोल येथे असतांना रामचंद्र कृष्ण वैद्य यांच्याशी त्यांचा संबंध आला. वैद्यांना रेव्हरंड उजगरे यांनी हरिदास बुवा' म्हटले आहे. त्यांच्या नंतरच्या समीक्षकांनी बहुतेक त्यांचीच

री ओढली आहे. वस्तुत: वैद्यांचा व्यवसाय कीर्तनकाराचा नव्हता. 'सार्वजनिक महोत्सवात सुशिक्षित तरुणांनी काय करावे?' हा लोकमान्य टिळकांचा 'केसरी'-तील लेख वाचून ऐतिहासिक कीर्तनाच्या द्वारे सर्वसाधारण लोकात राजकीय जागृति घडवून आणण्याची त्यांना स्फूर्ति झाली होती. त्यांच्या विषयी वि. सी. सरवटे माहिती देतात, "रामचंद्र कृष्ण वैद्य हे 'वनवासी' या नांवाने कविता लिहीत. त्यांना 'देवासकर' म्हणून ओळखत. ते जात्याच संकोची व प्रसिद्धि-पराङमुख होते. त्यांचा जन्म देवास येथे १८७१ मध्ये झाला. इंग्रजी शाळेत शिकत असताना त्यांना कविता रचण्याचा नाद लागला. कविवर्य तांबे यांची कवि म्हणून कीर्ति होण्यापूर्वी त्यांना ज्या रसिक व प्रोत्साहक स्नेह्यांचा सहवास लाभला त्यात 'वनवासी' प्रमुख होते. त्यांनी 'काव्यरत्नावली'त हम्मीर, सुभेदार मल्हारराव होळकर आणि पानिपतचा संग्राम ही तीन महाकाव्ये लिहिली. ती अपूर्ण राहिली आहेत. राष्ट्राभिमान व ओज हे त्यांच्या कवितांचे विशेष गुण आहेत. ते ऐतिहासिक कीर्तने करताना त्यात इतके रंगून जात की, त्या प्रसंगीच ते अंत:करणाला थरारून सोडणारी स्फूर्तिदायक पदे रचीत. पुढे प्रसिद्धीस आलेले 'बालकवि' त्यांच्याजवळ होते आणि त्यांच्या मागे उभे राहून कथेची साथ करीत" (साहित्य समालोचन पृ. २९१). वनवासी यांनी आक्टोबर १९०० च्या 'काव्यरत्नावली'त आर्यावृत्तामध्ये एक कविता रचली असून तिच्यात त्या काळी प्रसिद्ध असलेल्या सर्व कवींच्या काव्यगुणांची स्तुति केली आहे. त्यांच्या स्फुट कवितातदेखील परकी सत्तेबद्दलचा अनादर व तिटकारा आहे. शुष्क सरोवरास उद्देशून' ते म्हणतात,–

'बलिष्ठ जेव्हां लुटि दुर्बळांला। सहाय कोणी न करी तयाला॥
करें रवी शुष्क सरा करीतो। तद्वारणी कोणि न सिद्ध होतो॥'

(वि. ज्ञा. वि. जाने. १९०५)

बालकवींच्या काही कवितात स्वाभिमान व वैराग्य यांच्या ज्या छटा आढळतात, त्यांचा उगम वनवासी यांच्या या प्रकारच्या कवितात असावा. बालकवींनी 'प्रतापसिंह', 'दौलतरावांची मंजुळा' किंवा 'मोहिनी' इत्यादि मराठेशाहीवर किंवा रजपुतांच्या कारकिर्दीवर जी कवने रचली आहेत, ती त्यांना कदाचित् वनवासी यांच्या सहवासात स्फुरली असावी. दुर्दैवाने ही सारी कवने अधुरी, अपुरी व विस्कळीत राहिली आहेत. वनवासी यांच्या सहवासात बालकवि दोन महिन्यांहून अधिक काळ नव्हते. वनवासी वाखा होऊन अचानक उज्जयिनी येथे वारले आणि बालकवि एरंडोलला आपल्या घरी परत आले. वनवासी कीर्तनाच्या निमित्ताने वऱ्हाड, खानदेश, माळवा, नेमाड आणि राजपुतान्याच्या सरहद्दीवरील कांही गांवातून फिरत तेव्हा त्यांच्या समागमात बालकवींनी यांपैकी कांही प्रदेश पाहिले असावेत.

—४—

ज्यावेळी बालकवींचा संबंध वनवासी यांच्याशी आला, त्याच सुमारास किंवा त्यापूर्वी एक दोन वर्षे त्यांचा संबंध सुप्रसिद्ध कवि विनायक जनार्दन करंदीकर यांच्याशी आला. राष्ट्रीय कवितेचे प्रणेते या नात्याने विनायक अख्ख्या महाराष्ट्रात विख्यात होते. खानदेश ही जशी बालकवींची तशीच विनायकांची जन्मभूमि व कर्मभूमि होती. विनायक बालकवीपेक्षा सतरा अठरा वर्षांनी वडील होते. बालकवि व त्यांचे स्नेही भावे आपल्या कविता विनायकांना दाखवत असत. 'दुबळें तारूं' ही आपली कविता 'काव्यरत्नावलीं'त प्रसिद्ध करण्यापूर्वी बालकवींनी विनायकांना दाखविली होती. या घटनेसंबंधी अनंततनय सांगतात,—'कसे हाकारूं । शीडाविण दुर्बल तारूं' ही आपली कविता बालकवींनी विनायकाला दाखविली. तेव्हां त्याने फक्त तीतील 'दुर्बल' हा शब्द काढला व त्याचे ऐवजी 'दुबळें' हा शब्द घातला. अवघ्या एकच शब्दाचा फरक. पण तेवढयाने त्या ओळीला किती स्वारस्य आले आहे!" (विनायकाची कविता. चरित्र पृ. २०) एकोणिसशे चार साली 'मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी'ने 'कुसुमगुच्छ' हा एकूण आठ कवींच्या निवडक कवितांचा संग्रह आपल्या वाचकांना भेट दिला. या संग्रहात 'एका फुलाचा इतिहास' ही रेव्हरंड टिळकांची, 'झपूर्झा,' 'दवाचे थेंब,' 'रांगोळी घालतांना पाहून' आणि 'भृंग' या केशवसुतांच्या; 'प्रीतीचा वास' ही तांब्यांची आणि 'कृष्णाकुमारी' ही विनायकाची— या कविता आहेत. या संग्रहात 'कृष्णाकुमारी' ही विनायकांची कविता असल्यामुळे मित्रमंडळीस नजर करण्यासाठी त्याच्या कांही अधिक प्रती 'मनोरंजना'चे संपादक काशीनाथ रघुनाथ मित्र यांनी विनायकांकडे पाठविल्या होत्या विनायकांनी त्यापैकी एक प्रत बालकवींना व एक प्रत भाव्यांना बक्षीस दिली. बालकवींनी पुढे सात वर्षानंतर नगरला गेल्यावर तेथील ईश्वरी परिज्ञानाच्या शाळेंत (Divinity School) रेव्हरंड टिळकांच्या उपस्थितींत त्यांच्या 'वनवासी फुलावर' प्रवचन दिले. परंतु त्यांना 'एका फुलाचा इतिहास' या नावाने त्याचा परिचय त्यापूर्वीच झाला होता. काव्य लेखनाच्या उमेदीच्या काळात बालकवींच्या हाती 'कुसुमगुच्छा' ची प्रत आली. तिच्यातील कविता वाचूनच त्यांची केशवसुतांच्या कवितांवर भक्ति जडली. 'सृष्टि निमाली, । स्वर्गहि नुरले' या त्यांच्या कवितेतील 'तेज हरपले, । तम मालवले' या ओळी केशवसुतांच्या 'झपूर्झा' मधील 'प्रकाश गेला, । तिमिर हरपला' या ओळीशी समान आहेत. सृष्टीच्या सान्निध्यात केशवसुत मानवाला कमी लेखतात. 'भृंगां'त ते म्हणतात "अस्मद्गान नव्हे गान, । ते गाना चिव्यादान ॥ गा रे! गा नादी भ्रमरा । मी गणमाला जुळणारा" बालकवींनी आपल्या 'निर्झरां'त याच विचाराचा

अनुवाद केला आहे. ते म्हणतात, "मी कवितेचा दास, मला । कवी बोलती जगांतला, ॥ परि न झरे माझ्या गानी । दिव्यांची असली श्रेणी." बालकवींच्या कांही कवितांवर रेव्हरंड टिळक, केशवसुत व विनायक या तिघांहि ज्येष्ठ व श्रेष्ठ कवींच्या कविताचा प्रभाव पडला आहे. 'कवि' या बालकवींच्या कवितेची ठेवण 'खरे पुढारी' या टिळकांच्या कवितेसारखी आहे. 'तूं गडे! फुलाची राणी' या टिळकांच्या ओळीवरून बालकवींना 'फुलराणी' हा शब्द सुचला असावा. बालकवींचा 'धर्मवीर' हा उघड उघड केशवसुतांच्या 'तुतारी, वरून स्फुरला आहे. 'स्त्री आणि पुरुष' या विनायकांच्या ध्वनिकाव्याच्या चालीवरच बालकवींची 'फुलपांखरू–फुलवेली' ही कविता आहे. त्या कवितेतील "थांब तरी। कठिणच गे! नर जाति खरी" या ओळी वाचल्या म्हणजे हे गुपित कोणालाहि उघड होईल. परंतु विनयकांच्या 'स्त्री आणि पुरुष' या मथळ्यापेक्षा बालकवींचा 'फुल पांखरू फुलवेली' हा मथळा अधिक सरस, सुंदर व सूचक आहे. विनायकांच्या कवितेचा शेवट दुःखमय चिरविरहात झाला आहे. तो अधिक परिणामकारक आहे. बालकवींच्या कतितेचा शेवट आनंददायक पुनर्मीलनात झाला आहे. तो फारसा प्रभावी नाही.

—५—

एकोणिसशें सातच्या मार्च मधले दोन व तीन हे दिनांक बालकवींच्या चरित्रात सुवर्णाक्षरांनी नोंदले गेले आहेत. या दोन दिवशी रेंव्हरॅंड नारायण वामन टिळक व 'काव्यरत्नावली'चे संपादक नारायण नरसिंह फडणीस यांच्या प्रेरणेने खानदेशातच जळगांव येथे 'इंदिरा' काव्याचे कर्ते कर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांच्या अध्यक्षतेखाली एक 'कवि संमेलन' भरविण्यात आले. हे संमेलन जळगांवात भरविण्यात औचित्य होते. कारण आधुनिक कवि आणि त्यांची कविता यांची सतत वीस वर्षे जोपासना करणारे 'काव्यरत्नावलि' मासिक तेथूनच निघत होते. या संमेलनाच्या निमित्ताने एकूण तेवीस कवी जळगांवास एकत्रित आले होते. त्यात कीर्तिकर, महाजनि, माधवानुज, चंद्रशेखर, टिळक, विनायक, तांबे, रहाळकर, पांगारकर, अनंततनय इत्यादि प्रमुख होते. आधुनिक कवींचे अग्रेसर केशवसुत यापूर्वी दोन वर्षे दिवंगत झाले होते. या संमेलनात एका खासगी बैठकीत विनायकांनी 'तारातरंग' या काव्यातील यतिभंगांबद्दल चंद्रशेखरांची थट्टा केल्याचे अनंततनयांनी विनायकांच्या चरित्रात आणि विठ्ठलराव घाटे यांनी 'दिवस असे होते' मध्ये नमूद करून ठेविले आहे. तेव्हां विनायक त्यावेळी जळगांवात नव्हते ही मराठ्यांची माहिती बरोबर नाही (बालकवि चरित्रग्रंथ प. ३४). या संमेलनाच्या प्रसंगी विनायकांच्या मध्यस्थीने बालकवींची टिळकांशी ओळख झाली. टिळक मिळ्मिळ कविता लेखन करणारे कवि नव्हते. ते जात्याच उदार व

अनुक्रमणिका

दिलदार होते. एकंदर कविवर्गाविषयीं त्यांना जवळीक व आपुलीक वाटे. नव्यानेच उगवलेल्या लहान लहान रोपट्यांना पाणी पाजून सुफलित करण्यात तें स्वतःला धन्य मानीत. आपल्या पत्नीच्या कवितेचे कौतुक करताना ते एका पत्रात तिला लिहितात,—"रा. साठे, भास्कर, ठोमरे किंवा प. वा. घाटे, केशवसुत ह्यांच्या कवितांचे कौतुक करणाराच तुमच्या कवितेचे कौतुक करीत आहे" (स्मृतिचित्रें भाग १ पृ. १८.) तेव्हां त्यांनी या संमेलन प्रसंगी ठोमऱ्यांना कविता रचण्याचे व म्हणण्याचे प्रोत्साहन दिले असल्यास नवल नाही. टिळकासारख्या परिणतप्रज्ञ व पितृवत्सल प्रेमळ कवीचा आधार मिळताच सोळा सतरा वर्षांचे त्र्यंबक बापूजी ठोमरे कविसंमेलनाच्या व्यासपीठावर चढले आणि आपल्या कांपऱ्या आवाजाने परंतु आत्मविश्वासाने स्वतःचा विनम्र भाव व्यक्त करणारे पुढील गीत गाऊ लागले,—

'अल्पमती मी बालक नेणे काव्यशास्त्र व्युत्पत्ती
कविवर्यांनो ! मदिय बोबडे बोल धरा परि चित्ती
गीर्वाणीं नच गती, कळे ना महाराष्ट्र भाषाही,
आगळीक परि करितों, पुढती होइल क्षम्य जनां ही
बुद्धी विरहित आहे माझें काव्य पोरके आज
त्या करवी मग होइल कैसें जनमनरंजन काज ?'

ठोमऱ्यांच्या तोंडच्या या शेवटच्या दोन ओळी ऐकताना टिळकांना राहवले नाही. ते जागेवरुन उठले आणि त्यांनी 'शाबास' म्हणून ठोमऱ्यांची पाठ थोपटली. तांबे सांगत, "ठोमरे भिडस्त व लाजाळू होते. त्यांच्या या बोबड्या बोलांचा श्रोतृवृंदावर प्रभाव पडला याला कारण त्यांचे एकंदर वर्तन मोठे मर्यादशील होते. संमेलनाला उपस्थित असलेले बहुतेक कवि त्यांच्या मानाने वयाने वडील होते. तेव्हां ठोमऱ्यांच्या चांचरत चांचरत म्हटलेल्या कवितेपेक्षा त्यांच्या बालवयाचे अनेकांना कौतुक वाटले." या समारंभात कीर्तिकरांच्या हस्ते बालकवींना नारिकेल-फलासह जरतारी उपरण्याचे एक पान उपायन म्हणून देण्यात आले आणि 'बालकवि' या अन्वर्थक पदवीने त्यांचे गौरव करण्यात आले. यापुढे खानदेशचे चिरंजीव त्र्यंबक बापूजी ठोमरे हे अखिल महाराष्ट्राचे 'अजरामर बालकवि' झाले. आधुनिक कवितेतील या ऐतिहासिक घटनेचा पुढे गोविंदाग्रजानी 'निजलेल्या बालकवीस' या आपल्या गीतात जो निर्देश केला आहे, तो समुचित व समीचीन आहे,—

'नवकवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार
सौन्दर्याची द्वाहि फिरविण्या बा ! तव अवतार.'

या अभूतपूर्व सन्मानाने बालकवींच्या काव्यलेखनाला द्रुप्पट उत्तेजन मिळाले. परंतु त्याला नवे वळण लागले नाही. अजून ते कवितेचे तेच जुने वळण गिरवीत

होते. त्यात मनाला बोध असे व जनाला उपदेश असे. त्यात मधून मधून वैराग्यपर विचार असत. आणि क्वचित त्यात एखादे सुभाषित असे. बालकवींच्या त्या कवितांचे समालोचन करण्याचे कारण नाही.

यानंतर दोन वर्षांनी एकोणिसशे नऊत बडोद्यास साहित्यसंमेलनाचे अधिवेशन भरले. या संमेलनाचेहि अध्यक्षपद कर्नल कीर्तिकरांकडेच होते. यावेळी बालकवि बडोद्यास प्राध्यापक पेंडसे यांच्या आश्रयाने अभ्यास करीत होते. या संमेलनास रेव्हरंड टिळक आले होते. तेव्हां बालकवींनी त्यांची गाठ घेतली आणि आपली अगतिक परिस्थिति सांगितली. तेव्हां कीर्तिकर व 'आनंदा'चे संपादक आपटे यांच्या सल्ल्याने बालकवींनी टिळकांच्या सहवासात रहावे असे ठरले. यावेळी बालकवींची सांपत्तिक स्थिति यथातथाच होती. कर्नल कीर्तिकर इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्ये अधिकारपदावर होते. त्यांनी बालकवींना दरमहा दहा रुपयांची शिष्यवृत्ति दिली. आणि बडोद्याच्या संमेलनात ठरल्याप्रमाणे एकोणिसशे दहाच्या आरंभी बालकवि अहमदनगरास टिळकांकडे राहण्यास गेले.

या मधल्या दोन वर्षांच्या काळात बालकवींच्या आयुष्यात दोन महत्त्वाच्या घटना घडून आल्या. एकोणिसशे आठात त्यांच्या शिरावरील वडिलांचे मायेचे छत्र नाहिसे झाले आणि एकोणिसशे नऊत असोदे येथील विनायकराव जोशी यांची एकुलती एक लाडकी कन्या जिजी इच्याशी त्यांचे लग्न झाले. यांपैकी एक घटना दुःखदायक होती व दुसरी सुखकारक होती. परंतु त्या दोन्ही घटनामुळे बालकवींवरील संसाराची जबाबदारी वाढली. बालकवींना अमृतराव या नांवाचे त्यांच्यापेक्षा दोनचार वर्षांनी वडील बंधु होते. पण देशाभिमानाच्या लाटेत त्यांनी धुळे येथील रायली ब्रदर्सच्या जिनिंग फॅक्टरीमधील आपल्या नोकरीचा राजिनामा दिला होता. ते प्रत्यक्ष चळवळीत भाग घेणारे होते. ते आपल्याकडे भूमिगत क्रांतिकारकांना आसरा देत त्यामुळे त्यांच्या बरोबर बालकवींच्याहि मागे कांही काळ पोलिसांचा ससेमिरा होता. या बंधूंच्या आणि त्यांच्या पत्नीच्या बेजबाबदार वागणुकीचा बालकवींना आणि त्यांच्या पत्नींना अखेरपर्यंत फारच त्रास झाला.

—६—

एकोणिसशे दहाच्या आरंभी बालकवि नगरास पोचताच टिळकांनी त्यांना जानेवारी सतराला अमेरिकन मिशन हायस्कुलात इंग्रजी पांचवीत भरती केले. "बालकवींनी निदान मॅट्रीक्युलेटेड तरी व्हावे, अशी आमची इच्छा होती" असे टिळक म्हणतात (मा. मनो. मे १९१८). बालकवींचे वय त्यावेळी वीस वर्षांचे होते. वर्गातील अन्य विद्यार्थी त्यांच्या मानाने वयाने लहान होते. त्यांच्यात

मिळणे मिसळणे बालकवींना पसंत नव्हते. टिळक याचे कारण सांगतात, "बाल-कवींना आंग्लकवि उइल्यम काउपरप्रमाणे क्षुद्र कारणामुळे किंवा कधी कधी निष्कारण सुद्धा जिवाला कंटाळण्यापर्यंत विमनस्क होऊन बसण्याचा विकार जडला होता. परंतु नगरास त्यांच्या भोवती आशावादी व विनोदी मित्रांचा गराडा पडलेला असल्यामुळे त्यांची ही वृत्ति सुधारत चालली होती." पण टिळकांच्या या साक्षीपेक्षा लक्ष्मीबाई टिळकांची साक्ष विचार करण्यासारखी आहे. त्या सांगतात, "आमच्या घरी नाना प्रकारची माणसे आली आणि गेली. पण ठोंबऱ्यासारखे कोणीच नव्हते. तो मधून मधून भांडे तरी त्याच्यात कपट नव्हते. द्वेष नव्हता. स्वार्थ नव्हता. आमच्या घरी असताना तो नेहमी आनंदी, खेळाडू, आशावादी असा असावयाचा. पण नगर सोडून गेल्यावर त्याची ही वृत्ति नेहमी बदले पुन्हा परत आल्यावर त्याची बालवृत्तिहि परतायची. बाहेर जायचा म्हणजे खानदेशांत नाही तर पुण्याला" (स्मृतिचित्रें भाग ३ पृ, ७८ व ८४) बालकवीचे मन नगरच्या मिशन हायस्कुलात रमले नाही याचे कारण त्यांचे लक्ष पुण्याकडे होते. आणि त्याप्रमाणे ते एकोणिसशे अकराच्या शेवटी कांही महिने नगर सोडून पुण्यास गेले. टिळक पुढे सांगतात, "ठोंबरे पुण्यास असतांना प्रसिद्ध कवि गोविंदाग्रज, महाराष्ट्र नाटक मंडळीचे मालक श्रीयुत कारखानीस, श्रीयुत भास्कर मोरेश्वर कीर्तने इत्यादि कवि मंडळीने कवि 'केशवसुत' यांच्या सन्मानार्थ नवीनच स्थापिलेल्या तुतारी मंडळाचे सभासद झाले. या तुतारी मंडळाचा व ठोंबऱ्यांचा संबंध फारच थोडया दिवसांचा होता. ते अजून आहे किंवा मोडले, हे आम्हांस ठाऊक नाही. पण ठोंबरे पुन्हा पुणे सोडून नगरास आले. त्यांना तेथे अमेरिकन मिशनच्या युनियन ट्रेनिंग स्कूलमध्ये मराठी शिक्षकाचे काम मिळाले. तथापि हेहि त्यांच्या हितचिंतकांनी टिकू दिले नाही. शेवटी ते पुन्हा पुण्यास गेले. तेथे त्यांना मिशनकरिता स्थापिलेल्या मराठी भाषेच्या शाळेत काम मिळाले. सुमारे दोन वर्षांनी ते या शाळेचे मुख्याध्यापक झाले. ठोमरे उन्हाळयाच्या सुट्टीत बहुधा महाबळेश्वरास मराठीचे पंडित म्हणून जात असत. तेथे त्यांची आणि एस्. पी. जी. चे मिशनरी रेव्हरंड जे. सी. विन्स्लो यांची ओळख झाली व ते त्यांच्या पंडिताचे काम पत्करून पुन्हा अहमदनगरास आले." टिळकांच्या निवेदनावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ती ही की बालकवींनी वीस मे एकोणिसशे दहाला न. चिं. केळकरांना "करुणा येईल तर पहावे" म्हणन एक पत्र पाठविले होते. त्याप्रमाणे त्यांना केसरी कचेरीने थोडी फार मदत केली. त्या मदतीच्या मोबदल्यात बालकवींनी मंगळवार, तेवीस जानेवारी एकोणिसशे बाराच्या आणि बारा मार्चच्या 'केसरी'त आधुनिक कवितेचे जनक हा लेख आणि 'कवि' व 'संक्रांत' या दोन कविता लिहिल्या.

यापेक्षा अधिक सहाय्य त्यांना मिळाले नाही. बालकवींना नुसती शाब्दिक सहानुभूति नको होती. त्यांना आर्थिक सहाय्य हवे होते. कारण आता त्यांच्यावर आई, पत्नी व लहान भाऊ यांच्या पोषणाची जबाबदारी होती.

— ७ —

अहमदनगरच्या वास्तव्यात बाल कवींच्या कवितेस नवे वळण मिळाले. टिळकांनी त्यांना कवितेकडे पाहण्याची नवीन दृष्टि दिली. "काव्य म्हणजे व्याकरण नव्हे. शुद्धलेखन नव्हे. अलंकारशास्त्र नव्हे. काव्य म्हणजे काव्य ! वस्त्राभरणे म्हणजे सौंदर्य नव्हे. आधी सौंदर्य मग ही उपकरणे" [स्मृति चित्रें. भा. १ पृ. १८०] हे आपले मत टिळकांनी बालकवींना पटवून दिले. दुर्दैवाने बालकवींच्या कवितांखाली स्थलकालनिर्देश नाही. त्यामुळे त्यांच्या कवितां संबंधी निर्विवाद व निश्चित लिहिणे मोठे कठिण होऊन बसले आहे. बालकवि एकोणिसशे दहाच्या आरंभी टिळकांकडे गेले. त्यापूर्वी त्यांनी 'आनंदी आनंद गडे' येवढीच एक निसर्गविषयक कविता लिहिली होती. ती १९०९ च्या 'मनोरंजनाच्या दिवाळीच्या अंकात आहे. माडखोलकर 'आधुनिक कवि पंच-कां'त म्हणतात त्याप्रमाणे या कवितेचे फक्त अक्कड कडवेच काय ते काव्यमय आहे. ऑगस्ट एकोणिसशे सहा मध्ये मुलांसाठी 'आनंदा'चा जन्म झाला होता. बालकवि अजून बालच होते. 'आनंदा'च्या त्या पहिल्या अंकासाठी त्याचे संपादक वासुदेव गोविंद आपटे यांनी आपले परममित्र भास्कर रामचंद्र तांबे यांना कविता लिहिण्याची विनंती केली होती. त्या विनंती प्रमाणे तांब्यांनी 'आनंदी आनंद !' ही कविता रचली होती. ती वाचून बालकवींना आपली कविता स्फुरली हे उघड आहे. बालकवींच्या कवितेत आत्माविष्कार नाही असे म्हणतात. परंतु या कवितेचा शेवट त्यांना कदाचित् गृहकलहातील दैनिक कोलाहलातून स्फुरला असावा. बालकवींना स्वतःच्या घरातच स्वार्थ, द्वेष व मत्सर यांचा अनुभव आला असावा. म्हणून त्यांच्या तोंडून कदाचित् सहजोद्गार बाहेर पडले असावेत,——

स्वार्थाच्या बाजारांत । किती पामरें रडतात
त्यांना मोद कसा मिळतो । सोडुनि स्वार्था तो जातो
द्वेष संपला । मत्सर गेला, । आतां उरला
इकडे तिकडे चोहिकडे । आनंदी आनंद गडे !

जळगांवच्या कवि संमेलनात टिळकांच्या जोडीने 'आनंदा'चे संपादक वासुदेवराव आपटे व सुप्रसिद्ध कवि माधवानुज यांनी बालकवींचे कौतुक केले होते. आपटयांनी मे एकोणिसशे सातच्या 'आनंदा'त 'आनंदी प्रवासी' ही बाल-

कवीची कविता प्रसिद्ध करतांना तिला एक टीप जोडून वालकवींच्या कवित्त्वाची प्रशंसा केली होती. माधवानुजांनी जळगांवास संमेलनाच्या दिवशीच 'वाल-कवीचा गौरव' ही कविता लिहिली होती. वालकवींना जरतारी उपरण्याचे पान अर्पण करण्यात आले होते. त्याला उपलक्ष्य करून माधवानुज म्हणतात,—

'असेल कोष्टी किती कुशल तो जो सावा कार्पास
घेउनि हातीं विणी तयाचें मृदुल मनोहर वास
हाय ! आपुली आर्यभूमि ही झाली वस्त्रविहीन
चिंताव्याकुल रडे विचारी दिसते दु:खी दीन
खर्चुनि रचनाचातुर्यातें कर वसनास तयार
लाज राख तूं निज जननीची गांजुनि गेली फार.'

तो काळ देशाभिमानाने प्रेरित झालेल्या कवितांचा होता. त्यामुळे कदाचित् माधवानुजांनी प्रस्तुत अपेक्षा केली असावी. परंतु ती वालकवींनी पूर्ण केली नाही. कारण त्यांचा मन: पिंड निसर्गकवीचा होता.

वालकवि वयाने व वृत्तीने अजून वाल असल्यामुळे त्यांनी वाल गीते मात्र पुष्कळ लिहिली, आणि ती 'आनंद', 'वालवोधमेवा' व खेळगडी या मुलांच्या मासिकांनी मोठ्या आनंदाने प्रसिद्ध केली. 'चांदोवा मजला देई' हे त्यांचे वाल स्वभावाचे दर्शक वाल गीत अप्रितम आहे. फोलायाचा नाही त्याला। गुददवली देइन ठेवाला' यातील चंद्र हा कांचेचा आहे ही वालस्वभावसुलभ कल्पना जितकी निरागस तितकीच रमणीय आहे. नगरला मिशनच्या सान्निघ्यात वालकवींना वाल वाङ्मय कसे असावे याची कल्पना आली असावी. 'चिमणीचा घरटा चोरीस गेला' ही कविता त्यांना कॉनव्हेंटमध्ये शिकवत असलेल्या पुढील इंग्रजी कवितेवरून सुचली आहे,—

Who stole the bird's nest ?
'Tir–whit, tir–whit, tir whee,
Will you listen to me ?
Who stole four eggs I laid
and the nice nest I made ?'
'Not I,' said the cow 'moo–oo,
Such a thing I would never do
I gave you a whisp of hay,
I did not take your nest away'.
'Not I', said the dog, 'bow wow,
I would n't be so bad I vow

अनुक्रमणिका

I gave some hairs the nest to make,
Those pretty eggs I did not take'
'Not I' said the sheep, 'oh no,
I would not treat the poor birds so,
I gave the wool the nest to line
But the nest was none of mine'
A little boy is hung down his head
And went and hid behind the bed,
For those eggs he took away
And stole the robin's nest that day
Now he felt so full of shame,
He did not like to tell his name.

बालकवींनी आपल्या कडील परिस्थितीला जुळतील असे आपल्या मराठी कवितेत बदल केले आहेत. नगरच्या वास्तव्यात बालकवींनी आपला इंग्रजीचा व्यासंग वाढवला. लहान मुलांना विज्ञानाचे ज्ञान व्हावे यासाठी इंग्रजीत मुलांना रुचतील व पचतील अशा रीतीने निरनिराळया विषयांवर लहान लहान पुस्तके तयार करण्यात येतात. मिस् डब्ल्यू. एस. हेन् यांनी प्राणीजीवन व वनस्पती-जीवन यांवरील कांही गोष्टींचा संग्रह केला होता. त्या गोष्टींना बालकवींनी एकोणिसशे अठरा मध्ये 'सृष्ट चमत्कार' या नांवाखाली मराठी पेहेराव चढवला आहे. या गोष्टीतले बालकवींचे गद्यहि काव्यमय आहे. 'बाळजीवां'त ते कोंबडीच्या अंड्याची माहिती देतात.-- "बाळजीव हा एका वाटोळया डौलदार घरांत राहात होता. त्या घराच्या भिंती चकचकीत होत्या. त्यांत बाळजीवाची खाण्याची पांढरी मलई सांठविली होती. जवळच एका पिवळया श्रीखंडाच्या गोळयावर तो तरंगत होता. तो केवळ एका ठिपक्या सारखा होता. हे घर कोणते ते आले का तुमच्या लक्षात ? हे घर म्हणजे एक अंडे !" [बालबोध मेवा नोव्हेंबर १९३६] बालकवींचे बालवाङमय विपुल नाही. पण जे आहे ते हंसत खेळत मुलांना ज्ञान देणारे आहे. बालकवींनी त्यात आपली कवीची भूमिका कायम ठेवली आहे. दत्त तांबे व लक्ष्मीबाई टिळक यांच्या प्रमाणेंच बाल-कवींची बाल गीते चिरंजीव आहेत.

टिळकांना 'फुलां मुलांचे कवि' म्हणतात. परंतु टिळकांनी मुलांविषयी कविता लिहिल्या आहेस. मुलांकरिता त्यांनी क्वचितच एखादी दुसरी कविता लहिली आहे. त्यांनी अशा प्रकारची बालगीते रचण्यास ज्यांना उत्तेजन दिले, या दत्त, बालकवि व लक्ष्मीबाई टिळकांनी मात्र मुलांकरिता मुलांच्या भाषेत

व मुलांच्या बोलीत अनुपम बालगाणी गाइली आहेत. "मुलांच्या जिज्ञासें'त टिळक शिक्षकाची भूमिका स्वीकारतात. उलट हे तिघेहि क्षणभर आपले प्रौढपण विसरून बाल होतात. बालकवी तर बालच होते. मुलांच्या मासिकात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कवितात तर बालवृत्ति आहेच. परंतु त्या खेरीज अन्य कवितातहि त्यांचा बालसुलभ अल्लड व लडिवाळ भाव प्रकट झाला आहे. या दृष्टीने 'अप्सरांचे गाणें', 'पाऊस', 'गवताचे गाणें', 'फुलराणी' इत्यादि त्यांच्या कविता तपासण्या जोग्या आहेत. आपल्या पौराणिक वाङमयात 'अप्सरा' आहेत. परंतु त्या ऋषीमुनींची तपश्चर्या भग्न करण्याकरिता स्वर्गातुन भूमीवर उतरतात. बालकवींच्या अप्सरा इंग्रजी बालवाङमयातील पऱ्यांचे (fairies) अवतार आहेत. त्या गाणें गात गात अंग धुतात,—

"सुमनांच्या गर्भामाजी । रसगंगा भरली ताजी
आजूबाजूला बसलीं । शुभ्र अद्रिशिखरें सगळीं
गोड सुवासाचे मेघ । आळसले जागोजाग
सांभाळुनि उतरा बाई । वेळ गडे स्नानाची ही"

बालकवींच्या कमनीय कल्पनासृष्टीत 'गवताची पाने' हि गाणी गातात,

"स्वर्गांतुनि आली आई : मंजुरवें आम्हां वाही
ती वदली "लाला लाला" । या रे या नाचायाला
पवनाच्या आंदोलांत । देवदूत होते गात
आलिंगुनि आम्हांला ते । हालविती गद्गद हातें

बालकवींनी इंग्रजी गीतांची शब्दश: भाषांतरे केली नाहीत. परंतु 'पऱ्या' 'देवदूत' 'कोंवडी ताई' इत्यादि मंडळी त्यांना नगर व पुणे येथील मिशनच्या परिसरात आढळली हे मान्य केले पाहिजे. टिळकांच्या या समागमात त्यांना ही बालगीते लिहिण्याची नवी दृष्टि प्राप्त झाली हे उघड आहे. बालकवींच्या बालगीतात बालमनावर परिणाम होईल अशा रीतीने सौंदर्य, माधुर्य, वात्सल्य व अद्‌भुत यांची रुचकर सरमिसळ झाली आहे. बालकवींच्या भाषेत मधून मधून थोडे संस्कृताचे पुट आहे. परंतु या बाबतीत मुले ही निरर्थक नादानेहि लुब्ध होतात हे सत्य लक्षात घेतले पाहिजे.

—८—

बालकवींनी मुलांसाठी लिहिलेल्या कविता वगळल्या, तर त्यांच्या उरलेल्या बहुतेक सर्व कविता निसर्गविषयक आहेत. प्रेमपर, तात्त्विक, वैचारिक, विविध असे त्यांचे वर्गीकरण केले, तरी त्या बहुतेक कवितातील प्रतिमा निसर्गातील आहेत. त्यांच्या बऱ्याच कविता अधुऱ्या व अपुऱ्या आहेत. बालकवींना काग-

दांच्या चिटोऱ्यावर पेन्सिलीने कविता लिहिण्याची संवय होती. कविता मनाजोगती उतरली नाही, तर ते कविता लिहिलेला तो कागदाचा कपटा चुरगाळून टाकीत. त्यांच्या या संवयीमुळे निफाडकर, अधिकारी, गोपाळ गंगाधर पोतदार आदींनी त्यांच्या ज्या कविता छापल्या आहेत त्यात दोन वेगवेगळ्या विषयावरील कवितांची निरनिराळी स्वतंत्र कडवी एकत्र जोडण्याचा प्रमाद घडला आहे. त्यातल्या त्यात पाटणकरांची आवृत्ति पुष्कळच व्यवस्थित व सुसंगत आहे. बालकवींच्या निसर्गविषयक कवितात मनाच्या दोन वृति आढळतात. मनोवृत्ति ही परिवर्तनशील असते. मनोभात्र हा अपरिवर्तनशील असतो. वालकवि स्वभावतःच आनंदी व विनोदी होते असे त्यांचे वालमित्र भावे सांगतात. लक्ष्मीबाई टिळकांनी 'स्मृतिचित्रा'च्या दुसऱ्या भागात वालकवींच्या ज्या आठवणी दिल्या आहेत आणि पाटणकरांनी 'बालकवींच्या समग्र कविते'च्या शेवटी बालकवींनी दत्तोपंत टिळक व तारावाई टिळक यांना धाडलेली जी हास्यरसात्मक पत्रे छापली आहेत, त्यावरून भाव्यांच्या म्हणण्यास दुजोरा मिळतो. रेव्हरंड टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे मधून मधून बालकवींना विषण्णतेचे (melancholy mood) झटके येत, आणि त्यांवर टिळकांनी उपाययोजनाहि केली होती. बालकवींच्या ज्या कविता निरनिराळ्या नियतकालिकातून प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांचा जर कालानुक्रमाने विचार केला, तर असे दिसते की, बालकवि आरंभी आरंभी म्हणजे जवळ जवळ एप्रिल एकोणिसशे चवदा पर्यंत मनाने प्रसन्न व वृत्तीने उत्साही होते. एप्रिल एकोणिसशे चवदानंतर त्यांच्या दोन कविता मे एकोणिसशे अठराच्या 'मनोरंजना'त त्यांच्या मृत्युलेखावरोवरच प्रसिद्ध झाल्या आहेत. येथे प्रश्न असा उपस्थित होतो की या मधल्या चार वर्षांत त्यांची प्रतिभा मूक होती की काय ? की याच अवधीत त्यांना निराशेच्या कविता स्फुरल्या व त्या त्यांनी आपल्या ह्यातीत कोणत्याहि मासिकाकडे धाडल्या नाहीत ? त्यांच्या मृत्युनंतर त्या प्रथमतः त्यांच्या निरनिराळ्या कवितासंग्रहात संग्रहित झाल्या. त्यांकडे 'महाराष्ट्राचें अक्षम्य दुर्लक्ष्यच झाले' असे माधवराव पटवर्धन म्हणतात. पण ते वस्तुस्थितीकडे लक्ष देत नाहीत. (आ. म. वाङमयसेवक खंड २६ व २७).

प्रसन्न वृत्तीत व विषण्णवृत्तीत स्फुरलेल्या या दोन्ही प्रकारच्या निसर्गविषयक कवितांशी बालकवींच्या जीवनाचा साक्षात् संबंध आहे म्हणूनच त्या भावोत्कट व हृदयस्पर्शी उतरल्या आहेत. बालकवींनी खानदेशाच्या ग्रामीण परिसरात, पाताळ पाणी आणि काळा कुंडाच्या घाटात, खंडाळ्याजवळ बोरघाटात आणि महाबळेश्वराला प्रकृतीच्या पर्यवेक्षणात रात्री आणि दिवसामागून दिवस घालवले होते. अस्तोदय, चंद्राचे चांदणें व तारामंडळ, भिन्न भिन्न

ऋतु, नदी, पर्वत वने आणि निर्झर ही सृष्टीची विविध रूपे तासन् तास पहाण्यात त्यांना मनसोक्त आनंद होत असे. निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करताना त्यांना जी सुंदरता अनुभवास येई, तिलाच त्यांनी शब्दात साकार केले आहे. सृष्टीच्या सान्निध्यात त्यांना स्वतःचे देहभान राहत नसे,—

'सृष्टच चमत्काराचे पाहुनि नाना विलास नयनांही
या क्षुद्र मर्त्य देहीं आसक्ती अल्प राहिली नाही
निर्झरमय, काननमय, गायनमय दिव्य जाहला देह,
सृष्टीचेहि पुरे ना विचराया स्वैर त्याजला गेह

असा आपला दिव्य अनुभव त्यांनी कथन केला आहे. बालकवि जात्याच सौंदर्यवादी होते. कामरुपिणी सृष्टीच्या सौंदर्याचा त्यांचा मोह अनावर होता. सृष्टीत जे जे काही सुंदर असेल, त्यात त्यांना चैतन्याचे दर्शन होत असे. त्या सौंदर्यावर व चैतन्यावर ते मनःपूर्वक प्रेम करीत. सौंदर्याचा साक्षात्कार होताच त्यांचे मन म्हणू लागे,—

'सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावे
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावे कानी
बनवावे मन धुंद रंगुनी काव्यसुधापानी'

बालकवींची वृत्ति आनंदी व आशावादी असताना त्यांना अरुण, संध्या रजनी, फुलराणी, निर्झरास, फूलपाखरू फुलवेली, संध्यातारक, प्रेमलेख इत्यादि कविता उत्स्फूर्त झाल्या आहेत. या कवितासंबंधी टिळक म्हणतात, "या त्यांच्या कविता त्यांच्याच म्हणून अर्वाचीन विदग्ध वाङमयात निरंतर शोभणाऱ्या आहेत कल्पनांचे सहजपण, रचनेचे सारल्य आणि वर्णमाधुर्य हे त्यांच्या कवितेचे गुण म्हणजे त्यांनाच ईश्वराकडून मिळालेली संपत्ति होती" (मनो. मे १९१८) या कवितांचे सर्जन होताना बालकवींची भावसमाधि लागत असे. टिळकांनी ती प्रत्यक्ष पाहिली होती. 'त्वां काय पाहिले सांग' या आपल्या गीतात त्यांनी तिचे नितांत मधुर वर्णन केले आहे,—

त्वां काय पाहिलें सांग ? ॥
त्यज कितू, सांगच तूं,
विस्मृतिच्या तूं बुडसी डोहीं,
स्मृती तुला परिरंभुनि राही,
हे सांग कशाचे रंग ? ॥
भ्रिससी येथे, रमसी तेथें;

विसरुनि जासी परि उभयांतें,
तुज तुझाच नाही थांग !॥

या भावोन्मादाच्या स्थितीतील बालकवींना टिळकानी 'उन्मनस्क' म्हटले आहे. टिळकांनी प्रशंसिलेल्या बालकवींच्या या कवितांचा एक विशेष आहे. त्यात प्रेमाबरोबर पावित्र्य आहे, आणि आशेच्या जोडीला उत्साह आहे. 'अरुणां'त परस्परांना दिशा म्हणतात,—

"तेजाने न्हाणिते जगाला कोण सखे ! बाई ?
नवल अगाई ! तेजोमय तूं ! तेजोमय मी ही !
या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा—पुरे गडे ग ऽ हा तुमचा मान !
अम्ही गवळणी हृदयरसांनी पूजूं प्रेमाला
प्रेमकाल हा ! म्हणोत कोणी अरुणोदय याला"

त्याच दिशा 'संध्या रजनीं'त चंद्राला अनुलक्षून म्हणतात,—

"तुमची राणी बसे सारखी तुम्हां न्यहाळीत,
गगनाच्या चौकात चला हो, या रजनीनाथ !
धवल चंद्रिके ! दे आलिंगन दिव्य यामिनीला
वहिणी वहिणी तुम्ही सुखाने चंद्राशी खेळा !
कां तारांनो ! तुम्ही लाजतां ? हा मंगल काल !
निर्मत्सर व्हा, प्रेमसंगमीं पोहा चिरकाल !

येथे बालकवींनी 'चंद्रिका' व 'यामिनी' यांना 'सवती सवती' न म्हणतां 'बहिणी बहिणी' म्हटले आहे ते लक्षात घेण्याजोगे आहे. 'तारकांच्या गाण्या'त तारका निरनिराळे खेळ खेळून शेवटी म्हणतात,—

अनेक असले खेळ करूं। प्रेमाशा विश्वात भरूं ॥
सोडुनिया अपुले श्वास। जगीं नाचवूं उल्हास ॥

'तारकांचे गाणें' ही कविता सोडली, तर बालकवींच्या या कवितांचा आविष्कार कथनपर आहे. 'तारकांचे गाणें' मात्र नाट्यपर आहे. या बहुतेक कविता कथनपर असल्या तरी त्यात मधून मधून कळत न कळत बालकवींचे आत्मनिवेदन आले आहे. या कविता विदग्धवाङ्मयात अविस्मरणीय होण्याचे कदाचित तेहि एक कारण असावे. बालकवींना या कविता स्फुरल्या त्यावेळी त्यांचे वय एकवीस बावीस होते आणि त्यांच्या पत्नीचे वय दहा अकरा वर्षांचे होते. त्यांच्या पत्नी पार्वतीबाई ठोमरे आपल्या 'आत्मचरित्रा'त एका ठिकाणी लिहितात "माझी सासरी येण्याची ही पहिलीच वेळ होती। बालकवींच्या सह-

वासाला अशी मी प्रथमच आले होते. प्रथम त्यांना लग्नात पाहिलेले. नंतर मधून मधून ओझरते पाहिलेले, त्यावेळी नवरा म्हणजे कोण याची कल्पना नव्हती. घरातल्या कोणी किंवा सासूबाईंनी किंवा वन्संनी म्हटले, 'पार्वती ! उठून घरांत जा. तुझा नवरा आला. म्हणजे मी विचारावें, नवरा म्हणजे कोण ? माझ्या या प्रश्नाने धाकट्या वन्सं तर हसूं लागत. लहान लहान म्हणून सर्वच हंसण्यावारी नेत." आणखी एका ठिकाणी त्या लिहितात, "माझ्या आईबापांना एकच अपत्य होते. ते म्हणजे मी. माझ्या लहानपणीं माझे फार कोडकौतुक होई" मला वाटते, बालकवींनी फुलराणीचे जें चित्र रंगविले आहे ते स्वानुभवजन्य असावे,—

'गोड निळ्या वातावरणांत । अव्याज मनें होती डोलत,
प्रणय चंचला त्या भ्रूलीला । अवगत नव्हत्या कुमारिकेला !
आईच्या मांडीवर बसुनी । झोके घ्यावे, गावीं गाणी,
याहुनि ठावे काय तियेला । साध्याभोळ्या फुलराणीला ?'

पुढे त्या लिहितात, "बालकवि घरांत आले कीं मी पळून जाई. त्यांना पाहिले की मी लटलट कापायला लागायची. त्यांच्या चष्म्याची सुद्धा मला भीति वाटायची. त्यांना वाढण्याची पाळी आली की वस्तु हातातून ताटात गळून पडायची. वस्तु पानात पडली की बालकवि फार रागावत. त्यानंतर मी त्यांच्याशी बोलते कसली आणि क्षमा मागायला जाते कसली. तशात मी थोडी हट्टीहि होते. त्यांना ते आवडत नसे. पण माझें आपले तसेच. थोडे शांत झाले की बालकवींनी घरात यावे, की मी बाहेर पडावे,. . . . .बालकवि कोवळ्या मनाचे होते. मला म्हणाले, "आता हट्ट नाही ना करणार ? लाजणार नाहीस ना ?" पण ते ऐकून मला रडायचा मोठा हुंदका आला. पण रडायचे कसे ? तीहि चोरी !" 'तारकांच्या गाण्यांत एक कल्पना आहे,—

एकादी तरुणी रमणी । रमणाला आलिंगोनी
लज्जा मृदा भीरुच ती । शंकित जर झाली चित्तीं
तिच्याच नयनी । कुणी बिंबुनी
धीट तिला बनवा बाई । भुलवा ग ऽ रमणालाही"

ही कल्पना सुद्धा बालकवींना स्वानुभवा वरूनच सुचली असावी असे म्हटले तर ते चुकेल कां ? बालकवींच्या वेळी जी सामाजिक रचना होती, तिच्यात स्वतःच्या पत्नीला संबोधून कविता लिहिण्याची प्रथा फारशी रूढ नव्हती. केशवसुत, तांबे, टिळक आदि कवींच्या काही कविता पत्नीला उद्देशून आहेत. परंतु त्यांच्यावर इंग्रजी कवितांचा जसा संस्कार झाला होता तसा तो बालकवीवर झाला नव्हता.

अनुक्रमणिका

शिवाय बालकवींचे घराणे ज्या देशस्थ शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण शाखेचे होते, ती शाखा त्याकाळी जुन्या आचार विचारांना चिकटून बसलेली सनातनी स्वभावाची होती. 'जादुगारीण' ही एक अपूर्ण कविता सोडली, तर ज्या कवितांना वासनेचा वास आहे अशा पार्थिव प्रेमाच्या कविता बालकवींच्या कवितासंग्रहात आढळत नाहीत. वर पार्वतीबाईंनी बालकवींना 'कोवळचा मना'चे म्हटले आहे. ते अगदी सत्य होते यात संशय नाही. 'दोष व प्रीति' ही कविता सुद्धा त्यांना घरगुती वातावरणातच स्फुरली असावी. पार्वतीबाई आणखी एका ठिकाणी लिहितात,—— "दहा वाजले. पुण्याची गाडी आली. आम्ही दोघे गाडीत बसलो व एक वाजता पुण्यास पोचलो. मला पाहून सौ. वन्संना फार आनंद झाला. त्या माझ्याशी फार चांगल्या वागूं लागल्या. आम्ही दोघी फार आनंदात राहत होतो हे पाहून बालकवींना फार आनंद वाटे. बालकवींनी म्हणावें, "ताई, तुझ्याशी ती इतकी चांगली वागते. पण माझ्याशी ती अशी कां वागते ? मला ती इतकी भिते कां ? त्याचाच मला राग येतो" त्यावर वन्संनी म्हणावे, "नाना, तू शांत रहा. तू रागावलास म्हणजे त्या घाबरून बोलेनाशा होतात". मला वाटते, प्रत्येक माणसात दोष आहेत यांची बालकवींना चांगलीच जाणीव असावी. त्या जाणिवेतून बहुधा ते उद्‌गारले असावेत,——

'दोष असती जगतात किती याचे । नसे मजला सामर्थ्य गणायाचें
दोष माझा परि हाव मला वाटे । दोष बघतां सत्प्रेम कसे आटे ?
दोष असती, जगतांत ? असायाचे । मला त्याशीं तरि काय करायाचे ?
प्रेम गंगेच्या शुद्ध सिंचनेही । शुद्ध होई न जो दोष असा नाही !'

बालकवींची प्रस्तुत कविता तात्त्विक आहे परंतु ती वरील संदर्भात येत असल्यामुळे इथे तिचे अवतरण केले आहे.

(अपूर्ण)

संत तुकारामांचे राजकीय विचार

प्रा. श्री. गो. काशीकर,

तुकारामांचे आध्यात्मिक तत्वज्ञान, त्यांचे काव्यगुण व त्यांची सामाजिक शिकवण यांवर अनेक विद्वानांनी भरपूर प्रकाश पाडला आहे. परंतु तुकारामांच्या लिखाणात व्यक्त झालेल्या राजकीय विचारांवर मात्र कुणी फारसे लिहिलेले आढळत नाही. तसा तुकारामांच्या वाङमयात राजकीय विचार फारसा नाही देखील. शिवाजीराजे यांना महाराजांनी लिहिलेले पत्र व लोहगावास पर-चक्राचा वेढा पडला असताना केलेले अभंग एवढेच तुकारामांचे प्रत्यक्ष राजकीय वाङमय होय. पाईकीच्या अभंगांचा अध्यात्मपर अर्थ लागत असला तरी त्यातील तपशीलावरून ते राजसेवकांना उद्देशूनहि लिहिले असावेत असे वाटते. ह्याशिवाय राजकीय स्वरूपाचे दाखले, दृष्टान्त, कथा इ. वरूनहि काही अप्रत्यक्ष माहिती मिळते. तथापि एकंदरीत तुकारामांचे राजकीय स्वरूपाचे लिखाण फारच थोडे आहे व म्हणूनच त्याकडे तुकारामांच्या अभ्यासकांचे दुर्लक्ष झाले असावे.

तुकारामांनीहि शिवाजीमहाराजांना पाठविलेल्या पत्रात राजकारणाबद्दल तिटकाराच व्यक्त केला आहे. 'दिवटया छत्री घोडे । हे तो बऱ्यात न पडे' ॥ (पृ. ३२६–अ. १८८४) असे ते म्हणतात. परमेश्वरभक्तीपुढे 'सार्वभौम राज्य । त्यांसि काही नाही काज ॥ (पृ. १०६–अ. ५८२) ही त्यांची वृत्ती आहे. म्हणून शिवाजी महाराजांनी जेव्हा त्यांचे दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा तुकारामाची मानसिक अवस्था मोठी विचित्र झाली. अगदी झिडकारून टाकावे अशा शब्दात त्यांनी शिवप्रभूच्या निरोपास उत्तर दिले आहे. ते म्हणतात, 'तुम्हा पाशी आम्ही येऊनिया काय । वृथा सीण आहे चालण्याचा ॥१॥ . . राजगृहा यावे मानाचिये आसे । तेथे काय वसे समाधान ॥४॥ राजाचिये घरी भाग्यवंता मान । इतरा सामान्यां मान नाही ॥५॥ आता हेंचि तुम्हां सांगणे कौतुक । भिक्षे ऐसे सुख नाही नाही ॥८॥' (पृ. ३२७–८–अ १८८८). आणि म्हणून

टीप–ह्या लेखांतील अभंगांचे संदर्भ 'श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा' संपादक–पु. मं. लाड, मुंबईशासन प्रकाशन, १९५५, ह्या ग्रंथातून घेतले आहेत. पृ=पृष्ठ क्रमांक व अ=.अभंग क्रमांक.

अनुक्रमणिका

त्यांनी अगदी कळवळून शिवाजी महाराजांना विनंती केली की 'तुका म्हणे माझी विनंती सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ।। (पृ. ३२७–अ. १८८६)

तुकाराम हे ईश्वरप्राप्तीच्या मार्गावरील साधक. त्यांना ऐहिक राज्याशी काहीच कर्तव्य नव्हते. त्यांच्या दृष्टीने ते फक्त विश्वव्यापी विश्वंभराच्या एकछत्री आध्यात्मिक राज्याचे नागरिक होते, आणि भावाच्या बळावर ते अगदी निर्भर होते. ते म्हणतात, 'भावाचिया बळे । आम्ही निर्भर दुर्बळे ।।१।। नाही आणिकांची सत्ता । सदा समाधान चित्ता ।।६।। तर्का नाही ठाव । तेथे रिघावया वाव ।।२।। एकछत्री राज । तुक्या पांडुरंगी काज ।।३।। (पृ ३३०–अ. १९००) तसेच, 'करितां विचार अवघे एक राज्य । दुजा कोण मज पाठी घाली ।।१।। (पृ. ३४२–अ. १९८२) असा त्यांचा रोकडा सवाल आहे.

परंतु हे झाले स्वतःसाठी किंवा स्वतःप्रमाणे भगवत्प्राप्ती झालेले किंवा साधकावस्थेत असलेले ह्यांच्यासाठी. सर्वसामान्य जनतेसाठी तुकारामांनी अधिकार पाहून उपदेश केला आहे ही गोष्ट येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. तुकाराम हे केवळ मोक्षार्थी नव्हते तर ते संत होते. आत्मानुभूती व सहानुभूती यांचा दिव्य संगम म्हणजे संत होय. त्यामुळे आत्मसाधना पूर्ण होऊनहि 'बुडता जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणवूनि' ।। (पृ १६९–अ. ९४८) ह्यास्तव तुकाराम 'उपकारापुरते' उरले होते. तुकाराम सदेह स्वर्गाला गेले त्याप्रसंगीचे 'स्वामींनी काया ब्रह्म केली ते अभंग' यात सुद्धा तुकाराम म्हणतात, न घडे यावरि न धरवे धीर । पीडतां राष्ट्र देखोनि जग ।।२।। (पृ. २८०–अ. १६०४) आणि हे जनतेचे बुडणे किंवा राष्ट्राचे पीडणे केवळ आध्यात्मिक स्वरूपाचेच नव्हते तर त्यात राजकीय विपन्नावस्थाहि समाविष्ट होती हे लोहगावास परचक्राचा वेढा पडला ही गोष्ट तुकारामांना सहन झाली नाही ह्यावरून दिसून येते. ते म्हणतात, 'न देखवे डोळा ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होते ।।१।। काय तुम्ही येथे नसालसे जाले । आम्ही न देखिले पाहिजे हे ।।६।। उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडे विठ्ठला परचक्र ।।६।। भीत नाही आता आपुल्या मरणा । दुःखी होता जना न देखवे ।।१।। (पृ. १०३–अ ५५७ ते ५५९)

परचक्राबद्दलचा तीव्र तिटकारा जसा ह्या अभंगातून व्यक्त होतो त्याचप्रमाणे छत्रपति शिवाजीराजांना लिहिलेल्या पत्रातून त्यांच्या स्वातंत्र्य रक्षणाच्या कार्याबद्दल महाराजांचा जिव्हाळाहि व्यक्त होतो. इतकेच नव्हे तर शिवाजीने आपले राज्यकार्यच नीट साधावे, त्यांनी विरक्तीच्या मार्गाकडे जाऊ नये, तसे केल्यास दोष लागेल असे तुकारामांनी सुचविले आहे ते म्हणतात, 'आता एक योग साधावा हा नीट । भल्याचा तो वीट मानूं नये ।।१।। जेणे योगे तुम्हां घडो पाहे दोष । ऐसा हा सायास करू नये ।।६।। (पृ. ३२८–अ. १८८९) तर

मग शिवाजीने करावे काय ? ह्यावद्दलहि तुकारामांनी स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. ते म्हणतात, 'सद्‌गुरू श्री रामदासाचे भूषण। तेथे घाली मन चळो नको॥८॥ वहुतां ठायीं वृत्ति चाळवती जेव्हा । रामदास्य तेव्हा घडे कैसे ॥९॥ (पृ ३२७– अ. १८८७) ह्या अभंगातून दोन गोष्टी प्रकाशात येनात. एक तर शिवाजी व रामदास ह्यांचे संबंध घनिष्ठ होते ह्यावद्दल तत्कालीन स्वरूपाची निर्णायक साक्षच तुकारामांनी दिली आहे. आणि दुसरे, रामदासांची जी राजकीय विचार-सरणी आहे तिच्यापासून शिवाजी महाराजांनी आपली वृत्ति इतरत्र नेऊ नये असे सांगून रामदासांच्या विचारसरणीला तुकारामांनी आपला पाठिंबाच व्यक्त केला आहे. जणू काय ते म्हणतात, 'मला स्वतःला राजकारणाशी काहीहि कर्तव्य नाही परंतु माझे राजकीय विचार कसे आहेत हे जर आपणांस पहावयाचे असेल तर रामदासांचे विचार पहा '

'जनी जनार्दन' ही जरी तुकारामांची दृष्टि होती तरी 'अवगुणी दंडण, गुणी पूजा' हे तत्त्वहि त्यांना मान्य होते असे दिसते. एका ठिकाणी तर ते स्पष्टच म्हणतात की 'अन्यायासी राजा जरि न करी दंड । वहुच ते लंड पीडितां जना ॥' (पृ. ६२५–अ. ३८१४). तुकारामानी केलेली दयेची प्रसिद्ध व्याख्याहि ह्या दृष्टीने मार्गदर्शक आहे. ते म्हणतात, 'दया तीचे नाव भूतांचे पालन । आणि निर्दालन कंटकांचे ।' (पृ. ४५ अ. २६३)

राजसत्ता ह्याच एका राज्यप्रकाराचा तुकारामाच्या वाङमयात उल्लेख आढळतो. परंतु तुकारामांना ज्याप्रमाणे परकीय सत्ता नको* त्याच प्रमाणे अन्यायी राजसत्ताहि नको. 'राजा सर्व हरी । तेथे दुजा कोण वारी ॥ (पृ. ४७८–अ. २८५२) किंवा 'राजयाचा पुत्र अपराधी देखा । तो काय आणिकां दंडवेल । (पृ. ४०९–अ. २३९४) असे ते म्हणतात. आदर्श राजा म्हणून तुकारामांनी जनक व शिविरायाचा यांचा गौरवाने उल्लेख केला आहे. (पृ ४२३–अ २४८७) यावरून राजा अध्यात्मनिष्ठ, अनासक्त परंतु कर्तव्यपरायण असावा अशी तुका-रामांची भूमिका दिसते. शिवरायाला पाठविलेल्या पत्रातूनहि हाच आशय व्यक्त होतो. शिवरायाचे वर्णन ते युक्ताचा वालक ब्रह्मनिष्ठ ज्ञानी' असे करतात व राजाची वृत्ति कशी असावी ह्यावद्दल सांगतात, 'एक दोनी कर्मे जाणोनिया वर्मे । आपुलिया श्रमें राहूं आता ॥७॥ कल्याणकारक अर्थ याचा एक । सर्वांभूती देख एक आत्मा ॥८॥ आत्मारामीं मन ठेवूनियां राहे । रामदासीं पाहे आपणया ॥९॥ तुका म्हणे राया धन्य जन्म क्षिती । त्रैलोकी हे ख्याति कीर्ति तुझी ॥१०॥' (पृ. ३२८–अ. १८८९), संकल्पासी अधिष्ठान । नारायण गोमटे (पृष्ठ ४४२–अ. २६११) किंवा 'काये करूनि करी धंदा । चित्त गोविन्दा तुझे पायी ॥ (पृ. ७८०–अ. ३३) हा नियम इतरांप्रमाणे राजालाहि लागू आहे.

* म्लेंच्छ–सेवेबद्दल तुकारामांनी अनेक ठिकाणी नापसंती व्यक्त केली आहे. उदा. पृ. ५१३–अ. ३०६३, पृ. ५४३–अ. ३२७२.

मात्र राजा केवळ धर्मनिष्ठ असून भागत नाही. तो व्यवहारनिष्ठहि असला पाहिजे. शिवाजी राजांना तुकाराम महाराज लिहितात, 'परीक्षावे कोण राज्याचे रक्षक। विवेकाविवेक पाहोनियां ॥३॥ सांगणे नलगे सर्वज्ञ तू राजा। अनाथांच्या काजा साह्य व्हावे ॥४॥ हेंचि ऐकोनिया चित्त समाधान। आणीक दर्शनें चाड नाही ॥५॥' (पृ. ३२८–अ. १८८९) तुकारामाचे हे पत्र वाचत असतांना रामदासांनी सभाजीला लिहिलेल्या प्रसिद्ध पत्राची आठवण झाल्याशिवाय राहात नाही व दोन्ही पत्रांतील समान भूमिका पाहून मोठा विस्मय वाटतो. रामदासांप्रमाणेच तुकारामांनी विवेकी राजकारणाचा पुरस्कार केला आहे. तेव्हा सामान्य व्यवहारधर्मात पाळावयाची म्हणून जी विवेकयुक्त तत्वे तुकारामांनी सांगीतली आहेत ती राजव्यवहारात पाळावयास त्यांची हरकत असेल असे मुळीच वाटत नाही. अखंड सावधानता, प्रसंग पाहून वागणे व युक्तिवळाने परिस्थितीचा पुरेपूर उपयोग करून घेणे यावर तुकारामांनी भर दिला आहे. ते म्हणतात, 'वरे सावधान। राहावें समय राखोन ॥ १ ॥ नाही सारखिया वेळा। अवघ्या पावतां अवकळा ॥ ६ ॥' (पृ. ३७८–अ. २२१४) 'उचिताचा काळ। साधावया युक्तिवळ। आपलें सकळ। ते प्रसंगी पाहिजे ॥ १ ॥ नेम नाही लाभ हानि। अवचित घडती दोनी। विचारूनि मनीं। पाहिजे ते प्रयोजावे ॥ घृ ॥' (पृ. ६०५–अ. ३६८०). कोणत्याहि गोष्टीचे मूळ वर्म काय हे चतुर माणसाने ओळखले पाहिजे; वर्म जाणेल तोच खरा पारखी होय (पृ. ५१–अ. ३०९); शिवाय वर्म जाणले की काम सुकर होते–'कळो येते वर्म। तरी न पवतो श्रम॥' (पृ. ६१७–अ. ३७६०) असे तुकाराम महाराज म्हणतात. जशास तसे ह्या न्यायाने अधमास अधम व्हावे असे देखील ते म्हणतात. ह्या बाबतीत त्यांचे पुढील दाखले फारच मार्मिक आहेत. 'पाया जाला नारू। तेथे बांधला कापुरू। तेथे विवव्याचे काम। अधमासि तों अधम ॥ १ ॥ ––देव्हाऱ्यावरि विंचू आला। देवपूजा नावडे त्याला। तेथे पैजारेचे काम। अधमासि तों अधम ॥ ३ ॥' (पृ. ७१६–अ. ४३७८) ठकाला ठक भेटला तर त्याच्याशी कसे वागावे ह्याचा 'धर्म' तुकारामांनी एका कथेच्या आधारे मोठा मजेदार सांगितला आहे. ही कथा अशी: एकदा वाघाने एका कोल्ह्याला उपदेश केला की 'अरे कोल्होवा, मला तुला खुशाल खाऊ दे. अखेरीस केव्हा ना केव्हा तुला मरण हे येणारच. तेव्हा माझी भूक भागविल्याचे श्रेय तरी घे' यावर कोल्हा म्हणाला, 'वा! वा! फारच छान-तुझ्याच तत्वाप्रमाणे का होईना. अरे तू देखील अखेरीस मरणारच आहेस. तेव्हां माझा जीव न घेतल्याचे पुण्य तूंच का नाही मिळवीत?' अशा रीतीने कोल्होवाने वाघाची बाजू वाघावरच उलटविली. खरोखर कोल्होवा मोठाच राजकारणचतुर मुत्सद्दी असला पाहिजे. या कथेवर तुकाराम महाराज भाष्य

करतात की 'गांठी पडली ठका ठका । त्याचा धर्म बोले तुका ।।' (पृ. ५११–अ. ३०५२).

सामर्थ्याचे महत्वहि तुकारामांनी अनेक ठिकाणी वर्णन केले आहे. 'समर्थाचे केले । कोणा जाईल मोडिले ।। १ ।। वाया करावी ते उरे । खटपट सोस पुरे ।। २ ।।' (पृ. २८५–अ. १६४२) असे ते म्हणतात. दुर्बलाच्या हाती धन सापडले तरी त्याला ते जतन करता येत नाही अशा शब्दात त्यानी दौर्बल्याचो निर्भर्त्सना केली आहे. (पृ. ३६८–अ. २१४४.) बलवंत करील तो त्याचा धर्म बनतो आणि बल किंवा सत्ता हा तर राज्याचा आधार आहे. तुकाराम महाराज म्हणतात, 'राजा करी तैसे दाम । तेही चाम चालती ।। १ ।। कारण ते सत्ता शिरीं । कोण करी अव्हेर ।। २ ।। (पृ. ४३८–अ. २५८८).

क्षात्रवृत्तीबद्दलहि तुकारामांनी गौरवोद्गार काढले आहेत. शूरपणाबद्दल रामदासांप्रमाणेच त्यांनी 'महाबळी हनुमंताची' अत्यंत वाखाणणी केली आहे. (पृ. ४८–अ. २८३ ते २८६). पराक्रमाशिवाय सारे जिणे लाजिरवाणे होय असा स्पष्ट अभिप्राय तुकारामांनी दिला आहे. (पृ. २३०–अ. १३११). हत्यारे ही शूरालाच शोभून दिसतात, 'ढाले तरवारे गुंतले हे कर । म्हणे तो जुंझार कैसा झुंजो ।।' (पृ. ७१०–अ. ४३४८) असला रडत राऊत काय कामाचा ? रणी निघालेला शूर योद्धा कधीच माघारे पाहात नाही (पृ. ४४८–अ. २६५७). क्षात्रधर्मातील हत्या ही हत्या नव्हेच तर ते निष्काम कर्म होय (पृ. ३१९–अ. १८३८) आणि म्हणून 'हतो वा प्राप्स्यसे स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' ह्या न्यायाने त्याला उभयपक्षी लाभच मिळतो. तुकाराम महाराज म्हणतात, 'तुका म्हणे शूर दोहीं पक्षी भला । मरता मुक्त जाला मान पावे ।।' (पृ. ४५३–अ. २६८४).

उत्कृष्ट राज्यकारभार निष्ठावंत सेवकांशिवाय होऊ शकत नाही. ह्या दृष्टीने पाईकीचे अभंग अत्यंत उदबोधक आहेत. ह्या अभंगांमध्ये 'स्वामी' शब्द परमेश्वर ह्या अर्थी घेऊन ह्या सर्व अभंगांचा अर्थ अध्यात्मपर लावला जाऊ शकतो. अशा रीतीने हे रूपक जरी मानले तरीहि त्यातून व्यावहारिक स्वामि–सेवक संबंधाबद्दल तुकारामांचे विचार व्यक्त झाले आहेत असे मानावयास काहीहि हरकत नाही. शिवाय 'स्वामी' हा शब्द 'नृप' किंवा 'मालक' ह्या अर्थी तुकारामांनी वापरलाहि आहे. उदाहरणार्थ, 'स्वामिकाज गुरूभक्ति । पितृवचन सेवा पति ।।१।। हे चि विष्णूची महापूजा । अनुभाव नाहीं दुजा ।। ६ ।। (पृ. ३८६–अ. २२६१) ह्या अभंगात 'स्वामिकाज' म्हणजे नृपकार्य किंवा मालकाचे काम हा अर्थ घेणे आवश्यक आहे. नाहीतर, परमेश्वराची सेवा ही परमेश्वराची सेवा होय ह्या-प्रकारचा द्विरुक्ति दोष निर्माण होईल. शिवाय पाईकीच्या अभंगात पुढील प्रमाणे

जो तपशील आहे त्यावरून तर शिवरायाच्या सेवकांना अनुलक्षूनच हे अभंग केले असावेत असे वाटू लागते. तुकाराम महाराज म्हणतात, 'सेवकांचे प्रकार दोन. एक, स्वामिकाजी सर्वस्वाने तत्पर असलेले व दुसरे, आशाबद्ध व कुचर. परंतु जो निष्ठावंत आहे तोच खरा सेवक. बाणगोळ्यांचा अपार वर्षाव जरी होत असला तरी तो युद्धात स्वामीच्या समोर राहून मृत्यूला कवटाळील पण स्वामीचे रक्षण करील. त्याला आपली तनु तृणवत् आहे व सुवर्ण पाषाणवत् आहे. स्वामी हेच त्याचे सर्वस्व. अशा सेवकामुळेच त्यांचा नेता त्रैलोक्याचा देखील सामर्थ्यसंपन्न स्वामी होऊ शकतो. (पृ. १८८–९–अ. १०६३ ते १०६९) पाईकीच्या अभंगांव्यतिरिक्त पुढील उदाहरणातहि तुकारामांनी स्वामिनिष्ठेवर विशेष भर दिलेला आढळतो.

सेवके करावे स्वामीचे वचन । त्यासी हुं तूं पण कामा नये ॥ १ ॥
घेईल जीव का सारील परते । भंगलिया चित्ते सांदीजेना ॥ ६ ॥
(पृ. ४००–अ. २३३९.)

सेवकासी आज्ञा निरोपासी काम । स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे ॥
(पृ. ४४५–अ. २६९८.)

सेवके करावे सांगितले काम । सिक्याचा तो धर्म स्वामी राखे ॥
(पृ. ५२७–अ. ३१६०)

छत्रपति शिवाजीमहाराजांचे स्वराज्य संस्थापनेचे प्रयत्न चालू असताना त्यांना वरील प्रकारच्या निष्ठावंत, आज्ञाधारक व जीवास जीव देणाऱ्या सेवकांचेच गरज होती ही त्यावेळची परिस्थीति लक्षात घेतली म्हणजे हे अभंग अगदी स्पष्ट होतात. ह्या उलट वेगळया परिस्थितीमध्ये दामाजी पंताने स्वामीच्या आदेशाची पर्वा न करता जनकल्याणासाठी धान्याची सरकारी कोठारे लुटविली ह्याचाहि तुकारामांनी गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. (पृ. ७११–२–व. ४३५६).

ह्या सर्व राजकीय विचारांमध्ये तुकारामांची आदर्श राज्यविषयक कल्पना आली नसती तरच नवल. वस्तुतः शिवाजीमहाराजांना लिहिलेल्या पत्रातच 'अनाथांच्या काजा साहय व्हावे', 'कल्याणकारक अर्थ याचा एक । सर्वाभूती देख एक आत्मा' ह्या वचनात आदर्श राज्याची कल्पना दिसून येते. ह्याशिवाय, रामराज्य व द्वारकाधीशराज्य ही तुकारामांची आदर्श राज्ये होत. त्यांची मुख्य लक्षणे पुढील प्रमाणे आहेत.

'जाले रामराज्य आनंदली सकळें । तुका म्हणे गाईवत्सें नरनारी बाळें ॥' (पृ. १९८–अ. ११०५) 'जाले रामराज्य काय उणे आम्हांसी । धरणीं धरी पीके

(पृष्ठ ३५ वर)

अमेरिकन कुटुंब

ले०–प्रा. गो. मा. कुलकर्णी

अमेरिकन 'कुटुंब' म्हणून कांही आहे किंवा नाही, असल्यास ते कशा प्रकारचे आहे, हे जाणण्याची आपल्याला उत्सुकता असते. कांहींना वाटते की अमेरिकेत कुटुंब म्हणून कांही नाहीच. कांहींना आपल्या कडच्या सारखेच कांही तरी असावे असे वाटते अमेरिकन कुटुंब खरोखर कसे असते हे प्रत्यक्ष पाहिल्या शिवाय समजू शकत नाही.

पति, पत्नि, आणि त्यांची मुलं यांनी कांही काळ अेकत्र राहणं याला कुटुंब म्हणायचं असल्यास अमेरिकेत लोक कुटुंब करून राहतात असं म्हणायला हरकत नाही. ह्या अर्थाने प्रत्येक व्यक्ति कुटुंबात राहते. पण कौटुंबिक जीवनाबद्दल आपल्या ज्या कल्पना आहेत. ज्या भावना आहेत, त्यांच्या कसोटीवर तपासून पाहता अमेरिकन कुटुंब हे आपल्या कुटुंबाहून व आपल्या कुटुंबविषयक कल्पनांहून वेगळे आहे असं दिसून येतं. हे वेगळेपण कुटुंबाच्या प्रकारात आहे तसेच कुटुंब विषयक भाव–भावनांच्या बाबतीत आहे.

संयुक्त कुटुंब असते. असू शकते याची कल्पना सुद्धा अमेरिकेन कोणी करू शकत नाही. भारतात अद्यापहि अशी कुटुंबं आहेत असं सांगितलं तर त्यांना फार आश्चर्य वाटतं. असं कुटुंब राहूच कसं शकतं, असा प्रश्न ते विचारतात. त्यांच्या मते असं कुटुंब म्हणजे एक मेळावा (a crowd). आपल्याकडेहि आता अशीच विचारसरणी प्रसृत होत चालली आहे. औद्योगीकरण व आधुनिक राहणी, जीवनमानाच्या बदलत्या कल्पना, इत्यादि मुळे संयुक्त कुटुंबं आपल्या देशातूनहि नष्ट होत आहेत. अमेरिकेत ती कधी अस्तित्वातच नव्हती. अमेरिकन कुटुंब म्हणजे पति. पत्नि व त्यांची अविवाहित मुलं यांचं अेकत्र राहणं. त्यांच्या अेकत्र राहण्यानं बनलेलं असं ते सुटसुटीत कुटुंब असतं आपल्याकडे विवाहानंतर मुली कुटुंब सोडून जातात. त्यांच्याकडे मुलं सुद्धा विवाहा नंतर वेगळं घर थाटतात. त्यामुळे शेवटी त्यांचे आई–बाप. म्हणजे मूळ पति–पत्नि, असे दोघेच (तो पर्यंत त्यांचा विवाह टिकून राहिल्यास) कुटुंबात शिल्लक उरतात. माझं नेहमी जाणं–येणं असे अशा एका चांगल्या कुटुंबात पति–पत्नि व दोन मुलगे अशी चारच माणसं होती. धाकटा मुलगा आईचा विशेष आवडता होता. त्याला घर सोडून बाहेर राहण्याची सवय व्हावी म्हणून, सेंटलुईला शिक्षणाची सर्व व्यवस्था असता-

अनुक्रमणिका

नाहि त्याला बाहेर पाठविण्याचं त्यांनी ठरविलं होत. आईलाहि त्याचं बाहेर जाणं जड वाटत होतं. या संबंधी बोलताना मी तिला म्हटलं, "मग लग्ना नंतर हा वेगळा राहायला लागेल तर कसं करशील" "त्याला कांही इलाज नाही," येवढंच तिनं उत्तर दिलं. "कारण काय? त्यानं वेगळं राहायलाच कां पाहिजे?" असं मी विचारल्यावर ती बराच वेळ स्तब्ध राहिली व मग म्हणाली, "The same universal problem." मग मीच म्हणालो, "सासू-सुनेचा का ?" त्या वर तिनं हसून होकार दिला. मग त्यावर आम्ही बराच वेळ बोलत राहिलो. 'सुनेला आपल्या मर्जीनुसार घर चालवावं' वाटतं, व सासू निवृत्त व्हायला तयार होत नाही. तेव्हां एकाच घरांत दोघींनी भांडत राहण्या पेक्षा प्रत्येकीनं वेगळं राहून आपापल्या मर्जीनुसार कारभार करावा हे चांगलं' असा आमच्या चर्चेचा सारांश होता. ही विचारसरणी आपल्यालाहि अपरिचित नाही.

कुटुंबसंस्थेचा पाया म्हणजे विवाह. विवाहपद्धतीवर कुटुंबाचं स्थैर्य, टिकाऊपणा वगैरे गोष्टी अवलंबून असतात. ज्याला आपण 'प्रेमविवाह' म्हणतो त्याच पद्धतीने अमेरिकेत सर्व विवाह होतात, म्हणून तिकडे 'अमक्याचा प्रेमविवाह झाला आहे' असं कुणी म्हणत नाही. कारण सर्वत्र विवाह तसे झालेले असतात. किंवहूना त्या पद्धतीहून दुसरी पद्धत त्यांना माहीतच नाही. एका अर्थानं ते प्रेमविवाह नसतातहि. प्रेमामुळे तळमळणं, विरहात जळणं, तिच्या किंवा त्याच्या वाचून जीवन अशक्य होणं, वगैरे यातना अमेरिकेत 'प्रेमिकांना' भोगाव्या लागत नाहीत. 'मीलन' इतकं सुलभ आहे की 'प्रारंभविरह' वगैरे भानगडीचा त्यांना त्रासच होत नाही. म्हणून त्याला प्रेमविवाह न म्हणता सहवासोत्तर विवाह म्हणणेच योग्य होईल.

आपले विवाह मुलं व मुली स्वतःच जमवतात. त्यांनी अेकमेकांच्या सहवासात यावं म्हणून लहानपणा पासूनच मुलामुलींचे मिश्र मेळावे भरविले जातात. आपल्या कडेहि मुलं व मुली लहानपणी एकत्र खेळतात. पण त्यांच्याकडे एक मुलगा व एक मुलगी अशा जोड्या करण्यात येतात. व त्या वयापासूनच त्यांच्या ठिकाणी नवरा-बायको ही भावना जागृत होते. आपल्याकडे जसं बहीण-भाऊ हे नातं जोडलं जातं तसं तिकडे नाही. मानलेला भाऊ व मानलेली बहीण हे प्रकार त्यांना माहीतच नाहीत व सांगितले तर कळतहि नाहीत. वयाच्या सात-आठ वर्षांपासून तर मुलगा व मुलगी आठवड्यातून दोन-तीन 'संध्याकाळी' (म्हणजे संध्याकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत) फिरायला, मौजमजा करायला जाऊ लागतात. त्या प्रकाराला 'डेटिंग' म्हणतात. प्रत्येक मुलगा व मुलगी प्रत्येक जणावरोबर डेटिंगला जातात. त्यातून कुणातरी दोघांचे थोडे जमले म्हणजे तीच दोघं सतत डेटिंग करतात. याला 'स्टेडी डेटिंग' म्हणतात. 'John and

Joan are going steady, ' अशी कुजबुज सुरू होते. चार-सहा महिने 'स्टेडी डेटिंग' केल्या नंतर ते विवाहबद्ध होणार असं सर्वजण समजतात. कांही-जण विवाहबद्ध होतात व कांही दुसऱ्यांशी डेटिंग करायला लागून पहिला संबंध तोडून टाकतात.

ह्या पद्धतीतून अगदी चौदा-पंधरा वर्षांची कोवळी मुलं शारीरिक आकर्षणाला प्रेम समजून लग्नाच्या जाळ्यात अडकू पाहतात. अठरा वर्षाचं कायदेशीर वय प्राप्त होताच लग्न करतात. लग्न होताच आईबापाचं घर सोडावं लागतं. आई-बाप सहसा आर्थिक मदत करात नाहीत. शिक्षण सोडून नोकरी करावी लागते. चांगली नोकरी मिळत नाही. जीवनमान खालावते. मुलं व्हायला लागतात. कोवळ्या वयाचे आई-बाप ही जबाबदारी पार पाडण्याला असमर्थ ठरतात. शारीरिक आकर्षण नाहीसं होतं व त्या बरोबरच नसलेलं प्रेमहि वितळून जातं. मग कुरबुरी व भांडणं होऊन घटस्फोट होतो. पांच विवाहा पैकी एक विवाह पहिल्या दोन वर्षांतच मोडतो अशी आंकडेवारी अमेरिकन निरीक्षकांनीच दिलेली आहे. दहा-दहा वीस-वीस वर्षे संसार करून, मुलाबाळांची पर्वा न करतां घटस्फोट घेतल्याची कितीतरी उदाहरणं आहेत. सुप्रसिद्ध धनवान, मुत्सद्दी व न्यू यॉर्क राज्याचा गव्हर्नर वेल्सन रॉकेफेलर ह्यानं एकतीस वर्षं संसार केल्या नंतर केवळ दुसऱ्या एका स्त्रीशी विवाह करण्यासाठी आपल्या पत्नीला घटस्फोट घ्यायला लावला. ती दुसरी स्त्रीहि विवाहित होती. तिनं आपल्या चार लहान मुलांची पर्वा न करता पतीपासून घटस्फोट मिळविला व तीन आठवड्याच्या आत रॉकेफेलरचं आणि तिचं लग्न लागलं. ह्या घटनेनं अमेरिकन समाजात सुद्धा मोठी खळबळ उडाली व रॉकफेलरची अमेरिकेचा अध्यक्ष होण्याची संधी गमावली नसली तरी दुरावली. अमेरिकेत विवाह हा एक संस्कार नसून करार आहे. भागीदारांचं पटणार नाही तेव्हा तो मोडायचा. भागीदारांचं न पटायला कांहीहि कारण पुरतं. एकदा कुरबुरीला सुरुवात झाली की ती मिटणं कठीणच. मिळतं घेण्याची, आपल्या मनाचा आग्रह सोडण्याची, आपलं व्यक्तित्व दुसऱ्याच्या व्यक्तित्वात विलीन करण्याची भावना आढळत नाही. पतिपत्नि मिळून एक व्यक्ति ही कल्पना तर त्याच्या पासून दहा हजार मैल दूर आहे. प्रारंभीच्या कुरबुरी अपत्यप्राप्ती नंतर दूर होतात असा आपला अनुभव आहे. पण अमेरिकेत अपत्यप्रेमाचं सामर्थ्य ही गोष्ट साध्य करायला अपुरं पडतं. त्यामुळे कुटुंबाला एकत्र ठेवणारा दुवाच अमेरिकेत कच्चा आहे. म्हणून जुनी कुटुंबं मोडणं व नवी तयार होणं हे रजिस्टर्ड कंपन्या स्थापन होणं व निकालात निघणं या सारखी एक कायदेशीर बाब आहे.

घटास्फोटा संबंधीचे कायदे निरनिराळ्या राज्यात निरनिराळ्या प्रकारचे प्रकारचे आहेत. कांही राज्यात बरेच कठीण तर कांही राज्यात अगदी सोपे.

न्यू यॉर्क राज्यात फक्त व्यभिचाराच्या कारणावरून घटस्फोट घेता येतो. तर नेव्हाडा व आयडाहो वगैरे राज्यात कुणाहि अमेरिकन नागरिकाला सहा आठवडे वास्तव्य करून 'मानसिक क्रौर्य (Mental cruelty) हे कारण देऊन घटस्फोटासाठी अर्ज करता येतो व तो सहज मिळतो. रॉकेफेलटच्या पत्नीनं नेव्हाडामध्ये राहून व मिसेस् मर्फीनं (सध्याची रॉकेफेलरची पत्नि) आयडाहोत वास्तव्य करून अशा रीतीने घटस्फोट मिळविले. अमेरिकन समाज या बाबतीत उदासीन आहे. रॉकेफेलरच्या घटस्फोटानं व त्याहि पेक्षा नंतर मिसेस् मर्फीशी झालेल्या त्याच्या विवाहानं बरीच खळबळ माजली पण ती तेवढ्या पुरतीच असते. रॉकेफेलर हा मोठा माणूस, गव्हर्नराच्या पदावर असलेला व अध्यक्षाच्या पदाकडे वाटचाल करणारा, म्हणून त्याच्या घटस्फोटाचा व पुनर्विवाहाचा थोडा गवगवा झाला. सामान्य व्यक्तीच्या बाबतीत कुणी लक्षहि देत नाही. आणि समाज अशा सामान्य व्यक्तींनीच बनलेला असतो. तेव्हा अशा घटना अमेरिकन समाजात सर्रास चालू असतात व पचून जातात.

आर्थिक बाब हीहि कुटुंबाच्या ऐक्याला पोषक अशी गोष्ट आहे. लहानपणी आई-वडील मुलांची सर्व जबाबदारी उचलतात. मुलं मोठी झाल्यावर त्यांनी आपल्या वृद्ध मातापित्यांची जबाबदारी घेतली पाहिजे अशी आपली कल्पना, योजना व पद्धत आहे. अमेरिकेत आर्थिक स्वातंत्र्य फार महत्वाचं मानलं जातं. अगदी लहानपणा पासून मुलांना व मुलींना कांही तरी मिळविण्यासाठी उत्तेजन दिलं जातं. आठ-दहा वर्षांच्या मुलामुलींनी आपल्या कपडयालत्या पुरते पैसे कमवावेत अशी अपेक्षा असते. व पुष्कळ प्रमाणात ती पूर्ण होते. वडील कितीहि श्रीमंत असले तरी उच्च शिक्षणाला शक्य तो हातभार लावीत नाहीत. मुलामुलींना ते आपल्या प्रयत्नाने पूर्ण करावे लागते. अशा रीतीने लहानपणापासून स्वावलंबनाचे धडे मिळाल्यामुळे, व स्वतःचे उच्च शिक्षण स्वतःच पूर्ण केले असल्यामुळे, मुलांना आई-बापाची फारशी जरूर वाटत नाही. पुढे तर अडगळच वाटायला लागते. दोघात दुरावा उत्पन्न होतो. स्वावलंबनाचे जे कांही फायदे आहेत ते सर्व जमेला धरूनहि कौटुंबिक जीवनाच्या दृष्टीने विचार करता असेच म्हणावे लागेल की परस्परांची उपयुक्तता पटविणारा हा दुवा अमेरिकेत नसल्या सारखाच आहे. त्यामुळे स्वतःच्या पायावर उभे राहण्याला समर्थ होताच पशुपक्ष्यांची अपत्यं जशी निघून जातात तसाच कांहीसा प्रकार अमेरिकेत होतो. यातूनच वृद्धांचा प्रश्न निर्माण झाला आहे. आईबापांचं जिव्हाळा, उत्कट प्रेम, आर्थिक सहाय्य वगैरेंचा अनुभव न मिळालेल्या मुलांना त्यांच्या विषयी कांही न वाटल्यास आश्चर्य नाही. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना अमेरिकेत इतक्या अफाट व अचाट आहेत की पतिपत्नींना परस्परा खेरीज इतर

अनुक्रमणिका

सर्वांची अडचण व अडगळ भासायला लागते. म्हणून वृद्ध आई वापांना आपल्या घरी न ठेवता एखाद्या वृद्धांश्रमात ठेवणेच सोयीचे असते. पुष्कळ वेळा आई व वाप एकत्र राहताना सापडतच नाहीत. म्हणजे त्यांचा घटस्फोट होऊन दुसऱ्याशी लग्ने करून ती कुठच्या कुठे गेलेली असतात. आपले आईवाप म्हणून त्यांचा विचार करणं मुलांना फार जड जातं. अमुक स्त्री आपली आई आहे असं न वाटता अमक्याची पत्नि आहे अशीच कल्पना त्यांच्या मनात येते. मग तिचं पुढच्या जीवनात कांही झालं तरी मुलांना त्यावद्दल काय व का म्हणून वाटावं? तेच वापाच्या वावतीतहि. अगदी तिऱ्हाईतपणा निर्माण झाल्यास नवल नाही. मी एका कुटुंवात जेवायला गेलो होतो. मिस्टर व मिसेस् व त्यांचा लहान मुलगा व मी जेवत होतो. मिस्टरची आई विधवा होऊन वारा वर्षांपासून त्याच्याकडेच राहत होती. आमचं जेवण संपता संपता ती आपल्या खोलीतून तिथे आली. तिचा व माझा परिचय करून देण्यात आला. थोडयाच वेळात एक वृद्ध गृहस्थ आले. त्यांचाहि परिचय झाला. त्यात मजा कळलं की माझ्या 'होस्ट'ची वृद्ध आई (वय सुमारे साठ वर्षे) व ते वृद्ध गृहस्थ लवकरच विवाह-वद्ध होणार आहेत. दहा मिनिटातच ती दोघं जायला निघाली तेव्हा माझ्या 'होस्टनं' त्या वृद्ध गृहस्थाला आपल्या आईला अनुलक्षून म्हटलं, "Take care of my little girl." याहून अधिक तिऱ्हाईतपणा व अलिप्तता ती काय असू शकणार ! हा एकच प्रसंग अमेरिकन कुटुंवांच्या सर्व अंगावर प्रकाश टाकण्याला पुरेसा आहे.

कुटुंव संस्थेची वाताहत झाली आहे. त्यामुळे नवीन पिढी जास्तच वेलगाम वनत चालली आहे. गुन्हेगारी वाढत आहे. मानसिक आजार पसरत आहेत. नीतिमत्ता खालावली आहे. याची जाणीव कांही अमेरिकनांना आहे. त्या संवंधी संशोधनहि केलं जातं. लेख लिहिले जातात. पण तेवढयावरच ते थांवतं. तरुण पिढी तिकडे लक्ष द्यायला तयार नाही. सध्याच्या व्यवस्थेत (?) जी कांही मौजमजा त्यांना करायला मिळते तिच्यावर पाणी सोडण्याची त्यांची तयारी नाही. त्यामुळे भविष्यकाळात अमेरिकन कुटुंवाचं काय होणार हे त्यांनाच माहीत नाही. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ इतर देशात जाऊन तेथील समाजजीवनाचा व कुटुंवपद्धतीचा अभ्यास करतात. त्यावर टीका करतात. दोष दाखवतात. उपाय सुचवतात. पण स्वतःच्या देशातील परिस्थितीचा विचार करीत नाहीत. त्यांना आपल्या देशात कांही विचार करण्यासारखं गंभीर आहे असं वाटत नाही. किंवहुना या प्रश्नाचा विचार केल्यास, संशोधन केल्यास, कांही तरी भयानक उघडकीला येईल अशी त्यांना भीति वाटत असावी. इतर देशातील संशोधका-जवळ हे काम करण्यास आवश्यक असलेला पैसा नाही व अमेरिकेला जाऊन असं

अनुक्रमणिका

संशोधन करावं अशी बुद्धीहि नाही. जे जे अमेरिकन ते ते चांगलं, प्रागतिक असा आपला समज. परंतु कुणी तरी अमेरिकनांना त्यांच्या पाया खाली काय जळतं हे दाखवून द्यायला हवं. ते त्यांच्या व जगाच्या कल्याणाचं होईल.

वरील विवेचना वरून अमेरिकेत कुटुंब पद्धति मोडकळीला आली आहे, व असेच कांही दिवस चालल्यास अजीबात मोडून जाईल असं वाटणं साहजिक आहे आणि त्यात खोटं कांही नाही. अमेरिकन समाज त्या अवस्थेकडे धाव घेत आहे. पण याचा अर्थ अमेरिकेत कुटुंबजीवनच नाही असा मात्र कुणी करून घेऊ नये. शेकडा नव्वद लोक तरी कुटुंबात राहतात. कुटुंबं मोडतात व नवी बनतात. पण कुटुंबं असतात. जो पर्यंत सर्व सुरळीत चाललेलं असतं तो पर्यंत कुटुंबातील वातावरण आपल्या कडील कुटुंबातील वातावरणासारखंच असतं. आई–बाप मुलांवर प्रेम करतात, जवळ घेतात, मांडीवर खेळवतात, आजारपणात काळजी घेतात. बऱ्याच कुटुंबात आईबाप व मुले यांचे संबंध फार प्रेमाचे असतात, सणावाराला आप्तेष्ट मंडळी एकत्र जमणं, मेजवान्या झोडणं, गप्पागोष्टी, थट्टाविनोद, खेळ वगैरेत वेळ घालविणं वगैरे आपल्या कडल्या प्रमाणेच आहे. आपल्याकडेहि सर्व कुटुंबात सारखंच वातावरण नसतं सौहार्द, आत्मीयता वगैरेंच्या बाबतीतहि आपली कुटुंबं सारख्याच पातळीवर नसतात. पाश्चात्यांच एकदरीनं भावजीवन कमी उत्कट असतं. आपल्याकडेहि असे अनेक लोक आहेत. अमेरिकेतहि आईबाप व मुलं एकमेकाविषयीं प्रेम व आदर बाळगणारे, एकमेकांना सहाय्य करणारे, असे पुष्कळ माझ्या पाहण्यात आले आहेत. कुटुंबवत्सल माणूस अजूनहि तिथे समाजाच्या आदराला पात्र होतो. माजी अध्यक्ष आयसेनहॉवर यांच्या सर्व गुणांवर मात करणारा गुण म्हणजे ते एक कुटुंबवत्सल गृहस्थ आहेत. त्यामुळेच त्यांना दोन्ही निवडणुकांमध्ये खूप मतं मिळाली. याच्या उलट त्यांचे प्रतिस्पर्धी अडलाय् स्टीव्हन्सन यांना १९५२ च्या निवडणुकीत कमी मतं पडली. कारण दरम्यान त्यांचा घटस्फोट झाला होता. ह्या दोन्ही निवडणुकांचा जो सर्व्हे करण्यात आला आहे त्याच्या रिपोर्टात ही गोष्ट नमूद करण्यात आली आहे. एखाद्या विषयी चांगलं बोलताना "oh, he is a good Family man." असं म्हंटलं जातं. तेव्हां अमेरिकेत कुटुंबं ह्या संस्थेला कांहीच महत्व नाही असं समजूं नये. कुटुंबाला, कुटुंब करून राहण्याला महत्व आहे. मग नाही काय ? कुटुंब ज्या पायावर आधारलेलं असतं तो शुद्ध विवाहाचा पाया नाही, आणि ज्या रज्जूंनी ते बांधलं जातं व टिकून राहतं ती अपत्य प्रेम, आर्थिक परस्परावलंबित्व व्यक्तित्वाचं विसर्जन, त्याग वगैरे गोष्टींचं संरक्षक बंधन नाही. त्या मुळे कुटुंब ही टिकाऊ संस्था राहिली नाही. अमेरिकनांच्या पुढे खरा प्रश्न हाच आहे. कुटुंबांची अस्थिरता नष्ट करून ती टिकाऊ बनवणं व त्यांना केवळ कायदेशीर

स्वरूप न देता धार्मिक व नैतिक आधारावर उभी करणं ही खरी कामगिरी आहे. अमेरिकन कुटुंबा विषयी या लहानशा लेखात सर्व बाजूंनी विचार करण्यात आला नाही. तसा शक्यहि नव्हता. पुष्कळशा चांगल्या व वाईट गोष्टी राहून गेल्या आहेत. तरी अमेरिकनांवर अन्याय होणार नाही अशा रीतीने त्यांच्या कुटुंब-पद्धतीचे थोडक्यात विवेचन इथे केले आहे.

संत तुकारामांचे राजकीय विचार (पृष्ठ २८ वरून)

गाई वेल्या म्हैसी ॥' (पृ. १९७–अ ११०६.) 'राम राज्य राम प्रजा लोकपाळ। एक चि सकळ दुजे नाही ॥— तुका म्हणे अवघे दुमदुमिलें देवें। उरले ते गावें हेंचि आता ॥' (पृ. २३२–अ. १३२६)

'धर्मार्थफलप्रद राज्य' हीच तुकारामांची आदर्शराज्याची कल्पना दिसते. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' हेच त्याचे लक्षण व धर्मसंस्थापना हाच त्याचा हेतु होय. तुकारामांची ही कल्पना प्राचीन भारतीय कल्पनेशी व रामदासकृत आदर्श रामराज्याच्या वर्णनाशी तंतोतंत जुळणारी आहे.

ह्या सर्व विवेचनावरून दिसून येईल की तुकाराम महाराजांना राजकीय दृष्टि नव्हती हा सर्वसामान्य समज बरोबर नव्हे. ही गोष्ट खरी की त्यांनी-आपले लक्ष भगवद्भक्तीतच केंद्रित केले होते, व त्यामुळे राजकीय जीवना-पासून त्यांनी स्वतःला पूर्णपणे अलिप्त ठेवले होते. परंतु त्याच कारणाकरिता त्यांनी स्वतःल व्यावहारिक जीवनापासूनहि अलिप्त ठेवले होते. तरी देखील त्यांना ज्याप्रमाणे सामाजिक दृष्टि होती त्याचप्रमाणे राजकीय दृष्टिहि होती त्यांचे राजकीय विचार अल्पसे, विखुरलेले, स्फुट स्वरूपाचे व बव्हंशी अप्रत्यक्ष दाखल्यांच्या रूपाने असले तरी त्यातून तुकारामांची एक सुसंगत राजकीय दृष्टि व्यक्त होण्यास ते खात्रीने पुरेसे आहेत.

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने)

अस्तित्व शंका

विस्तार हा माझ्या मनाचा लाजवी गगनासही
अन् किनारा भावनांचा लाजवी क्षितिजासही
लाजवीते चंद्र सूर्या स्पर्शता चैतन्य माझे
ना कळे परि कोण मी अस्तित्व माझे कोणते ? ॥१॥

मन्मनाच्या सागराचे पाहुनी नर्तन तरंगी
ओसरे भरती विशाला सागराच्या पृष्ठभागी
पंख नसता धावणारा कालही क्षणअेक थांबे
ना कळे परि कोण मी अस्तित्व माझे कोणते ॥२॥

तीव्रगति माझ्या मनाची तोकडी किरणांसही
कौशल्य माझ्या निर्मितीचे तोकडे ब्रह्म्यासही
झेप माझ्या कल्पनांची दिशादिशांना व्यापते
ना कळे परि कोण मी अस्तित्व माझे कोणते ॥३॥

अुभवितो सामर्थ्यशाली भावनांचो मंदिरे
घडवितो या मर्त्यलोकी अमरतेची साधने
शब्द माझे आगताच्या पावलांना वाट देते
ना कळे परी कोण मी अस्तित्व माझे कोणते ॥४॥

तापलेल्या जीवनाच्या आसवांना पाहुनी
भान विसरे वर्षण्याचे मेघमाला अंबरी
दर्षता कारुण्य माझे तप्त भू गंधावते
ना कळे परि कोण मी अस्तित्व माझे कोणते ॥५॥

वाट माझ्या पावलांची पाहुनी आकाशगंगा
पेरिते नभ–तारकांच्या जागजागी चिन्हरांगा
मार्ग होतो मोकळा वळतात जिकडे पाअुले
ना कळे परि कोण मी अस्तित्व माझे कोणते ॥६॥

——राम बेटावदकर

अनुक्रमणिका

उशिरा तिसऱ्या प्रहरी

उशिरा तिसऱ्या प्रहरी मळमळीत पाउस पडला
पाणचट वेचव प्रकाश उगीच होता अडला
निरुत्तर बनले ढग वीज चेतत नव्हती
एक चिंधी उडवीत उडाले वारे भवती ॥१॥

कावकाव कावळे होते कंगाल पिंपळाच्या पोटात
ओला बंगाळ उच्चार अर्धवट मातीच्या ओठात
गिरणीच्या धुराचा मळवट मळकट आडवा लांब
बोडकेच दोन भैय्ये एक रोडकाच खांब ॥२॥

दारांच्या फटीफटीत फटफटीत पाहे रस्ता
तारांच्या अटितटीत राहे लटकून दिवा नुस्ता
ऐन सांजवेळीच पश्चिमा लाल नव्हती
दूर तिकडे एक चिताच भडकत होती... ॥३॥

—रा. अ. काळेले

झरोक्यातल्या चंद्रकलेला—

झरोक्यातल्या चंद्रकलेला
कळले आहे... कळले आहे..
चित्रांमधल्या वळवंतावर
इथे काजवा झुकतो आहे
अंधारावर अनंग अक्षर
झरकन चमके, झरकन विझते...
अर्थांमधल्या मनोगताला
वाचायाची संधि न मिळते
वाचायाची संधि न मिळते....

तेच परंतु गाणे होते
स्वर शब्दाविण अैकू येता
अंगांगाची वीणा होते
वीणेच्या अन् तारावरती
गाणे स्फुरते--गाअु नये ते....
झरोक्यातली चंद्रकला अन्
संकोचाने ढगात शिरते.

—सरला भोळे

अनुक्रमणिका

अशा काळोखात :

काळोखाची रात
भेसूर शांतता
येते उधळीत
तिमिरी वुडते
आभाळाचे मन
विशाद ओकीत
सुटता झुळूक
पुलकीत होते
अंतरीची आग
जाळीत सुटते
फुलत्या कळयांची
नवतीची वाग
मध्येच श्वानाची
भेदक विव्हळ
चिरते शांतता
कापीत काळोखा
काकाची आरोळी
विदारी मानस
वाऱ्याच्या कानात
अंगार भरीते
काळोखाचे गीत
आतली निराशा
नाचते वेताल
अशा काळोखात....

—यशवंत मनोहर

अेक राहिले हरायचे

गंधवती मी भरल्या ओटी
गेत सांडते कणा कणात
अूबदार त्या कुंशीत विरता
निळया नभावर हंसे पहाट

मिठीत हंसऱ्या शहारताना
स्वर्ग सुखाला नसतो काठ
सर्द मेंदीच्या तळात फुलते
सप्त जन्मिची चंदनवाट

तळ हाताची पुतळी माझी
स्वप्न गोंदले नभावरी
प्रपंचात ह्या व्रम्ह रंगले
पुंडलिकाच्या वि टे व री

अमृत पैजा जिंकुन झाल्या
अेक राहिले हरायचे
तव रूपाला जपता जपता
सांवलीत त्या विरायचे

—केशव बोबडे

अनुक्रमणिका

आला आषाढ धावुन :

संत सज्जनांचा मेळा
आला आषाढ गाठून
उभी पंढरी थाटली
बुका भंडारा लेवून
लाह्या प्रसादाची वाटी
भक्ता वारकऱ्या हाती
गंधफुलांनी भरली
माय रुक्मिणाची वटी
स्तब्ध चोख्याची समाधी
हरवून गेली भूक
आला आषाढ धावून
करी धारांचा अभिषेक

—सुखराम हिवराळे

तहान—

अनंत जाहले
माथ्यावर पाप
हृदयाला धाप लागे माझ्या

देह हा पेटला
अतृप्तीचा ताप
जीवनाचे माप रक्ताळले

थेंबाची तहान
वैष्णवाचा भाव
तुझ्याकडे धाव आता माझी

—कुसुमानंद

अवसेच्या अंधारात—

अवसेच्या अंधारात
काजळले सायंगीत
काळचा वाभूळ वनात
अता जागला एकांत

नीज दाटून डोळ्यात
पर्णसभा विसावली
विष तमाचे पिऊन
डोळे मिटते पाकळी !

खुळा मंथर अनिल
स्तब्ध निजला मुकाट
घाव वसता जिव्हारी
कण्हतसे पायवाट

दूर पश्चिम—क्षितिज
खिन्न उदास उदास
संथ जलात नाहती
काळ्या वृंध्यांचे राक्षस

मिट्ट दाटला काळोख
अंधारले निशागीत
दूर कुठे आर्तसूर
गात वसे दिवाभीत

—विजय गो. देवगीरकर

चंद्रफूल

चंद्रफूल उमलता बिसतंतू होई गळ
खोल रुतलेली कळ
जन्ममृत्यूच्या वेशींनी खुली अवघ्यांना वाट
बंद परी माझी दिठ
अंध वणव्यांनी माझी धडधडते अस्मिता
जळण्याने रिता माथा
स्थिर तेवणारी धग, कोंदलेली जीवनता
विना जगता मरता !

—गोविंद जोशी

कविता

काळोख दिला तूं मज सारा
मी म्हटले "प्रकाश देऊ का"?
मालवल्या श त दी पां ना
ज्योतींचे तोरण लावू कां ?

डोळ्यात झरे जरि दु:खाचे
हृदयात अग्निही साहीन मी
या दोन जिवातिल बंधन हे
मजसाठी तू, तुजसाठी मी

नयनांच्या तव शिंपामध्ये
मम अश्रुंचे स्वातींबिंदू
गळताच मनाला भासतसे
हा आसमंत मौक्तिकसिंधू

तव नयनच माझे विश्वगोल
मज ब्रह्म वेगळे ते न कळे
जीवन पुष्करणीवरची ही
कां अशी विलगली कमलदळे ?

हा चंद्र न आता चंद्र असे
ही पुनव गमे भेसूर अमा
हे असे जिव्हारी दु:ख सले
ना यास मूळ ना अंतसिमा

काळोख दिला तू मज सारा
मी म्हटले "प्रकाश देऊ कां"?
मालवलेल्या श त दी पां ना
ज्योतींचे तोरण लावूं कां"

—कृष्णा चौधरी

पूर अश्रुंचा चालला

अंधुकसे नाते तुझे
रोज मनी रुजायचे
भविष्याच्या ओंजळीत
भाव स्वप्न फुलायचे

असे होते माझे स्वप्न–
नाही सांगणार कुणा
अंधाराच्या हृदयात
जळू लागल्या वेदना

माझी जळती वेदना
जागविते साऱ्या जना
नको नको झाला अता
वेड्या प्रीतीचा उखाणा

वेड्या प्रीतीचा उखाणा
मंत्रमुग्ध करी मला
नयनांच्या काठावर
पूर अश्रूंचा चालला

पूर अश्रूंचा चालला
कण कण वेडावला . . . .

–म. ना. श्रीखंडे, वरूड

आ ई

तुझ्या मायेवीण आई
कोणी पोरके नसावे
डोळियात साठलेले
दुःख तुवां हासवावे

पंखहीन पाखराला
तुझी सोबत असावी
रोज चिमण्या चोचीत
चारा घालीत बसावी

तुझ्या मायेची मिळावी
आई लेकरांना छाया
तुझ्या मांडीवर व्हावी
रोज पुलकित काया

साऱ्या जगाची कौतुके
तुझ्या मायेत भिजावी
आई, शिणलेली काया
तुझ्या कुशीत निजावी

तुझ्या वात्सल्याचे ऋण
तुझ्या देखत फिटावे
तुझ्या मायेवीण आई
कोणी पोरके नसावे

–बाबा मोहोड

अनुक्रमणिका

नंदादीप

प्रशांतशा देवालयी
नंदादीप उ ज ळ त
मंद मंद दिव्य ज्योति
मूर्ति न्हाते दिव्यत्वात !!

उजळता नंदादीप
लोपलासे तम घोर
शांत झाले स्थिरचर
चित्त करुनिया स्थिर !!

लोप होई नैराश्याचा
उजळता नं दा दी प
विसरून प्रपंचाला
आत्मा होतो एकरूप !!

—ना. मा. तलारवार

जाग—

आज मीरेच्या मनीचे
सारे विसावले भाव
लोपे मृत्तिकेचा गंध
होती पैंजण निरव
वीणा लाजली कांहीशी
टाळ ओशाळून गेले
लागे कंचुकी सुटाया
नेत्र पान्हावून गेले
अशी जाग ही आगळी
गंध प्रकाशाचा मेळ
कर किरणी गुंफून
धळी फूल हे अबोल

—वि. गु. गोंडचौर

कळीपण

अर्धस्फुट नव
कलिकेला या
पूर्णपणाचा स्पर्श नसावा,
त्या फुलवेड्या वायूने ही
कां फुलवावी ?

* * *

कळीपणाचे काजळ लेवुन
हिच्या मनाच्या शुभ्रपणाने
नियतीच्या नित नश्वरतेवर
निर्भयतेने
नजर धरावी.

* * *

कलिकेच्या या
गळचा भोवती
अमराचा मधु पाश असावा,
या पाशाच्या पाकळणाऱ्या
स्पर्शाने पण,
हिच्या कोवळचा कळीपणाची
कळा जपावी.

—प्रा. हिं. ए. चव्हाण

अनुक्रमणिका

सांजावताना

सांजावताना, वाऱ्याच्या गंधगर्भलयीनं
आकाश ओथंबून येतं,
हर्षोन्मादानं पानापानातून
हसताना सोन्याचं हसू सांडतं
सांजावताना,
गांव कोसाच्या ऊध्वस्त देऊळातहि दिवे लागतात . . .
शेतावरुन परतलेल्या गुरावासरांनी—
वाटा. . . . वाटा कशा गजबजून निघतात.
दूर. . दूर . . दाटतात सूर
पाखरांचे थवे किलविलत असतात
तशाच किलविलत जाणाऱ्या बायका
स्वप्नांची झुंबरं उराशी कवटाळून
प्रत्येक पाउलाला बहरुन जातात
सांजावताना, पांखरांसारख्या

—ना. धों. महारनोर

मनी भाववेडे कुणी गीत गाते

शरद् चंद्रिकेची प्रभा साथ देते
मनी भाववेडे कुणी गीत गाते
सुरंगी सुमांचा मधू गंध येतो
हृदी हर्ष उन्माद मोहरुन जातो
सुगंधे जवानी जणू धुंद होते
पवन्यास झंकारुनी ताल घ्यावा
ध्वनि कर्णमंजूळ पायी घुमावा
तसे मूक संगीत साकार होते
फुले रात रंगीन निळ्या नंदनात
मृदू भावना त्या उरी हालतात
तनू रम्य रोमांच मंडीत होते
नवा नूर गाली खुले यौवनाचा
चढे रंग नयनी मधू मीलनाचा
खुषी अंतरीची रतीरुप होते

—राजनकुमार

अनुक्रमणिका

झाले जग ते जुने !

आक्रमणाचे, विस्ताराचे, झाले जग ते जुने ।
अवलंबी जो, होअि तयाचे, लाजिरवाणे जिणे ।।
अितिहासाच्या पानोपानी, भरली जी वर्णने ।
दिसते तेथे आक्रमकांचे, मध्य युगाचे जिणे ।।
आक्रमणातच धन्य मानले, ज्यांनी नित वर्तणे ।
झाले त्याचे जीवन जगती, क्षणा क्षणाला अुणे ।।
निष्पाप जिवांचे रक्त सांडुनी, तुमुल लढविली रणे ।
झाले अंशा आक्रमकांचे, मरणप्राय जिणे ।।
चंगीझ, घोरी, तैमूर, नादिर ।
नेपोलियन् तसा तो हिटलर् ।।
होते अुलटे काळिज त्यांचे, अुरफाटी ती मने ।
वावटळी सम घेत निघाले, रणा मागुनी रणे ।।
आक्रमणाची अशी राक्षसी, करिता पारायणे ।
'दीप–पतंगा' सम जगि त्यांचे, झाले खाक जिणे !!
कशास सत्ता, कशास मत्ता—
कशास हे मातणे !
माती असता, मातित मिळणे
कशास मस्तावणे !!

स्वामित्वाचे, मुलुखगिरीचे—
झाले जीर्ण जिणे ।
बंधुत्वाचे, समानतेचे—
नूतन येअि जिणे ।।
शिकतो आता चीन नव्याने, धडा तोच गिरविणे ।
शिकला भारत 'रग' अंशांची, पुरेपूर जिरविणे ।।
कोटी चाळिस एक जाहली, हृदये आणि मनें ।
अुभा ठाकला समस्त भारत, छातीठोकपणे ।।
धजेल जो जो करण्या चाळे—
मध्य युगाचे जुने ।
खात्री पटविल भारत त्याची—
'झाले जग ते जुने' ।।

—शंकरराव कुळकर्णी

त री ही

पायांमध्ये पुढती पुढती
जाण्याची तर धमक असावी
तरीहि त्यांना ल्हान मोठी
एक ठराविक वाट नसावी ! ॥ १ ॥

कांठोकाठ भरलेले तर
ओठांमध्ये शब्द असावे
ओसंडाया तरीहि त्यांना
विषय नेमके कधी नसावे ॥ २ ॥

दृष्टी पुढती बघावया तर
नाना रंगी सृष्टी यावी ।
डोळ्यांवरती तरिही रंगित
एक कोणती कांच नसावी ! ॥ ३ ॥

नवे नवे तर घडवायाची
हातांमध्ये हौस असावी
घडवायाच्या वस्तूंना पण
पोलादाची फ्रेम नसावी ! ॥ ४ ॥

हृदयी तर नित सुखदुःखांनी
सदैव खळबळ करित रहावी
तरीहि त्यांना मोजायाची
शिष्टपणाची रीत नसावी ! ॥ ५ ॥

—शं श्री. वाशीकर

अनुक्रमणिका

तुटला तन्मणी

अव सुनबाई, सजव पानदान
माझ्या मालनची सासू, आज येणार विहीण
रामटेकी पानं, नीट ठेवावी पुसोनी
रोठा सुपारी, थोडी ठेव कातरूनी
केतकी कातगोळ्या, दोडे चिकण सुपारी
हलक्या हातानं, वर्ख लावावा सोनेरी
दोन केशराच्या काड्या, टाकून चुन्यात
मग मिसळावा, थोड्या गुलाबपाण्यात
आज वसंत पंचमी, तशा येणार विहिणी
नेस हिरवी शेलारी, लेई नवा तन्मणी
कावं तोंड उतरलं, काहून आलं डोळा पाणी
हळू तोंडात बोलते, गेला तुटून तन्मणी
घाबरली सुनबाई, जाई गळ्याकडे हात
राग आला तिकडचा, अश्रु आले नयनात
लाजेनं गाल लाल, नेत्र पाहती धरणी
सासुबाई झाल्या चूप, गेल्या हंसत उठोनी

—सौ. सरस्वती सुभेदार

मंगल चरण

—ना. रा. शेंडे

स्वातंत्र्या पूर्वी—

ते एक छोटंसं गाव. गंगापूर त्याचं नांव. त्या गावाच्या एका टोकाला एक घाणेरडा नाला वळसा देऊन गेलेला. त्या नाल्याच्या एका बाजूला घनदाट अंबराई तर दुसऱ्या बाजूला अगदी गलिच्छ असलेल्या भागात महार, मांग, चांभार आदि अस्पृश्यांचा मोहल्ला. पावसाळ्यात नाला खचत जायचा—अस्पृश्यांच्या तणसाच्या व कुडाच्या भिंती असलेल्या झोपड्या दरसाल वाहून जायच्या ! शेतमजुरी हाच त्यांचा व्यवसाय. अर्धपोटी उपाशी राहून आपले रखरखीत जीवन ते जगत ! पावसाळ्यात नाल्याचं गढूळ पाणी ते पीत आणि उन्हाळ्यात नाल्यातील वाळू कमरकमरभर उपसून जे कांही ओंजळ ओंजळ पाणी लागे त्यावर ते आपली तहान भागवीत. नाही म्हणायला सवर्ण हिंदूंच्या मोहल्यात तशा दोन तीन विहिरी असूनहि अस्पृश्यांना दुरून कां होईना पाणी देण्यास कोणी तयार होईना. गावात एक दोन लहान देवळं होती. पण पायरी जवळूनहि दर्शन घेण्यास मनाई होती. हिवाळ्यात गावाच्या अंवतीभंवती भरदार शेती कशी डौलाने डुलायची. पण ज्यांच्या श्रमावर, निढळाच्या घामावर ती उभारून येई त्या अस्पृश्यांना तिचं भरदार यौवन—मुसमुसलेले सौंदर्य केवळ एक नजर टाकूनच समाधान मानून घ्यावं लागे. आठवड्या किंवा पंधरवाड्याकाठी पोटासाठी कांही मिळावे म्हणून अस्पृश्य शेतमालकांना अजीजी करीत, मिनतवारी करीत पण त्यांच्या मुखावर अपशब्दांची लाखोलीच वाहिली जाई !

गंगापूरच्या सर्व अस्पृश्यांची माधव महारावर मोठी निष्ठा होती, मोठा लोभ होता. माधव महार तसा कांही शिकला सवरलेला नव्हता. पण संतांच्या वाणीचा तो मोठा भोक्ता होता. संत ज्ञानेश्वर, तुकोबा, चोखोबा, कबीर, मीराबाई यांच्या ओव्या, अभंग त्याला मुखोद्‌गत येत. त्यांचे निरूपणहि तो मोठ्या ढंगदार रीतीने करी. तंबोऱ्यावर तो जेव्हा आपल्या गोड वाणीनं भजने गाई तेव्हा श्रोतृवृन्द अगदी तल्लीन होई. असा तो मोठा संस्कृतिप्रिय होता. सूर्योदयापूर्वी आंघोळ व पूजाअर्चा आटोपली पाहिजे. घरात प्रातःकाळीच सडासारवण झालंच पाहिजे अन् सायंकाळी वृन्दावना जवळ पणती जळती राहून नैवेद्य अर्पण व्हावा असा त्याचा दैनंदिन क्रम असे. त्याची धर्मपत्नी गिरिजा हीहि मोठी कष्टाळु व

अनुक्रमणिका

प्रेमळ स्वभावाची होती. गावात कुठंहि कमी अधिक प्रसंग पडला की तिच्या डोळयांत टचकन् आसवं तरळत. कामाधामावरून सायंकाळी ते पति-पत्नी घरी परतले की आधी आपल्या मोहल्यातील सुखदु:खाचा कानोसा घेत.

माधव चाळीशी उलटलेला गृहस्थ होता. त्याला चरण नांवाचा एक गोंडस व मोठा हुशार मुलगा होता. या मुलाच्या पाठिमागे आणखी दोन लहान मुलं होती. आपला छोटासा गरीबीचा संसार नीट चालविण्याची तो काळजी घेई. मुलाच्या जिव्हेवर संतवाणी खेळत रहावी व त्यानुसार वागणुकहि इतरांना आनंद देणारी असावी अशी दक्षता घेण्यात त्यांचा पिता नि माता कसूर करीत नसत.

त्या गावातील अस्पृश्यात केवळ माधवजवळ अवघे दोन एकर शेती होती. भाताचे शेत होते ते. त्याच्या झोपडीच्या वाडीला लागूनच त्याच्या शेतीच्या बांध्या होत्या. एक नांगर, एक वखर आणि दोन बैल ही त्याची संपत्ति. तिच्या बळावर जे कांही पीक येई त्याचा बराचसा वाटा, तो स्वत: अडचणीत राहून, आपल्या दु:खी दलित बांधवांच्या आपत्प्रसंगी कामी आणी. दुसऱ्याचे दु:ख ते माझे दु:ख अशी त्याची कनवाळु वृत्ति होती.

माधवचा आणखी एक विशेष गुण होता. महार, मांग, चांभार, भंगी या जाति एक आहेत. अस्पृश्यात केवळ महार श्रेष्ठ अन् बाकीचे कनिष्ठ असा भेद-भाव पाळणे आपल्या उन्नतीला पोषक नाही अशी शिकवणूक तो देई. त्यासाठी शेतीचे नवीन पीक निघे तेव्हा तो अस्पृश्यातील सर्व जातींना एकत्र भोजन घाल-ण्याचा अथवा कुणाच्याहि येथे लग्नादि कार्य होई तेव्हा सर्वांना एकत्रित आण-ण्याचा जातीने प्रयत्न करी. त्यामुळे अस्पृश्यांच्या जाती जातीत तरी त्या गंगा-पुरात कांही भेद नव्हता. सर्व अस्पृश्य माधवला देवमाणूस मानीत.

आदल्या दिवशी रात्री भानू चांभाराच्या घरी मुलीच्या मागणीच्या निमि-त्तानं सर्व अस्पृश्य एकत्रित झाले होते. माधवहि आपल्या कुटुंबासह उपस्थित होता. सर्वांचे चहापान झाले. माधवनं सर्वांना शुद्ध राहणीची व मुलाबाळांना कसेहि करून शिक्षण देण्याची सर्वांना जाणीव करून दिली. 'विद्या धनं सर्व धनं प्रधानम्' ही म्हण कशीबशी उच्चारून तिचे महत्व पटवून दिले. त्यांनी आणखी दोन गोष्टीवर विशेष भर दिला. श्रमदानानं आपल्या मोहल्यात एक विहीर तयार करायची व एक बालक मंदिर उभारायचं. सर्वांनी मोठ्या आनंदानं होकार दिला. पण भानू चंभारानं चिंतामग्न होऊन विचारलं,

"माधव दादा, इचार त् लई ब्येस हाय. पण जागा हाय कुठं ?"

माधव थोडा वेळ स्तब्ध राहिला. सर्वांचं लक्ष त्याचेकडे केन्द्रित आलं. आपला फेटा नीट सांवरून किंचितसं खेंकरीत माधव गंभीरपणे उत्तरला,

"वन्धूंनो, जागेची चिंता हाय खरी. पण कांहीतरी उपाय तर शोधून काढलाच पाहिजे. पाण्यासाठी आंता किती हाल, किती कष्ट घ्यायचे," क्षणभर नभोमंडळातील चकाकणाऱ्या ताऱ्यांकडे दृष्टि टाकून तो करारी शब्दात म्हणाला,

"ठीक हाय. माझ्या घराची वाडी विहिरीसाठी अन् वाडीकडील दोन बांधा वालक मंदिरासाठी उपयोगात आणा. उद्यापासूनच लागा कामाला." सर्व अस्पृश्यांचा आनंद गगनात मावेना ! उल्हसित वृत्तीनं प्रत्येक जण घरी परतला.

* * *

दुसरे दिवसाची अगदी प्रातःकाळची वेळ. सर्व गावकरी निद्रिस्थ होते. आकाशात शुक्राचा तारा तळपत होता, आणि पृथ्वीतळावर गंगापूर गावाच्या परिसरातील निसर्गसौंदर्य ताऱ्याच्या त्या अंधुक प्रकाशातहि मोठं विलोभनीय दिसत होतं. मधूनच गाईवासरांचा हलकासा हंबरडा ऐकू येई तर मधूनच त्यांच्या गळ्यातील घंटांचा कर्णमधुर निनाद आसमंतात गुंजत असे; आणि मध्येच कोंवड्याचं आरवणं मन प्रसन्न करी.

रात्रीच्या त्या तिसऱ्या प्रहरी गंगापुरातील एका टोकाला नाल्याच्या काठावर वसलेली अस्पृश्यांची वस्ती अगदी शांत होती. परंतु अशाहि निरवतेच्या, निस्तब्धतेच्या वातावरणात स्पृश्यांच्या आणि अस्पृश्यांच्या वसतीचा भेद कुणाहि निशाचराला सुद्धा तीव्रतेनं जाणवल्याशिवाय राहत नसे. त्या मंगल प्रातःकाळी अस्पृश्यांच्या अंधारात दडलेल्या वस्तीत एक साधा दिवा मिणमिणताना आढळत होता. माधव महाराच्या जीर्ण झोपडीतील निरामयतेचे, सात्विकतेचे व मंगलतेचे दर्शन घडविणारा तो दिवा पहाटेच्या त्या रम्य व आल्हाददायक प्रसंगी जसा मोठा सूचक तसा मोठा प्रभावीहि वाटायचा ! थोड्या वेळानं माधवाच्या झोपडीतून जात्याच्या घरघरीचे ध्वनि उमटू लागले. आणि मग लगेच माधवच्या बायकोचे-गिरिजाचे दळण दळताना गायिल्या जाणाऱ्या भावपूर्ण गीताचे मधुर स्वर आसमंतात विहार करू लागले. गिरिजा तन्मयतेनं गात होती—

सारजा माझे बाई कर दळणकांडण ।
तुहा येईल भरतार कर आंसूनं पूजन ॥
सारजा तुझी ओटी भरली खोबऱ्याचे वाटी ।
नथनीच्या लाजेसाठी देव येईल वो पोटी ।
सारजा गुणवंते तुझा झोटा सर्ग आहे ।
डोळे चांदण्या उजाळे पाया धरणीला लागे ॥
सारजा तुझं रूप आभाळात नाहे थोवे ।
गंगीच्या आरश्यात बिंदीचो टिकली लावे ॥

सारजा चंदेरीचा शालु उरावरनं सरे ।
गोरं बदन निर्खून पापी इंदर् ग् झुरे ॥
सारजा गासि गाणे पाताळात नाग डोले ।
राघु मैना–मोर नाचे पिर्त समुद्राले जुळे ॥
सारजा सखी ऊठ कोंबडा बाग देते ।
गोठ्यातील गायमाय बोलाया हंबरते ॥
सारजा तुझी माझी सखी नांदो पुर्थ्वीभर ।
चांद सुर्व्या भाऊ तुझे आण माझ्या घरावर ॥

इतक्यात देवळीतील शंखाचा मंगल ध्वनि कानी पडतो. माधव आळोखे पिळोखे देत उठून गिरिजाला हाक देतो. 'आले हो ऽ' म्हणत जात्याची घरघर थांबते. तोच माधवाच्या चिरंजीवाचा–चरणचा तो अगदी शांतपणे पाठ करीत असलेला संत तुकोबाचा अभंग ऐकू येतो.

समर्थासी नाही वर्णावर्ण भेद, सामग्री ते सर्व सिद्ध घरीं ।
आदराचे ठायीं वहुत आदर, मागितले फार तेथें वाढी ।
न म्हणे सुहृद सोइरा आवश्यक, राजा आणि रंक सारिखेचि ।
भाव देखे तेथे करी लडवड, जडा सारखे जड निराळेंचि ।
कोणी न विसंवे याचकाचा ठाव, विनवूनी देव शंका फेडी ।
तुका म्हणे पोट भरूनी उरवी, आले ऐसे दावी अनुभवा ।

"वा वा! काय ग्वोड अभंग हाय तुकोवा महाराजांचा! चरण, अरे ए बेटा चरण––" माधवनं ममतेनं पुत्राला हाक दिली.

"आलो बावा, आलोऽऽ"ओ देऊन चरण धावतच बापाजवळ आला. मुलाला कुरवाळून माधवनं विचारलं.

"अरे कालपासून एकच अभंग पाठ करतोस व्हय ?"

"नाही बावा. काल ज्ञानेश्वरांच्या चार ओव्या पाठ केल्या. रात्री रामदास स्वामींचे दोन मनाचे श्लोक पाठ केले. अन् आता. . . . ."

"वा लई ब्येस! पण पोरा, ज्या ओव्या, अभंग, श्लोक पाठ करतोस त्यांचा अर्थ घेतोस का समजावून? का नुसती घोकमपट्टी!"

"बावा, परवा नाही का तुम्हांला दोन अभंगाचा अर्थ विचारला. नाही कळलं तर गुरुजीकडून अर्थ समजावून घेतो" चरण अभंगाचा अर्थ सांगू लागतो तो त्याची आई गिरिजा पिठाचं पातेलं घेऊन येत म्हणाली,

"आवो, रातदिस त् पोरगा अभ्यास करतोय्. जीवाला आणखीव् किती हैराण करन्! त्याचा मास्तर म्हणे, तुमचा चरण लई हुशार हाय म्हणून!"

"हाय तसा माह्या गुणी बाळ" हे शब्द उच्चारतो न उच्चारतो तोंच एका गावकऱ्यानं माधवला हाक दिली.

लगबगीनं अंगणात येऊन माधवनं गावकऱ्याला विचारलं, 'का हाय रामू काका ? रामप्रहारी का काम निघालं ?"

"पाटलानं बलावलं हाय तुला अगुदर" जरा कणखर शब्दातच रामू म्हणाला.

"का काम हाय वा येवढ्या रामप्रहरी राणोजी पाटलास ?"

"आरे त्ये मज का इचारत्येस ? काई कामाबिगर का बलावलं असन् पाटलानं, आँ ?"

"व्हं मोहरं रामूकाका. आलोच म्या फेटा बांधून" असं सांगून माधव घरात आला आणि स्वतःशीच कांहीतरी पुटपुटत रामू पुढं गेला.

माधवनं अंगात सदरा घातला डोक्याला फेटा गुंडाळला आणि खांद्यावर कांबळी टाकून तो अंगणात आला. त्यावेळी सूर्योदय होत होता. गिरिजा अंगणभर सडा घालत होती. तिच्याकडे नजर टाकून माधव म्हणाला;

"पाटलाचं बलावणं आहे. जरा भेटून येतो."

"लौकर या. इहिरीसाठी वाडीची जागा देवाची हाय ना आज. समदे येतील तवा तुमी हाजर पाह्यजे ना. नाहीत् नाराज व्हतीन सर्वे." गिरिजा सडा शिंपडतच म्हणाली.

"व्हय व्हय. हाय माह्या ध्यानात." त्यानं उगवत्या सूर्यबिम्बाला लवून प्रणाम केला. आणि तो पाटलाच्या वाड्याकडे जाण्यास निघाला.

* * *

एवढ्या सकाळी तीसचाळीस गावकऱ्यांच्या उपस्थितीनं पाटलाचा वाडा गजबजला होता. प्रशस्त व्हरांड्यातील मध्यभागी फळ्यांच्या बैठकीवरील एका लोडाशी टेकून पाटील पाय ताणून बसला होता. चरणच्याच वयाचा पाटलाच मुलगा मंगल बाजूच्या आरामखुर्चीवर पुस्तक चाळत होता नी त्याची बहीण मंजुळा दाराशेजारी उभी होती. माधवनं वाड्याला असलेल्या पुढच्या भागाकडील मातीच्या बुटक्या भिंतीच्या आवारातून भीत भीतच आत प्रवेश केला तेव्हा सर्वांनी तिरस्कारांनी युक्त आपल्या नजरा त्याच्याकडे वळविल्या. एका दोघा सवर्ण हिंदु गावकऱ्यांनी अभद्र दर्शन म्हणून नाक मुरडीत पचापच थुंक्या टाकल्या. पण तिकडे दुर्लक्ष करून माधवनं पावलं पुढं टाकली. मिशीला पीळ देऊन राणोजी पाटलानं त्याचेकडे गुर्रावून पाहिलं आणि पुढं येऊ नकोस नाहीतर विटाळ होईल असे हाताच्या पंजानं खुणावलं. एक गावकरी त्याचेवर खेकसून म्हणाला,

"आरे, आपली पायरी वळख. ओसरीजवळ येऊन बाटावतोस का समद्याला ?"

"आजकाल हे महार–मांग–चांभार लईच शेफारले आहेत. आपली अवखत वळखतच नाईत. ब्येस अद्दल घडविल्याविगर वठणीवर नाई येवाचे ! लई गयर केली त्याहीची !" दुसरा गावकरी उपहासानं म्हणाला, तर तिसऱ्या गावकऱ्यानं उर्मटपणानं म्हटलं, "चांभाराच्या देवाला खेटराचा मार ! आरे माध्या, लेका माग सरकून राह्य उभा."

माधवला आणि अस्पृश्य समाजाला असा अपमान, छळ, निर्भर्त्सना कांही नवीन नव्हतं. अनेक वर्षांपासून पिढ्यान् पिढ्या सवर्ण हिंदूंच्या अनन्वित छळांनी, अमानुषतेच्या दुर्व्यवहारांनी, कमालीच्या उपमर्दकारक व जीवन सहज्य करून टाकणाऱ्या दुष्ट, अश्लाघ्य प्रवृत्तींनी अस्पृश्य वर्ग अगदी जर्जर, अगदी पिचून गेलेला आणि मृतवत् जीवन जगणारा झाला होता ! या अस्पृश्य समाजाच्या मर्दूमकीला, विनयाला, प्रामाणिकपणाला, अदबीला आणि अविरत कष्ट घेऊन स्वतः उपाशी, अर्धनग्न जीवन कंठून इतरांना अन्नाचा घास प्राप्त करून देणाऱ्या माणुसकीला सवर्ण हिंदूंच्या कोपात रतिमात्र जागा नव्हती. माधवला आजचा उपहास, उपमर्द खूपच जाणवला ! त्याचा सात्त्विक, शुद्ध अंतरात्मा तळतळला. अंगाचं पवित्र मनुष्यमात्राचं कल्याणच इच्छिणारं रक्त सळसळलं. स्वाभिमानानं त्याचा स्नायु नी स्नायु फुरफुरला दुःखाचा एक आवंढा गिळून तो थोडा मागं सरकला आणि मग त्यानं अदबीनं खाली वाकून राणोजी पाटलाला व गावकऱ्यांना मुजरा केला !

राणोजी पाटलानं चंची उघडली. अडकित्त्यानं बारीक सुपारी कातरून ती तोंडात कोंबली अन् मग भुंवया उंचावून व मिशीला ताव देऊन माधववर आपली भेदक नजर टाकीत तो म्हणाला,

"हां. का माध्या, काल रात्री लई मोठी पंचाईत भरली व्हती म्हणे तुझ्या मोहोल्यात ?"

"जी नाय मालक. पंचाईत नोहती. आपला गणू चांभार हाय न् त्याचे पोरीची मागणी व्हती काल. म्हून जमलो व्हतो आम्ही समदे" माधव लीनतेनं उत्तरला.

"अस्सं व्हय !" आपलं भोंगळ नाक फुरफुरवून पाटील म्हणाला,

"आता तू तुम्हा महार-मांग-चांभाराची येकी झाली म्हणे ! खाणं-पिणं समदं येकच झालाय् अं ? आज ना उद्या येकी करुन समदं गाव बाटवायला सवार व्हाल, असंच नं ?"

माधव क्षणभर स्तब्ध राहिला आणि मग तो कळवळून उद्गारला

"अस कसं म्हणता पाटील ! आपुण सर्वे देवाची लेकरं ! संत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, स्वामी रामदास या सर्व संतांनी-ऋषि-महामुनींनी एकामुखानं जातपात नाही–आपुण एक आहोत–एकमेकाचा उद्धार करुन सुपंथ धरला पाहिजे असं बजावून सांगितलं हाय ना ? हामी महार, चांभार, मांग, भंगी समदे आमचे भाऊ. त्यांच्यात दुजाभाव ठेऊन सद्‌गति कशी लाभेल ? आमच्या अस्पृश्यातच भेदभाव राह्यला त् मग दुसऱ्या उत्तम जातीशी येव्हार कसा जमेल ? आमाला त् तुम्हा उत्तमाचा इवलुसा आधार, मायेचा इवलुसा ओलावा लाभला म्हंजे झालं ! माणसावानी हामाला वागवा येवढीच आमची मागणी !" एक दीर्घ उसासा टाकून माधव गंभीरतेनं म्हणाला 'हे विश्वचि माझे घर' असं संत ज्ञानेश्वर म्हणाले तर 'उंच नीच कांही नेणे हा भगवंत । तिष्टे भाव भक्त देखोनिया" असा संत तुकोबांनी समतेचा धडा दिला; आणि संत चोखोबा म्हणतात–

नातरी अन्त्यज तिथे ब्राह्मण । गंगेमाजी करिती स्नान ।
तरी काय वाटलें तिचें जीवन । पवित्रपणें सर्वदा ॥
तुम्हा आम्हा सकल देहीं । आत्मा एकचि असे पाहीं ।
तयासि याती वर्ण नाही । आपुले ठायी विचारा ॥

"माध्या ! आपलं पुराण बंद कर !" राणोजी पाटील कडाडला. रागानं लालबुंद होऊन पाटील तक्तपोशावरुन खाली उतरत म्हणाला,

"आरे लेका, एवढी घमेंड, एवढी मस्ती चढली का तुमा माह्यराला ? चामडी लोळवीन कांही हां की चूं केली तर, काय समजलात !"

"माफ करा मालक कांही कमी अधिक तोंडून निघालं असन् तर ! तुमी हामचे मायबाप. हामा लोकांचे मालक !" दोन्ही हात जोडून माधवनं विनवलं. पण तिकडे लक्ष न देता पाटलानं कुत्यानिं विचारलं,

"आन् कारे माध्या, आपली वाडी विहिरीसाठी अन् वांध्या बालकमंदिरा-साठी दान देणार आहेस व्हय मांग चांभारांना ?"

"जी व्हय मालक. पण ते दान नाई. माहं कर्तव्य हाय ते ! आम्हा अस्पृश्य लोकांच्या भलाईची गोष्ट हाय ती." माधवनं विनम्रतेन हृद्‌गत व्यक्त केलं.

"अस्सं व्हय. लई पुण्यवान व्हतोस की रे !" पाटील फुत्कारून निश्चयी स्वरात म्हणाला,

"आपल्या वाडीची काय किंवा वांध्याची काय जागा तुला देता येणार नाही. मी गावचा पाटील आहे. माझ्या मर्जीविना कांही करता येणार नाही, समजलास ?" मिशीला पीळ देऊन पाटील त्वेषानं म्हणाला,

अनुक्रमणिका

"आन हे लक्षात ठेव, तुह्या बांध्या न् वाडीची जागा मी खरेदी करीत आहे !"

"पाटील काय म्हणता आपुण ? माह्या मालकीची जागा तुमी खरेदी करणार ! नाई नाई मालक, असं कसं व्हईल जी !" कळवळून माधव म्हणाला.

"वकवक बंद कर माध्या. जागा मी खरेदी केली आहे असं समज" आवाज चढवन राणोजी पाटलानं इसार म्हणून कमरेचा रुपया काढला नी तो माधवाच्या अंगावर भिरकावला.

माधवनं तो रुपया आपल्या थरथरत्या हातानं उचलला. सदऱ्यानं त्याची धूळ पुसली आणि मग तो रुपया कपाळाला लावून, पाटलाकडे तो सरकावून म्हणाला,

"मालक, लक्षुमीचा असा अपमान करू नोका ! माही जमीन, वाडी, घरदार माहृया मालकीचं हाय. ते कोणीबी इकत घेऊ शकत नाही. तुम्ही गावचे पाटील आहात खरे; पण मालक, आमा गरीब अस्पृश्यांच्या अब्रूचा लिलाव नाय करू शकत. ना ती तुमी खरेदी करूं शकत ! वरं हाय. येतो मी मालक. आशीर्वाद असू द्या." इतकं तळमळीनं बोलून माधवनं पाटलाला व जमलेल्या गावकऱ्यांना अदबीनं पुन्हा मुजरा केला.

माधवनं पाठ वळविली. पाटलानं गावकऱ्यांना इशारा केला. गावकरी धावले. आवाराच्या दारावरच त्याला घेरून चांगला चोप दिला ! 'धावा, धावा !' ही त्याची आर्त हाक कोण ऐकणार ?

माधव बराच वेळपर्यंत दाराजवळच बेशुद्धावस्थेत पडला होता. त्याचा सदरा फाडला गेला होता. फेटा लायेखाली तुडविला गेला होता. कपाळाला जबर जखम झाली होती. रक्ताच्या धारांनी त्याचं अंग माखलं होतं. किशोर वय असलेल्या मंगलला—पाटलाच्या पुत्राला हे दृष्य पाहावलं नाही. त्यानं वाड्याच्या मागच्या बाजूनं पाणी आणून ते माधवच्या तोंडावर शिंपडलं. त्याला एकदोन घोट पाणी पाजलं नी नकळत तो वाड्यात परत गेला.

थोड्या वेळानं माधव शुद्धीवर आला. कसाबसा तो उठला आणि त्याची पावलं मंद गतीनं देवळाकडे वळली. शंकराचं मंदिर होतं ते. छोटं पण सुंदर. त्याच्या पुढच्या भागाला दोन आम्रवृक्ष होते व त्या वृक्षांच्या मधोमध पण कांहीसं पुढं शिंदीचं उंचच्या उंच झाड उभं होतं. माधवला ग्लानी आल्यासारखी वाटली. त्या झाडाच्या बुंध्याशी तो टेकला. मग कांही वेळानं त्याची नजर अगदी समोर असलेल्या मंदिरातील शंकराच्या मूर्तीकडे खिळली. संत चोखोबाची वाणी त्याच्या मुखाद्वारे हवेत तरंगली—

अनुक्रमणिका

येथे तो संग आहे दुर्जनांचा । म्हणोनि क्षीण त्याचा होत आहे ।।
चोखा म्हणे ऐसा पडिलों कारणी । सोसूं ही जाचणी कोठवरी ।।
चाहाड चोर जार भ्रष्ट ते साचे । हीनत्व जन्माचे पदरीं आहे ।।
येथे तो दुःखाचे डोंगर आठवती । वाटतसे खंत माझ्या मना ।।

माधव इकडे अत्यंत तीव्र दुःखानं तळमळत होता तर तिकडे त्याच्या झोपडीकडे अत्यंत अनुचित, अत्यंत अमानुष प्रसंग त्याचे वायकोवर ओढवला. गिरिजा माऊली घागर घेऊन पाण्यासाठी ओढयाकडे निघाली तेव्हा कांहीं गावकऱ्यांनी तिचा मार्ग अडविला. कोणी तिचा पदर ओढला तर कोणी दगड मारून केवळ तिची घागरच फोडली नाही तर तिला जखमीहि केले. अस्पृश्य बांधवांनी धाव घेऊन तिला सोडविण्याचा प्रयत्न केला. मग ते खबर द्यायला माधवकडे गेले. त्याच्या कानावर घडलेला अश्लाघ्य प्रकार टाकला. माधव तल्लीन होऊन देवाची करुणा भाकीत होता—

जातीभेदें गांजिलो, त्रासिलों विटाळें । सोडवी या वेळें चक्रपाणी
एकापुढे एक पडती आघात : सारितां न सरत काय करूं ?
दुष्ट रुढी नित्य करूं पाही घात । सोसावे आघात किती तरी ?

* * *

राणोजी पाटलाचा मुलगा मंगल आणि माधवचा मुलगा चरण हे दोघे बालमित्र होते. एकमेकाशिवाय ते रहात नसत. पाटलाची मुलगी मंजुळा त्या दोघापेक्षा दोन वर्षांनी लहान होती. पण तिचाहि चरणवर मोठा लोभ होता. शाळेत जायला ते बाहेर पडले की त्यांची भेट मंदिरापुढील आम्रवृक्षाखाली होई एकमेकाची ते वाट पहात नी मग मिळून शाळेत जात. गावापासून शाळा थोडी दूर होती. तेव्हा दुपारी घरी जेवायला ते येत नसत. शिदोरी घेऊन जात आणि दुपारच्या सुटीच्या वेळी शाळेच्या मागच्या बाजूकडील सावलीत बसून एकत्र शिदोरी खात. मंजुळाहि त्यांच्यात सामील होई. केव्हा केव्हा तर ती आपल्या हाताने चरणच्या तोंडात घास घाली. नव्या पिढीचे नवे हितप्रद संस्कार घडवून आपण एक आहोत—आपल्यात जातपात नाही हे दर्शविणारे ते प्रतीक होते !

चरण हा फार हुशार मुलगा होता. तो तसा मोठा सालस व चतुर होता. वर्गांत त्याचा नेहमी पहिला नंबर येई. शिक्षक त्याची मुक्तकंठानं स्तुति करीत. त्याचं बोलणं मोठं मधुर अन् वागणूक प्रसन्न करणारी. त्यामुळं शाळेत तो सर्वांना हवा हवासा वाटे. मोठेपणी हा मुलगा मोठा अधिकारी तरी होईल नाहीतर मोठा गुणसंपन्न देशभक्त होईल. अशी त्याची स्तुति जेव्हा पाटलाच्या कानावर जाई तेव्हा कपाळावर तिरस्काराच्या आठ्या

चढवून, तो उद्गारायचा; "लेकाला खायला दाणे मिळत नाहीत आणि म्हणे, तो मोठा अधिकारी नाय त् देशभक्त व्हणार ! महाराचा पोर बेटा नांव कमवन् राह्यलं काय जगात, हूं ऽऽ"

मंगल आणि मंजुळा चरणच्या घरी अभ्यासाला जात. पाटील त्यांना मनाई करायचा, केव्हा मारझोडहि करायचा; पण वडिलाची नजर चुकवून ते वहीणभाऊ चरणच्या घरी गेल्याशिवाय रहात नसत. त्या दोघांनाहि गिरिजा आंजारा-गोंजारायची, ममतेने खाऊपिऊ घालायची. माधव तर त्यांना कुरवाळून नीट अभ्यास करून नांव कमविण्याचा—पाटलाचे घराणे उच्च व उदात्त ठेवण्याचा उपदेश करी.

त्या दोघांची शाळेची शेवटची परीक्षा जवळ येऊन ठेपली. लागेल तेव्हा मदत करण्याचा चरणनं मंगलला शब्द दिला. मंगलनं आग्रह केला म्हणून एके दिवशी चरण त्याचे घरी गेला. ओसरीवर बसून ते दोघे मित्र अभ्यासात मग्न झाले. इतक्यात पाटील बाहेरून घरी परत आला. चरणला ओसरीवर बसलेला पहातांच त्याला भयंकर क्रोध आला. "अरे महाराच्या पोरा, ओसरीवर बसून आता आमचं घरदार विटाळतोस काय ?" असं कडाडून, त्यानं चरणच्या गाला-वर तिरीमिरी येईल अशी जोराची थप्पड लगावली ! बिचारा चरण ओसरीवरून खाली कोसळला !

त्या दिवसानंतर चरण कधी मंगलच्या घरी गेला नाही. मात्र दोघाहि वहीणभावाला जसा वेळ मिळे तसा आम्रवृक्षाखाली अभ्यासाची तयारी करून देण्यास तो कधी कचरला नाही. परीक्षा आली आणि गेली. निकाल लागला. चरण प्रथम श्रेणीत सर्वप्रथम आला. मंगलहि उत्तीर्ण झाला पण त्याचा नंबर बराच खाली घसरला. मंजुळा देखील उत्तीर्ण झाली होती. चरणच्या मदती-मुळं आपण उत्तीर्ण होऊ शकलो अशी प्रांजळ कबुली त्या दोघांनीहि दिली. त्यांनी चरणचे आभार मानून, आपण उतराई असल्याचं म्हणताच चरण उत्तरला, "तुमच्या निष्ठेचं नी कष्टाचं फळ लाभलं तुम्हाला. मग उतराई ती कसली ? मी उपकार थोडेच केले, माझं कर्तव्य बजावलं !"

उच्च शिक्षणासाठी राणोजी पाटलानं मंगलला शहरात पाठविण्याचं ठर-विलं, तसाच माधवनं चरणलाहि उच्च शिक्षण देण्याचा निर्णय घेतला.

मंगल आणि चरण या दोघाहि मित्रांनी एकाच दिवशी उच्च शिक्षणासाठी शहरात जाण्याचा बेत केला. दोन्ही घरी त्यांच्या तयारीची व्यवस्था करण्यात आली. एकदाचा त्यांचा जाण्याचा दिवस उजाडला. अगदी सकाळी रामप्रहराचे वेळी एका धार्मिक ग्रंथातील चारित्र्य व नीतिसंबंधाचा अध्याय चरण वाचत

असताना मंगलनं हाक दिली. चरणनं लगबगीनं बाहेर येऊन मंगलला प्रेमानं मिठी मारली. आत नेऊन त्याला धारोष्ण दूध प्यायला दिलं. मंगलनं विनंती केली, चरण तूं मजबरोबर रेंगीवर चल. स्टेशन चार मैल लांब आहे.

चरणनं क्षणभर विचार केला नी मग तो उत्तरला,

"नाही मंगल. मला क्षमा कर. मी पायीच येईन. एवढंच की मला जरा लवकर निघावं लागेल. प्लॅटफार्मवर आपली भेट होईलच. मी आधी पोचलो तर तुझं तिकीट मात्र अवश्य काढून ठेवीन. नाराज होऊ नकोस अं!"

स्टेशनवरून गाडी दुपारनंतर चारला सुटत होती. चरण एक वाजता भर उन्हात पायीच जाण्यास निघाला. निघताना त्यानं आपल्या जीर्ण झोपडीकडे नजर टाकली. माथ्यावरील सूर्याला नी मग तुळशीवृन्दावनाला नमन केलं. बाजूच्या गोठ्यांत बांधल्या असलेल्या बैलांना सोडून, त्यांच्या मस्तकांना कुरवाळलं. त्याचे आईवडील गिरिजा–माधव अंगणात उभे होते. त्यांचेकडे धाव घेऊन चरणनं त्यांच्या पायावर मस्तक टेकलं! त्यांच्या डोळ्यात आसवं तरळली. माता गिरिजानं आपल्या पदरानं ती आसवं टिपून त्याचं चुंबन घेतलं. पितृदेव माधवनं त्याला छातीशी कुरवाळून सद्‌गदित अंतःकरणानं म्हटलं,

"बाळ चरण, माही भिस्त तुह्यावरच हाय. शह्यरात जाऊन घराण्याला कलंक लागन् असं काई घडू देऊ नोको. नांव कमव. दुसऱ्याच्या भलाईची चिंता वाह्य." महार, मांग, चांभार, स्त्री–पुरुष चरणला निरोप द्यायला आले होते त्यांचेकडे अंगुलिनिर्देश करीत माधव म्हणाला,

"पाह्य, हे सर्वे जण तुझ्याकडं आशेनं पहात होते. चांगलं शिक्षण घे आन् त्यांचं कल्याण साध."

चरणनं जमलेल्या सर्व दुःखी बांधवांना लवून प्रणाम केला. मग पुन्हा एकदा आपल्या आईच्या चरणावर डोकं ठेऊन त्यानं स्टेशनची वाट धरली. सर्व अस्पृश्य गावकरी त्याला निरोप द्यायला गावच्या वेशीजवळील आमराईपर्यंत त्याच्या मागोमाग गेले. जाताना चरण शंकराच्या मंदिरापुढील शिंदीच्या झाडापाशी थोडा थबकला. त्याचे डोळे पाणावले. शंकराला त्यानं भक्तिभावानं हात जोडून वंदन केलं. नंतर वेशीपासच्या आंबराईत चरणनं सर्वांना प्रणाम केला व तो निघाला.

स्टेशनची जवळपास अर्धी वाट चालत गेल्यावर, मागाहून मंगलची रेंगी आली. त्याच्या रेंगीत तो आणि पाटलाचा मुन्शी बसले होते. चरण जवळ येताच मंगलनं रेंगी थांबविली आणि माधव व चरण या दोघांहि पितापुत्रानं रेंगीत बसावं म्हणून त्यानं विनंती केली. पण ती चरणनं मान्य केली ना ही

"तूं चल पुढं मंगल. आम्ही येतोच तुमच्या मागोमाग. अजून बराच वेळ आहे गाडीला" असं उत्तर देऊन चरण झपाझप पावलं टाकीत पुढं जाऊ लागला. परन्तु मंगलला आपण रेंगीत जावं नी आपल्या मित्रानं पायी चालावं हे प्रशस्त वाटलं नाही. तो खाली उतरला. आणि मुन्शीला रेंगी पुढं न्यायला सांगून तो चरणबरोबर पायीच स्टेशनची वाट चालू लागला.

* * *

नाही हो म्हणता माधवनं दोघांचीहि तिकिटं काढली. मगल माधवला विलगला त्याच्या पायाला वंदन करून तो गहिंवरून म्हणाला,

"काका, माझ्या वडिलाकडून व गावकऱ्यांकडून आपला आणि आपल्या समाजाचा छळ होतो खरा पण आपण मनावर कांही घेऊ नका. मी आपलाच मुलगा आहे असं समजा आणि आम्हा सर्वांना क्षमा करा. मी प्रतिज्ञा करतो, मी माझं संपूर्ण आयुष्य दलित बांधवांच्या कल्याणासाठीच खर्च करीन. विश्वास ठेवा काका, विश्वास ठेवा!"

माधवनं मंगल व चरण दोघांनाहि ममतेनं कुरवाळलं. मग तो मंगलला त्याची पाठ थोपटीत म्हणाला,

"बाळ, चरण जसा मला प्रिय तसाच तूंहि आहेस. तुमा दोघांचं भलं ते माझं भलं! जा. गाडी आली हाय, बसा."

ते दोघेहि मित्र गाडीत बसले. शिटी झाली. गार्डनं हिरवी झेंडी दाखविली. दोघांनीहि गाडीच्या खिडकीतून माधवला प्रणाम केला. माधव चरणला उद्देशून म्हणाला,

चरण, मंगलची काळजी घे. दोघंहि मिळून रहा. सुख दुःखाची चिट्टी पाठवीत जा. आन् मंगल–चरण, शह्यरात गेलात म्हून बदलू नोका. आपल्या खेड्याला पारखे नोका होऊं. त्याचं भलं करा, भलं! जा बाळांनो. सुखी रहा!" गहिंवरून माधवनं त्या दोघांना हात उंच करून आशीर्वाद दिला.

बाबा, आम्ही गावाला विसरणार नाही. गरीबीला विसरणार नाही. गावाचं मंगल घडेल असंच आम्ही करूं. मंगल–चरण आहोत बाबा, मंगल–चरण!" चरण गाडीच्या खिडकीतून डोकावून उद्‌गारला. गाडी पुढं सरकली. ती दिसेनाशी होईपर्यंत माधव टक लावून प्लॅटफार्मवर उभा होता.

* * *

––आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर

आता मंगल–चरण शहरात जाऊन चार वर्षे होऊन गेली. ते दोघेहि मित्र पदवीवर झाले. चरणनं शेवटपर्यंत आपला पहिला नंबर सोडला नव्हता. त्यानं

या चार वर्षांच्या अवधीत लेखणी नी वाणी कमावून कीर्तिहि संपादन केली होती. अस्पृश्य विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपन्न होऊन आपल्या सद्‌गुणांचा कसा आदर्श निर्माण करावा याचं सुंदर व अनुकरणीय प्रतीक म्हणजेच चरण.

मंजुळामुद्धा आता मेडिकल कॉलेजात शिकत होती. आपल्या गावाची सुधारणा घडवून अस्पृश्यता समूळ कशी नष्ट करावी यावर चर्चा करण्यासाठी ती तिघं एकत्रित आली. त्यांनी दूरदृष्टीनं विचार केला. चरणचे वडील माधव याची अस्पृश्य मोहल्यात एक विहीर व एक बालक–मंदिर उभारण्याची सदिच्छा पूर्ण करायची. त्याबरोबरच एक सूतिकागृह व एक वाचनालय निर्माण करण्याचा मंगलनं आपला मनोदय व्यक्त केला, तर आपण लवकरच एम्. बी. बी. एस् झाल्यावर, गावातील सूतिकागृह व जोडूनच एक दवाखानाहि चालवूं अशी मनीषा मंजुळेनं प्रदर्शित केली. त्या तिघांचाहि संकल्प ठरला !

* * *

या संकल्पापूर्वी गंगापूर गावी दोनतीन महत्त्वाच्या घटना घडल्या. भारताला ज्या दिवशी स्वातंत्र्य प्राप्त झालं त्या दिवशी गावकऱ्यांचा विरोध पत्करूनहि माधवनं पूर्वी ठरल्याप्रमाणं अस्पृश्यांच्या मोहोल्ल्यात विहीर व बालक-मंदिराच्या जागेचं भूमिपूजन केलं. या शुभ कार्यासाठी सांवरगाव या आदर्श ग्रामाचे सुधारक श्री. संतोषराव पाटील आले होते. त्यांनी गंगापूरच्या राणोजी पाटलांना व स्पृश्य गावकऱ्यांना अस्पृश्यता नष्ट करणे व गावाची एकी राखून आपला देश बळकट व संपन्न करणे आपले आद्य कर्तव्य आहे याची जाणीव करून दिली. अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे, पाप आहे हे त्यांनी परोपरीने समजावून सांगितले. अस्पृश्यांना समानतेनं न वागविणे व त्यांचा छळ करणे हा मोठा अधर्म आहे व त्यासाठी देवहि आपल्याला क्षमा करणार नाही असं महात्मा गांधीजींनी बजावून सांगून, सवर्ण हिंदूंनी समूळ अस्पृश्यता निवारण करण्याबाबत आता प्रायश्चित घेतलं पाहिजे असंहि निक्षून सांगितलं होतं, हे लक्षात घ्या आणि अस्पृश्यता निवारणाच्या या मंगल कार्यासाठी पाऊल पुढं टाका, अशी संतोषराव पाटलांनी विनंती केली. परन्तु या कळकळीच्या उपदेशाचा गावकऱ्यांच्याच काय राणोजी पाटलाच्या मनावरहि कांहीच परिणाम झाला नाही.

त्यानंतर दुसऱ्याच दिवसाची हृदयद्रावक घटना. मंजुळा त्याच दिवशी कांही कामासाठी गावी आली होती. रात्री आठचा सुमार होता. मंजुळा थकली असल्यानं ती माडीवर झोपायला निघून गेली होती. पाटील वाड्याच्या ओसरीवर चिलीम ओढत होता. चिलीम ओढताना घेतलेल्या विस्तवाचा निखारा त्यानं लांब हात करून झटकला. तो बाजूच्या तणसावर पडल्याचे त्याच्या लक्षात आले

अनुक्रमणिका

नाही. भेटायला आलेल्या दोन चार गावकऱ्याशी गप्पागोष्टी करून नंतर तो शय्यागृहात झोपायला गेला. तणसावर पडलेला निखारा हळु हळु तणसाला वाड्याभर जाळत गेला नि मग मध्य रात्रीच्या सुमाराला वाड्यानं पेट घेतली ! पाटील खडबडून जागा झाला. आजूबाजूचे शेजारी धावले. वाड्यातील वरचसं सामान-सुमान त्यांनी बाहेर काढलं. मंजुळा वरच्या मजल्यावर गाढ झोपेत होती. तिकडे कुणाचंच लक्ष गेलं नाही. हां हां म्हणता चारी बाजूंनी आगीच्या भयंकर ज्वाळा उंचच्या उंच उफाळू लागल्या नी मंजुळा जागी झाली. सांपडेल त्या मार्गानं निनं वाड्याबाहेर येण्याचा प्रयत्न केला पण सर्व दिशांनी धगधगणाऱ्या आगीमुळं ती बाहेर येण्यास असमर्थ ठरली. तिनं हृदयभेदक आर्त किंकाळ्या फोडल्या. 'बाबा, धावा ! मला वाचवा !' संपूर्ण गावकरी धावून आले पण त्या भयंकर आगीत जाऊन मंजुळेला वाचविण्याची हिम्मत झाली नाही. तोच माधव आपल्या अस्पृश्य बांधवांना घेऊन तेथे आला. त्यानं बघ्या स्पृश्य गावकऱ्यांकडे क्षणभर नजर टाकली नी मग अस्पृश्यांना प्राण पणाला लावून वाडा विझविण्यास आज्ञा केली. इतक्यात मंजुळेची हृदयाला घरं पाडणारी किंकाळी पुन्हा ऐकू आली. राणोजी पाटील तर कपाळावर हात ठेऊन ढसढसा रडत होता अन् कुणी तरी धावा आणि माझ्या मंजुळेला वाचवा म्हणून विनंती करीत होता. पण कोणाची हिम्मत होत नाही असं पाहून मात्र माधवनं प्रतिसाद दिली, 'बेटा मंजुळा घाबरूं नोको. मी हा आता आलो बेटा !' केवळ एवढे शब्द खूप मोठ्यानं उच्चारून, माधवनं त्या भयंकर ज्वाळांच्या वलयात उडी घेतली !

एका जाड घोंगडीत मंजूळेला नीट गुंडाळून त्या महान आगीतून माधव कसावसा वाड्याबाहेर आला; आणि मग तो धाडकन् जमिनीवर कोसळला ! संपूर्ण शरीर भाजून निघालं होतं--अंगाच्या चामड्या लोंबकळत होत्या ! मंजुळा सुखरूप बाहेर पडली होती. तिनं आकान्त करून माधवला मिठी मारली. 'बाबा माझे प्राण वाचवून तुम्ही हे आपल्या जीवाचं काय केलंत हो !'

माधवनं क्षणभर डोळे उघडण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ ! त्याच्या जळत्या ओठावर फक्त एकच जोड नांव तरंगलं. 'मंगल-चरण !' आणि मग मानवतेच्या त्या पुजाऱ्यानं गावचा शेवटचा निरोप घेतला !

*　　*　　*

तिसरा प्रहर उलटून रामप्रहरची वेळ होती ती. गावातील स्पृश्य–अस्पृश्य सर्व गावकरी माधवच्या प्रेताभोवती जमले होते. राणोजी पाटलानं आपलं सर्व बळ एकवटून माधवचं प्रेत उचललं अन् तो उद्गारला,

"आमच्या गावचा अस्सल मानकरी आज हरला ! माधव खरा स्पृश्य आन् मी अस्पृश्य. तो खरा पुण्यवान आन् मी पापी. त्यानं आपला धर्म पाळला

आन् मी त्याचा छळ करून तो गमावला ! भयंकर पापी, भयंकर गुन्हेगार आहे मी माधव, गावचं मानधन असणाऱ्या सत्पुरुषा मला क्षमा कर !"

राणोजी पाटलानं माधवचं प्रेत खालीं ठेवून त्याला वंदन केलं ! तेव्हा त्याच्या नेत्रातून टपोरी आसवं माधवच्या प्रेतावर पडली ! पाटला प्रमाणेच स्पृश्यास्पृश्य गावकऱ्यांनीहि माधवच्या पायाला स्पर्श करून मानवंदना दिली ! मोठें हृदयस्पर्शी दृष्य होतें तें !

आणि मग राणोजी पाटलानं माधवच्या हृदयाला स्पर्श करून प्रतिज्ञा केली:

"माधव, आज या रामप्रहरच्या वेळी मी प्रतिज्ञा करतो, आता या गंगापुरात अस्पृश्यता पाळली जाणार नाही. गावातील अस्पृश्यांना समानतेनं आन् मानानं वागविलं जाईल. माधव, आता शेवटच्या क्षणापर्यंत तन-मन-धनानं अस्पृश्यांची सेवा हाच माझा नी गावकरी बन्धूंचा खरा धर्म राहील !"

पाटलाचा कंठ भरून आला. तो क्षणभर थांबला. आणि नंतर त्यानं वचनं दिलीं :

"आता अस्पृश्यांचा मोहल्ला वेगळा राहणार नाही. सर्व अस्पृश्य बांधवांना स्पृश्यांच्या मोहल्यात जशी जागा सांपडेल तशी तेथे घरे उभारून दिली जातील.

अस्पृश्यांना आता जिथे मोहल्ला आहे तेथे तुझ्या सुधारणेची स्वप्ने साकार केली जातील.

आजपासून सर्व अस्पृश्यांना केवळ सार्वजनिकच नव्हे तर खाजगीहि देवळं, विहिरी आणि पाणवठे खुली केली जात आहेत.

आणि माधव, आता माझं घर तुझं घर होईल. तुझं कुटुंब माझ्या वाड्यात हक्कानं राहील."

राणोजी पाटलाचा कंठ पुन्हा भरून आला. त्या भरल्या कंठानं त्यानं घोषणा केली :

"माधव, आमच्या हितचिंतक थोर बांधवा, आज तुझ्या या पवित्र देहाला साक्षीला ठेवून मी जाहीर करतो की जी कांही माझी शेत जमीन आहे ती सर्व भूमिहीन अस्पृश्य बांधवांना दान देत आहे, दान ! न कळत तू मजवर जे अनंत उपकार केलेस त्या ऋणातून मुक्त होण्यास एवढेच काय ते मी करू शकतो. चुकलो माधव. इतकं करूनहि मी कांही तुझ्या ऋणातून मुक्त होऊ शकत नाही. तुझं देवरुपी हृदय मजजवळ नाही रे !"

माधवच्या प्रेतयात्रेची तयारी झाली. पाटलानं आज्ञा केली माझ्या माधवचं प्रेत अस्पृश्यांच्या स्मशानघाटावर नाही तर स्पृश्यांच्या स्मशानघाटावर दहन केलं जाईल !

माधवच्या प्रेताला सवर्ण हिंदूंनी आणि अस्पृश्यांनी खांदा दिला. गावच्या सुधारणेचं---अस्पृश्यता निवारणाचं ते पहिलं व फार मोठं उचलेलं पाऊल होतं !

माधवचं प्रेत सवर्ण हिंदूंच्या घाटावर पाटलाच्या खास निवडक व प्रशस्त जागी नेण्यात आलं. दहनविधीची दखल स्वतः पाटलानं जातीनं घेतली. सरण रचल्या गेलं. स्पृश्यास्पृश्य भजनी मडळीच्या टाळ मृदंगाचा ध्वनि त्या स्मशान घाटात निनादला आणि आता सरण पेटवलं जाणार तोंच मंगल-चरण तेथे येऊन पोचले. दोघाहि मित्रांनी एकानं बावा व दुसऱ्यानं काका अशी करुण हाक देऊन सरणावर आपलं मस्तक टेकलं तेव्हा तर प्रत्येक गावकऱ्याचं हृदय हेलावून गेलं. पाटलानं धाव घेऊन चरणला आपल्या छातीशी कुरवाळीत म्हटलं,

"चरण, असा रडूं नकोस बाळ ! तुझा पिता गेला. आमचा देवमाणूस गेला. पण बेटा, मजकडे बघ. मी आहे तुझ्या पाठीशी. मंगल आणि तुझा जन्म एकाच दिवशी झाला. मंगल जसा माझा पुत्र तसा तू माझा दुसरा पुत्र. आवर ती आसवं; आणि वडिलाची चिता पेटव !"

मंगल-चरणनं चिता पेटविली ! नंतर पाटलानं माधवच्या अस्थी नी राख सांवरली. आणि त्याच दिवशी मंगल-चरणला घेऊन रक्षा विसर्जित करायला तो काशीला निघाला.

* * *

आज माधवचा तेरवीचा दिवस. पाटलानंच आपल्या वाड्यात हा दिवस मोठ्या थाटानं साजरा करण्याची व्यवस्था केली. संपूर्ण गावाला-स्पृश्यास्पृश्यांना निमंत्रित केलं.

त्या दिवशी सकाळी सूर्योदयाचे मंगल वेळी एक छोटासा पण वेधक कार्यक्रम पाटलानं घडवून आणला. ज्या ठिकाणी माधवचा दहनविधि झाला तेथे सुंदर व भव्य समाधि उभारण्यात आली होती. त्या समाधीच्या भोंवती अवघ्या बारा दिवसात एक बागहि निर्माण करण्यात आली होती. माधवच्या समाधीसाठी स्पृश्यास्पृश्य गावकऱ्यांनी स्वेच्छेने आपली वर्गणी देऊन माधववरील आपली निष्ठा व्यक्त केली होती. समाधीच्या दर्शनी भागाला संगमरवरी दगडाचा सुंदर फलक बसविला गेला होता; व त्यावर---

'गंगापूरचा थोर मानकरी व मानवतेचा पुजारी माधव' अशी अक्षरं कोरली होती.

माधवच्या त्या समाधि-भोवती गांवातील सर्व स्त्री पुरुष आणि बालबालिका गोलाकार शिस्तीनं उभं राहून त्या सर्वांनी, त्या समाधीवर फुलं उधळून नितांत श्रद्धा व्यक्त केली !

सायंकाळी पाटलाच्या वाड्यात स्पृश्यास्पृश्य स्त्रियांनी स्वयंपाक करून, कसलाहि भेद न राखता सर्व गावकऱ्यांना भोजन घातलं. अस्पृश्यता निवारणाचं हे दुसरं मोठं पाऊल उचललं गेलं.

त्यानंतर राणोजी पाटलानं गावातील भूमिहीन अस्पृश्यांना आपली शेत-जमीन वाटून दिली आणि गावात एकहि घर भूमिहीन आहे असं कोणाला म्हणायला जागा ठेवली नाही. तसंच स्पृश्यांच्या मोहल्यात कोणा अस्पृश्याला जागा दिली गेली ते घोषित केलं; व शेवटी माधवच्या कुटुंबाला वाड्याचा अर्धा भाग हक्काचा म्हणून दिला व गिरिजाला – माधवच्या पत्नीला उंची साडी-चोळी प्रदान करून तिचा गौरव केला ! अस्पृश्यतानिवारणाचं हे तिसरं अत्यंत महत्त्वाचं पाऊल पुढं टाकलं गेलं !

* * *

माधवच्या या तेरवीच्या दिवसानंतर गावात एक आगळेच नवचैतन्य निर्माण झालं. अस्पृश्यतेचा मागमूसहि उरला नाही. पाटलानं हळूहळू आपल्या गगापूर गावात आणखी एक विशेष गोष्ट घडवून आणली. महार, मांग, चांभार, भंगी आदि जातींना 'अस्पृश्य' म्हणून लेखूं नये–'गाव तेथे महार वाडा' किंवा 'चांभाराच्या देवाला खेटराचा मार' अशा म्हणी वापरू नयेत याची दखल घेतली.

दर वर्षी माधवजयंतिदिन व पुण्यतिथीदिन मोठ्या उत्साहानं साजरा केला जाऊन गाव उन्नत व विकसित होईल अशी कांहीना कांही सुधारणा श्रमदानानं घडविली जाई. माधवच्या पुण्यतिथीला तर नंतर जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले. आजूबाजूच्या अनेक खेड्यातील लोक या जत्रेत सामील होऊ लागले व गंगा-पूरच्या विविध सुधारणांपासून स्फूर्ति घेऊन आपापलं गांवहि उन्नत करण्यास झटूं लागले, इतकं महत्त्व त्या पुण्यतिथिदिनाला व पर्यायानं गंगापूरला आलं !

* * *

माधवच्या मृत्युनंतर अवघ्या तीनचार वर्षात गंगापूर गावाला स्वर्गाचं स्वरूप प्राप्त झालं ! संपूर्ण गाव मंगल–चरण व मंजुळा यांच्या प्रयत्नानं साक्षर तर झालंच पण शिवाय स्वावलंबी जीवन जगण्याची आणि प्रत्येकाचं घर समृद्ध होऊन राष्ट्राचं बळ वाढविण्याची शक्ति गंगापुरात निर्माण झाली. राणोजी पाटील आपल्या त्या वृद्धावस्थेतहि रात्रंदिवस सारखा खपत होता. त्यांनी गावातील दुर्व्यसनं कायमची नष्ट केली आणि गावाचा उच्च नैतिक दर्जा प्रस्थापित केला. या सर्व बाबतीत आपल्या लोकशाही सरकारनंहि सढळ हातानं मदत केली.

मंजुळा आता डॉक्टर झाली होती. चरण लठ्ठ पगाराचा मोठा अधिकारी झाला होता. आणि मंगल एक मोठा सुधारक म्हणून टापूभर किर्तिमान झाला होता. त्यानं केवळ आपल्या टापूतच नव्हे तर संपूर्ण प्रदेशात अस्पृश्यता निवारणाची मोठी चळवळ निर्माण करून त्यात मोठं यशहि प्राप्त केलं होतं. कोणतीहि सुधारणा मंगल–चरण नी मंजुळा आपसात ठरवून ती प्रभावी करण्याचा प्रयत्न करीत.

* * *

चरण राणोजी पाटलांना वडिलापेक्षाहि मान देऊन त्यांच्या सल्ल्यानुसार वागे. पाटलाच्या आज्ञेवरून त्यांनी सरकारी नोकरी पत्करली होती. तो मोठा अधिकारी बनला तरी गावाला विसरला नाही. जशी सुटी मिळे तसा तो गावी येई. गावच्या सुधारणेला मदत करी. जो पगार मिळे त्यापैकी आपल्या अगदी साध्या जीवनापुरता ठेवून बाकीची रक्कम पाटलाला पाठवून देण्यास कसूर करीत नसे.

* * *

दर दिवाळीला मंगल-चरण व मंजुळा गावी एकत्रित आल्याशिवाय राहत नसत. या खेपेच्या दिवाळीला चरण चारआठ दिवसांची अधिक सुटी घेऊन गांवी आला होता. त्याला तसं महत्वाचं कारणहि होतं.

अस्पृश्यांच्या मोहल्यात विहीर व बालक मंदिर उभारण्याची माधवची सदिच्छा आज पूर्ण होणार होती. सूतिकागृह, दवाखाना व वाचनालय निर्माण करण्याचा संकल्प आज मूर्त स्वरुपाला येणार होता. पण अस्पृश्यांचा मोहल्ला आता उरलाच नव्हता. त्या जागी आता एक सुंदर विहीर व एक प्रशस्त बालकमंदिर उभारलं गेलं होतं. त्याला लागूनच कांही अंतरावर एक त्रिकोणी भव्य इमारत निर्माण केली गेली होती. ही इमारत उभारायला चरणनं आटोकाट प्रयत्न केले होते. गावकऱ्यांनी सुद्धा श्रमदान देऊन हातभार लावला होता. मंगलची शक्ति या सत्कार्यासाठी खर्च झाली होती.

संकल्पित योजना आज पूर्ण झाल्या होत्या. त्या भव्य वेधक त्रिकोणी इमारतीच्या एका भागाला सूतिकागृह, दुसऱ्या भागाला दवाखाना व तिसऱ्या भागाला वाचनालय अशी सुंदर व्यवस्था करण्यांत आली होती. चरणच्या प्रयत्नानं गंगापुरात वीजहि आला असल्याने गावचे चित्र मोठे चित्तवेधक झाले होते. या इमारतीच्या जागेपासून तीन मुख्य गुळगुळीत रुंद रस्ते काढले गेले होते. पहिला रस्ता माधवच्या समाधिकडे बालकमंदिराकडून गेला होता, तर दुसरा रस्ता गावातील चौकात उभारलेल्या प्रशस्त सभामंडपाकडून पाटलाच्या वाड्याकडे आणि तिसरा दोन्ही रस्त्यांशी बाजार विभागात सांधा जोडून शंकराच्या मंदिरा-

पर्यंत गेला होता व या रस्त्यानं दुतर्फा झाडं लावली गेली होती आणि तसेच विजेचीहि सोय केली गेली होती. त्यामुळे गावाला रमणीयत्व प्राप्त झालं होतं !

स्वातंत्र्यापूर्वीचं अत्यंत ओंगळ, अत्यंत दुर्व्यसनी, अत्यंत हीन मनोवृत्तीचं अन् अत्यंत तीव्रतेने अस्पृश्यता पाळून दलितांचा अनन्वित छळ करणारे ते गंगापूर आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचं अत्यंत स्वच्छ, अत्यंत निर्व्यसनी, अत्यंत उदात्त मनोवृतीचं अन् अत्यंत जिव्हाळयानं अस्पृश्यतेचं समूळ उच्चाटन करून दलिताचं कल्याण साधणारं हे गंगापूर ! केवढा फरक, केवढा बदल, केवढं परिवर्तन !

राष्ट्रीय बाण्यानं प्रेरित होऊन आपल्या गावाची पूर्णत: उन्नति, सर्वांगीण विकास घडविणाऱ्या या गावाला आता मंगल–चरण गंगापूर म्हणून संबंध टापूतील जनता संबोधायला लागली होती ! गावाचा हा केवढा आदर्श, केवढी अस्मिता !

* * *

आज भाऊबीजेचा मंगल दिवस होता. सर्व गावकरी स्त्री–पुरुष त्या त्रिकोणी डौलदार इमारतीच्या विशाल पटांगणात सायंकाळच्या सुमारास एकवटले होते. गावोगावचे कार्यकर्तेहि प्रामुख्यानं उपस्थित होते. संकल्पित योजनेप्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या इमारती लतापताकांनी व दिव्यांच्या आरासांनी कशा सुशोभित केल्या गेल्या होत्या ! गावकऱ्यांच्या आनंदाला, उल्हासाला कसं उधाणं आलं होतं ! हातात काठी घेऊन राणोजी पाटील केवढ्या प्रसन्नतेनं इकडच्या तिकडे वावरत होते. जन्माचं सार्थक झाल्याची––ध्येयसाफल्याची त्यांना केवढी धन्यता वाटत होती.

सूर्यास्ताच्या वेळी बालकमंदिराचं आणि सूतिकागृह, दवाखाना नी वाचनालय असलेल्या प्रेक्षणीय त्रिकोणी इमारतीचं टाळयांच्या कडकडाटात उद्घाटन झालं !

त्या डौलदार त्रिकोणी इमारतीच्या माथ्यावर ठळक अक्षरात एक सुंदर फलक मन आकर्षून घेत होता. त्यावर लिहिलं होतं—

'मंगल–चरण'

जो तो राणोजी पाटलाला धन्यवाद देत होता. तेव्हा पाटील चरणकडे अन् विशेषत: त्याच्या पायाकडे अंगुलिनिर्देश करून प्रसन्नतेनं पण गंभीरपणानं उद्गारायचा––

(पृष्ठ ७१ वर)

अनुभवाची कलात्मक पातळी

—भा. ज. कविमंडन

'रस' हा शब्द आमच्या साहित्य शास्त्राने सुचविला. नाटयशास्त्रातील या शब्द-कल्पनेला निश्चित अर्थमर्यादा आहेत. कोणत्याहि वस्तुमधील आल्हाद देणारा अंश म्हणजेच 'रस'. मनाला आनंद देऊन तल्लीन करून सोडणारा जो अनुभव (काव्यांतर्गत) तोच 'रस' अशी कल्पना घेतल्यानंतर रसाची यादी करण्याचे कार्य (मॅक्डूगल या आधुनिक शिस्तवाद्या प्रमाणेच—) सुरु होणे स्वाभाविक ठरले. अर्थात अशी यादी कधीच संपत नाही. ही यादी भवभूतीलाहि अपुरी वाटली आणि मग 'एको रसः करुण एव' या सारखे मत पुढे आले. या 'ब्रह्मानंद सहोदर' अनुभवात आणखीहि भर पडली आणि पडेल. भक्ति-रसाची कल्पना, संतांना महत्वाची वाटलेली 'ब्रह्म-रसा'ची कल्पना पुढे आली. रसाची कल्पना अशी मर्यादित करून यादी करण्याच्या प्रयत्नास जरी महत्व असले तरी पण कला—अनुभवाच्या व्यापक संदर्भात अशी यादी करण्याऐवजी ही कल्पना (अगदी शब्दशः नव्हे) कलास्वाद चर्चेत घेणे योग्य ठरेल असे वाटते.

'रस' हा एक भावोल्लास आहे. त्याची निर्भर अवस्था इद्रियानुभवापासून दूर गेली असते हा अर्थ मान्य करावयास म्हणूनच अडचण नसावी. प्रस्तुत विवेचनात देखील 'रस' हा शब्द कलास्वादातील अनुभवाची परिपक्व अवस्था (आणि त्या पातळीवरील अनुभव) याच अर्थाने घेतला आहे. Aesthetic experience याला देखील 'रसानुभव' हा अधिक समर्पक व सुटसुटीत शब्दप्रयोग ठरावा.

साहित्याचा अनुभव घेताना वाचक—रसिक कोणत्या अवस्थेत असतो, याविषयी एक दृष्टिकोण सांगणारी एक विचारसरणी उल्लेख करण्यासारखी आहे. पाश्चात्यांनी पुरस्कारलेली ही विचारसरणी नाटय व विशेषतः शोकनाटय Tragedy या बाबतीत अधिक स्पष्ट झाली आहे.

शोकनाटयाने दिलेल्या अनुभवाने आनंद कसा होतो (प्रेक्षकाला) हा प्रश्न उपस्थित करून तो भिन्न पद्धतींनी सोडविला गेला आहे. ॲरिस्टॉटल पासून रॅफेल (Raphael) पर्यंत बऱ्याच विचारवंतांनी आपली कारणपरंपरा पुढे मांडली. ॲरिस्टॉट्लच्या विचारांची काटछाट करून कधी त्यावर कलम लाऊन नवे विचार मडण्यात आले शोक, अनुकंपा व भीषणत्व यांच्या सहाय्याने झालेले

मनाचे शुद्धीकरण फार आनंददायक असते हे मत आता सर्वपरिचित झाले आहे. वैद्यक शास्त्रातील कांही शब्दच इथे घेण्यांत आले नाहीत तर त्यासोबत कल्पना आणि त्यामागील परिणामहि इथे घेण्यांत आले. 'विरेचना' नंतर होणारा मानसिक आल्हाद, शारीरिक उदाहरणांची समांतर रेषा ओढल्यावरच पटतो, हे पाहिले की हा खटाटोप मनोरंजक वाटतो ! पण या मतातहि सुधारणा झाल्या. तरीहि आज शोक किंवा दु:ख यांचा (नाटयातील) परिणाम प्रेक्षकावर आनंददायी होतो हे मत सर्वत्र मान्य केले जाते. दु:खकारक चेतकाने आनंद-परिणाम निर्माण केल्याचे उदाहरण मानसशास्त्र आणि विशेषत: प्रयोगिक मानसशास्त्र कधीच देऊ शकणार नाही. अर्थात 'चेतकाचा' विचार विशिष्ट मानसिक–संदर्भात जर केला तर गोष्ट वेगळी. जसे फांशी दिला जाणारा देशभक्त इ. . . . परंतु येथील चेतक (फाशी देणे) देशभक्ताच्या मनात हर्षाची लाट उसळून देत नाहीत हे उघड आहे. त्याला कारणे चेतकांतर्गत नसून वैयक्तिकच असतात. पण साहित्यात मात्र दु:ख आनंद निर्माण करू शकते, हे वरवर विरोधी दिसणारे सूत्र, मान्य केले आहे. कारण येथील मानसशास्त्र वेगळे आहे. परंतु साहित्य आस्वादातील मानसशास्त्र फार वेगळ्या पातळीवरच मांडावे लागते, हे पुरेपूर मान्य न झाल्यामुळे पाश्चात्य विचारसरणीत दु:खापासून आनंद कसा निर्माण होतो याची मीमांसा कांहीशी भ्रमपूर्ण झालेली आहे. ही विचारसरणी पाश्चात्य असल्याने प्रचलित मानसशास्त्राची (General Psychology), भूमिका सोडून देणे जरा गैर वाटले. पण त्याच वेळी ही भूमिका पूर्णतया मान्य करणे शक्य झाले नाही, कारण तसे करताच दु:खापासून आनंद काढून दाखविणे कधी शक्य झाले नसते.

शोकनाटयातील दु:खापासून होणारा 'आनंद', हा सर्वसामान्य आनंद असत नाही, ही गोष्ट प्रथमच स्पष्ट करावी लागेल. हा 'आनंद' Aesthetic-pleasure असतो, ऐंद्रिय आनंद नसतो. (म्हणजेच हा आनंद रसात्मक आनंद असतो किंवा रसानुभव असतो.) अर्थात Aesthetic-pleasure च्या खुणा स्पष्ट करणे सोपे नाहीच. ज्या कांही खुणा स्पष्ट करता येतील त्याच्या सहाय्याने कदाचित अधिकच अडचण निर्माण होण्याचा संभव आहे. सर्वसामान्य आनंदाच्या खुणा आणि Aesthetic-pleasure च्या खुणा यात महदंतर जर दिसून आले तर दोहोंना 'आनंद' ही एकच संज्ञा देण्याचा आग्रह टिकविता येणार नाही. Aesthetic-pleasure ला नमते Aesthetic experience म्हणावे लागेल. कलानंदाला रसानुभव म्हणावे लागेल. येथे असे वाटण्याचे कारण नाही की हा कांही शब्दांचा झगडा आहे. केवळ कांही शब्दांच्या योजनेत समस्या निर्माण झालेल्या नसून हे शब्द वापरताच त्या मागोमाग कल्पना कोणत्या उभाराव्यात आणि त्या कल्पनांमागे कोणती शास्त्रीय मीमांसा लागू करावी, हाच खरा प्रश्न आहे.

शोकनाट्यापासून Aesthetic-pleasure मिळू शकतो, असे म्हटल्यावर 'pleasure' या परिचित शब्दाचे (अर्थांच्या दृष्टीने) दडपण आले आणि त्या दडपणामुळेच हा शब्द ज्या मूळ क्षेत्रातील आहे त्यातील विचारसरणी सोडता आली नाही. साहित्यातील अनुभवांचे मानसशास्त्र वेगळया पातळीवरच रेखाटले पाहिजे, हे मान्य करताना जड जाऊ लागले. साहित्याचे मानसशास्त्र वेगळया पातळीवर नेताच प्रचलित मानसशास्त्राशी त्याचे असलेले प्राथमिक नाते तुटले असे वाटू लागले. खरे म्हणजे ही भीति निराधार आहे. प्रचलित मानसशास्त्रानेहि आज, दर्शनाचे प्राथमिक नाते मान्य करून, वेगळी पातळी प्राप्त केली आहे. एखाद्या शास्त्राने कांही प्राथमिक कल्पना एका विशिष्ट पातळीवर स्वीकारल्या-नंतर त्या शास्त्रातील संपूर्ण चर्चा व विवेचन त्याच पातळीवर झाले पाहिजे अशी अपेक्षा कोणी करू नये. पण या भीतिमुळे असू शकेल, साहित्यअनुभवात दुःखा-पासून आनंद कसा होतो याची पाश्चात्य-उपपत्ती बरीचशी गोंधळात टाकणारी ठरते.

मनाचे शुद्धिकरण होते म्हणून त्या शुद्ध मानसिक वातावरणात आनंद जाणवतो ही एक विचारसरणी आहे. यात कांही बाबतीत फरक करून नव्या स्वरूपात D. D. Raphael यांनी ती विचारसरणी Paradox of Tragedy या पुस्तकात मांडली आहे.

शोकनाट्यात जो दुःखदायी प्रसंग असतो तो वास्तविक दृष्टीने दुःख निर्माण करणारा किंवा दुःख देणारा जरी असला तरी पण रसिकावर त्याचा परिणाम 'वास्तविक' राहत नाही. (कां ?) इथे एक उदाहरण घेऊः--

एका नाटकातील नायक फार उमदा दाखविला आहे. नायक सर्व गुणांचा चाहता आहे. (अर्थात सर्वगुणसंपन्न असू शकतच नाही. कारण तसे करताच शोकनाट्याचा कणा मोडेल. सर्वगुणसंपन्न नायक असलेल्या नाटकात दुःख कसे काय राहणार!) कांही गुणांनी हा नायक मात्र संपन्न आहे. या गुणांना प्रेक्षकांची मान्यता असतेच. हा नायक परिस्थितीशी झगडतो आहे. नैतिक वजवजपुरी, आर्थिक संकटे, प्रणयमार्गातील कांटे, व खलनायक, ही सर्व त्या नायकाची कलहस्थाने आहेत. अर्थात या कलहात नायक हार जातो. (त्याशिवाय शोक-नाट्य नाही!) नायक अपयशी होतो किंवा मरतो. त्याचा हा 'मृत्यु' फार मोठे दुःख निर्माण करणारा ठरला पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. हा अखेर देखील प्रेक्षकांना 'enjoyable' ठरतो! ही प्रेक्षकांची enjoyment कोणत्या प्रकारची? ही enjoyment म्हणजेच Aesthetic pleasure मुळे निर्माण झालेली स्थिति म्हणावी लागते. नायकाचा मृत्यु जरी घडला असतो आणि खल-नायकाचा जरी 'जय' झाला असतो तरी पण रसिक प्रेक्षकाला नायक ज्या

गुणांकरिता, ज्या तत्वांकरिता झगडला तो झगडा फार रोमहर्षक वाटतो. तो कलह त्यांना प्रिय असतो कारण तो, सद्गुण विरुद्ध दुर्गुण असा कलह असतो, व सद्गुणांना रसिकांची मान्यता लाभली असते तो कलह कसा संपला हे रसिकांच्या दृष्टीने महत्वाचे नसते, तर तो सुरू झाला हेच विशेष असते ! नायक मोठ्या हिंमतीने गुणांचे संरक्षण करतो. त्यातच प्रेक्षकांना 'स्वत:चे' असे एक समाधान लाभते. जो कलह प्रेक्षकांना मान्य व प्रिय आहे, जो कलह कदाचित त्यांनीहि केला असता, तो कलह असा नाटचात पाहताना त्यांना विशेष आनंद होतो आणि समाधान लाभते. (Aesthetic pleasure) प्रेक्षक अशा रीतीने इथे वास्तवात (material events) भाग घेत नसून वास्तवापासून दूर गेलेल्या उच्च किंवा तात्त्विक-स्थितीत रस घेत असता. यालाच enjoyment in sublimity म्हटले आहे (Our pleasure arises from the feeling that one like us reaches the greater height. In my view, therefore, **abasement** has **no** place in tragic emotion...... Sympathy with the 'tragic hero' causes us to appreciate his **sublimity** more warmly than that of the power which confronts him.—D. D. Raphael–p.36)

नायक प्रत्यक्ष मेला असताना सदर्गुण-दुर्गुण यांच्या झगड्यात, सद्गुणांची प्रत्यक्ष हार झाली असताना, प्रेक्षक आनंदात तल्लीन होण्यास शिल्लक राहतो कसा ! **कारण** तो रंगभूमिपासून दूर असतो दूर असलाच पाहिजे. कितीहि अभिजात रसिक जरी असला तरी त्याची **स्वत:ची स्वतंत्र जाणीव** विझता कामा नये. प्रेक्षक म्हणून मी एक स्वतंत्र entity आहे आणि नाटच प्रदर्शित करणारा नायक हा दुजा आहे, ही जाणीव किमान प्रमाणात तरी शिल्लक असलीच पाहिजे. नाटकातील सक्रीय घटकापासून अलगपणाची ही जाणीव याच लेखात पूर्वी विचारलेल्या **'कां ?'** या प्रश्नाचे उत्तर असावे . . . एकतर प्रेक्षकाला शोक-नाटचात जाणवणारा आनंद हा sublime असतो (म्हणजे प्रेक्षक ज्या कल्पनांचा चाहता आहे, त्या कल्पनांची संघर्ष-वृत्ति पाहून निर्माण झालेला असतो) आणि दुसरे म्हणजे वास्तविक अर्थाने घडणारा दु:खकारक अनुभव हा प्रेक्षकावर ओढवलाच नसतो ही वेगळेपणाची जाणीव त्याला असते ही दुराव्याची जाणीव जर प्रेक्षकाला नसेल तर नाटक पाहताना तो रडेल किंवा दु:खमग्न होत्साता पडेल ! तसे घडल्यावर Aesthetic pleasure चा प्रश्नहि विचारार्थ उरणार नाही ! म्हणून प्रेक्षक व पात्र यातील जाणीवपूर्वक निर्माण झालेला वेगळेपणा (conscious duality) शोकनाटचातील समाधानाचे कारण आहे. 'दु:खकारक प्रसंग मजवर ओढवला नाही हे केवढे बरे झाले ! 'असे प्रेक्षकाचे (कातडी बचाऊ !) **सुप्त समाधान असते !**

इथे साहित्याचे उदाहरण म्हणून नाट्य घेतले आहे. हा प्रश्न साऱ्याच साहित्य प्रकारांचा आहे. साहित्याचा अनुभव घेताना रसिकाची मनःस्थिति नेमकी कशी असते याविषयी शोध घेणारा हा मुद्दा आहे. साहित्याचे रसिक मनावर होणारे परिणाम इथे शोधले जाणार आहेत. म्हणून याचा विचार जरा व्यापक कोनातून झाला पाहिजे.

साहित्य आणि रसिक यांचे परस्पर नाते स्पष्ट होण्याच्या दृष्टीने आणखी कांही सूचक प्रश्न जरी उपस्थित झाले तरीहि या लेखाचा कार्यभाग संपेल.

साहित्य आणि त्याचा रसिकाकडून होणारा स्वीकार यांचा विचार करतांना (शोकनाट्याच्या संदर्भात) वर दिलेली विचारसरणी मला सदोष वाटते. शोक-नाट्याची विचारसरणी इतर कलाप्रकारांना लागू करण्यात येऊ नये, असा आग्रह कोणी करणार नाही, असे वाटते. कारण शोकनाट्य या कलाप्रकारातील आस्वाद-प्रक्रियेची सूत्रें इतरांना विसंगत दिसता कामा नये. तपशीलात फरक होईल तरी पण येथील रसिकाच्या 'अलिप्त-भावनेचे' सूत्र तपशीलात जमा करण्यासारखे किरकोळ नाही. ते सूत्र इतरत्र लावता येंते का ? किंवा नाट्यप्रकारातहि ते सूत्र कितपत योग्य ठरते ?

नाट्यापासून प्रेक्षकाला लाभणारा आनंद खरोखर कोणत्या प्रकारचा अनुभव असतो ? सामान्य आनंद ज्या खुणांनी आम्ही स्पष्ट करतो त्या खुणा व ती पातळी विसरुनच या प्रश्नाचा योग्य विचार होऊ शकेल हे प्रथमच स्पष्ट करतो.

शोकनाट्याचा परिणाम रसिकावर 'अनुकूल' (enjoyable) होतो आणि हीच एक रसास्वादातील समस्या आहे व केवळ तिचाच विचार करावयाचा असे नसून, या सर्व प्रश्नांचा व्यापक संदर्भात विचार करावा लागेल हे नमूद केले आहेच. कारण रसाचा परिणाम (जसा प्रसंगाचा प्रत्यक्ष परिणाम होतो) रसिका-वर प्रतिकूल न होता अनुकूल होऊन, त्याच्या व्यक्तिमत्वाची व सौंदर्यांकुल–वृत्तीची सूक्ष्मता वाढविणाराच होतो. (म्हणजे प्रत्यक्ष दुःख-शोक या भावनांपेक्षा वेगळा परिणाम होतो.) तसेच इतर कलात्मक अनुभवांच्या बाबतीतहि घडते. कलात्मक पातळीवरील प्रत्येक भावना रसिकाला या दृष्टीने वेगळी वाटते आणि वेगळे संस्कार देऊन जाते. हर्ष, प्रणय, क्रोध इत्यादि सामान्य भावना आणि कलांतर्गत भावना यातील फरक जर लक्षात घेतला तर हे स्पष्ट होऊ शकेल. प्रणयभावनेचा प्रत्यक्ष व सर्वसामन्य व्यवहार आणि कलात्मक पातळीवरील व्यवहार, यात अंतर असते. प्रत्यक्ष भावनेचा परिणाम हर्ष दुःख यांची जाणीव देणारा असेल तर कलात्मक पातळीवरील भावनांचा परिणाम (हर्ष दुःख देणारा मुळीच नसून) रसिकाला आक्रमून उरणारा व त्याचे व्यक्तिमत्व संस्कारीत कर-णारा असतो म्हणूनच खरा प्रश्न असा आहे की, सर्वसामान्य भावना ही कलात्मक

पातळीवर येताच तिच्यात बदल होतो कसा ? हा बदल केवळ कांही बाबतीत असतो असेहि नाही तर संपूर्ण भावनेच्या स्वरूपातच असतो. त्या भावनेचा आविष्कार स्वरूप आणि अनुभव (रसिकाला मिळणारा) किंवा 'आघात' (impact-रसिकावर होणारा) या साऱ्याच बाबतीत हा बदल असतो. आणि साहित्याच्या मानसशास्त्राची सूत्रे प्रस्थापित करताना या प्रश्नाला स्वतंत्र स्थान द्यावे लागेल. या प्रश्नाच्या उत्तराची सामान्य दिशा 'रसिकाचा अपरिमितभाव' या लेखात देण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्याच दिशेने योग्य उत्तर सांपडेल असे वाटते.

कलात्मक पातळीवरील शोकानुभवात रसिकाला विशेष समाधान देणारे खरोखर काय असते ? (आणि इतर कलात्मक अनुभवात तरी असे काय असते?) शोकानुभव हा प्रत्यक्ष स्वरूपात समाधान देणारा असत नाही, हे उघड आहे. तेव्हा त्या अनुभवाचा कलात्मक पातळीवर होणारा 'असामान्य आघात' हाच खरा जबाबदार घटक मानणे भाग आहे.

हा 'असामान्य आघात' (unusual impact) कोणत्या विभिन्न दृष्टिकोनातून असामान्य आहे हा महत्वाचा विषय अन्यत्र चर्चेला घेण्यासारखा आहे. मात्र इथे एक निश्चित सांगता येईल--

--हा आघात देण्याचे श्रेय शोकात्मक किंवा हर्षात्मक अशा कोणत्याहि भावनेने मिळविले असो, पण या आघाताचा परिणाम मात्र शोकात्मक किंवा हर्षात्मक न राहता केवळ 'आस्वाद्य' (इतकाच) राहतो, हे विशेष आहे. आणि हा आस्वाद (aesthetic experience) म्हणजे सर्वसामान्य समाधान किंवा आनंद नसतो हे देखील स्पष्ट आहे.

मंगल चरण (पृष्ठ ६५ वरून)

"त्या मंगल चरणाची ही पुण्याई !"

*   *   *

सूर्य मावळला. बीजेची बारीक नाजुक चन्द्रकोर आकाशात निर्मल हास्य करीत होती, आणि तिच्याकडे पाहून मंजुळेनं प्रथम चरणचे स्वच्छ पाय धुतले. त्याला टिळा लावला. आणि मग तिनं पंचारती ओवाळली ! अन् चरणनं उंची खण नि भरजरी शालु मंजुळेला भेट देऊन आपलं भगिनी प्रेम व्यक्त केलं ! स्पृश्यास्पृश्य मीलनाचं—बंधुत्वाचं—एकतेचं ते मंगल प्रतीक होतं !

आणि त्या शुचित्वाच्या, मांगल्याच्या पवित्र समयी वंदे मातरम् गीताच्या मधुर लहरी आसमंत भारून टाकीत होत्या !

पायवाट, वेदना, अन् एक आभाळ

—ले. इंदुमती शेवडे

लंडनचं हे फाटकं आभाळ....हे कधी मला आकळलं नाही.

'करेज अँड बार्कले' मध्ये मी बसलेय तिथून या आभाळाचा एक चौकोनी तुकडा उजव्या हाताच्या खिडकीच्या तावदानातून मला दिसतोय....अन् चित्रकार वर्षानुवर्षं इथल्या आभाळाला रंगवीत कां बसतात याचं कोडं उलगडतं...

वर्णन करता येत नाहीत असे रंग यात दिसताहेत. विटका निळा, फिकट जांभळा, मळकट पांढरा, क्वचित् हिरवी छटा...मधून मधून ढगांची सतत बदलती रुपं...हा आग्नेयेकडे एक भला थोरला काळा ढग दबा धरून बसलाय.. केव्हां टिपं गाळील याचा नेम नाहीं...

खाली, क्षितिजाला 'हॅमस्टेड' टेकडीची वळणदार रेषा...रात्रीचे साडे नऊ...सूर्य मघाशीच टेकडी मागे नाहीसा झालाय...या साऱ्या रंगावर एक जांभळट राखडी रंगाचं विचित्र आवरण मला दिसतें...या रंगात साऱ्या वस्तु विलक्षण जिवंत भासतात...हा रंग मला नेहमीच वेड लावतो...त्यात उगाचंच अज्ञाताची ओढ लागतेय...अन् मन व्यथित होतय...

अन् या रंगात न्हालेली समोरची झाडं मंद वाऱ्यानं फडफडताहेत... रस्त्यावरचे दिवे लागताहेत. 'हॅमस्टेड'ची जत्रा संपताना दिसतेय...माणसं पांगताहेत...दुकानं आवरताहेत...मधमाशांसारखा आवाज घोंगावतोय अन् हे सलूनचं दार उघडं पडलंय...

एक तरुण जोडपं हळूच आत येतं...कुजबुजत...अन् दोन पेले घेऊन रिकाम्या टेबलाशी बसतं... तिच्या गळ्यातल्या चांदीच्या कूसावर क्षणभर माझी नजर खिळते...तेवढ्यात समोरच्या उंच स्टुलावर बसून, काऊंटरवर हात टेकून बसलेला म्हतारा खोकतोय. एकटाच बीर ढोसतोय...त्याची सोनेरी आंखूड दाढी नारळाच्या शेंडीसारखी दिसतेय...बहुधा हा त्याचा चौथा पेला. कोणजाणे...कदाचित् पांचवाहि. काऊंटरमागे हंसत उभी असलेली पोरगी तो भरतेय...तिचे लालचुटुक रंगीत ओठ...अन् केसांचं आधुनिक पिरॅमिड...

आतल्या दिव्याचा हा पिवळट प्रकाश उगाच मध्ये उभा असल्या सारखा वाटतो...डोळ्यांना सलतो. मला बाहेरच पहावंसं वाटतंय...टेकडीची रेशमी हिरवळ आळसावलीय...सडपातळ. झाडं सलगीनं उभी आहेत त्यांमधून वाट काढीत जाणारी ती पायवाट...

ती पायवाट पाहून माझे विचार अडखळतात...डोळे अडखळतात... अन् मग पुष्कळच दिसू लागतं...वॅटरसी पार्क, तिथला विजेचा आकाश पाळणा, त्यातले 'फ्लाईंग सॉसर'च्या आकाराचे लोंवते पाळणे, उडती, पाणवोट, गरगर फिरणारे घोडे, ओळीत उभी असलेली 'थ्रपेनी' जुगार यंत्र, पार्कमधले हेनरी मूरचे प्रचंड पुतळे, स्ट्रँडचं भुयारी स्टेशन,...त्याजवळच्या दुकानातला तो निळा शर्ट, खोलीतल्या हीटरच्या नारिंगी ज्वाला, त्यासमोर अंथरलेला पर्शियन गालिचा पिकेडलीचं पाकिट...कॉफीचं कांचपात्र....वॆंजामिन ब्रिटनच्या "War Requiem"च्या तवकडचा...अन् किती तरी...

ह्या साऱ्यांचो गुदमरून टाकणारी, असंख्य गर्दी. मी वाहेरून नजर काढून घेते अन् आत वळवते.

या गर्दीत केव्हांतरी केन येऊन समोर वसलाय...अन् वहीत रेघोटचा ओढतोय...

"हॅलो ऽऽ!"

त्याचे शब्द मला जागं करतात...ही गर्दी तात्पुरती मागे लोटतात...

"केव्हां आलास ?"

"मघाशीच !"

"काय काढतोहेस ?"

"नुसतं डूडलिंग"

"त्यापेक्षा तो समोरचा म्हातारा काढ ना!" तो नुसता हसतो अन् खिडकीचं तावदान् फुटळचागत मला वाटतें. कुठेतरी मनाला ओरखडा पडतो. वाटतं, आजहि याचं हंसू मावळत नाहीय. मी वोलत नाही. बाहेर पाहू लागते.

मग हातातली वही वाजूला ठेवून केन उठतो. अन् काऊंटरला टेकून पाठ मोरा उभा राहतो. ती केसांचं पिरॅमिड केलेली मुलगी त्याला पेले भरून देतेय.. प्लेट तयार करतेय....मागून त्याच्या पाठीचं कुवड मला वाढल्यासारखं दिसतं. गात्रं शिथिल वाटतात...खांदे उतरलेले वाटतात...अन् मघाशीची ती गर्दी माझ्या मनात पुन्हा दाटते...

पण परत येऊन तो वसतो...तो पुन्हा शांत हंसऱ्या चेहऱ्यानं...त्याच्या पाठमोऱ्या आकृतीनं जे सांगितलं ते चेहऱ्यानं पुसलेलं आहे.

अनुक्रमणिका

मग पेले ओठांना लागतात...

"विमान कधीचं आहे ?"

"उद्या सकाळी दहाचं..."

"त्यावेळी मी कामावर असेन..."

पुन्हा मध्यंतर... तीच आठवणींची गर्दी...शब्द त्यातून वाट शोधण्याचा प्रयत्न करीत होते...परतत होते. पुन्हा कधीतरी तो म्हणतो...

"म्हणजे हे "लास्ट सपर" !"

मला क्रूस पाठीवरुन वाहून नेत असल्यासारखं वाटलं !

"दुष्ट कटु शकांचं तुला वरदान आहे !"

"मानवी जीवनच दुष्ट अन् कटु आहे. त्याला मी काय करु ?"

तो हंसून म्हणतो...मला वाटतं, त्याला सांगावं निदान आज तरी अशा आठवणी काढू नकोस..."

पण तो तसाच हंसत राहतो...हंसण्यातूनच जगण्याची त्याची ती धडपड एरवी मला आवडायची पण आज वाटतं....निदान आज तरी हा हास्याचा मुखवटा नको.

जणु माझे विचार त्याला कळतात....अन् कारण नसताना तो उत्तर देतो...

"आज चार्ली चॅपलिनची एक उत्कृष्ट तवकडी ऐकली मी"

"कोणती ?"

"Smile...always smile..

Although it breaks your heart !'

मला उत्तर देववत नाही...मी मान वळवते अन् पुन्हा वाहेर पाहू लागते...'हीथ' वरची ती पायवाट जणु माझ्या दृष्टीची वाट पाहते..ती जाताच ती पुन्हा जिवंत होते. तिच्या लगतच्या गवताचा हिरवा रंग सुद्धा स्पष्ट दिसू लागतो...

त्याला माझे विचार ठाऊक आहेत...अन् मला कळतं...की त्याचंहि मन माझ्या वरोवर त्या पायवाटे वरून जात आहे...

अन् त्यानंतर मात्र तो हंसायचा थांबलाय....स्तब्ध झालाय....त्या म्हाताऱ्याकडे रिकाम्या नजरेनं वघतोय. त्याची ती स्तब्धता मला सहन होत नाही. मी केविलवाणी त्याच्याकडे वघते...अन् त्याचं मूक प्रत्युत्तर येतं...

"तुम्हांला हेच हवं होतं काय ?"

त्याला वोलकं करण्यासाठी माझी धडपड होतेय...

"असा गप्प का बसलास ?"

"विचार करतोय..."

"कसला ?"

"यासाऱ्यातलं स्वप्न कोणतं नि सत्य कोणतं याचा"

"हे सारंच स्वप्न आहे...माणसांचं आयुष्यच नव्हे तर ही सारी सृष्टी स्वप्नवत् आहे, आभासमय आहे असं आमचं एक तत्वज्ञान म्हणतें..."

"मला नाही पटत. .मी जगतोय हे जितक्या उत्कटतेनं मला खरं वाटतं...तितक्याच उत्कटतेनं हे विश्व अस्तित्वात असल्याचं मला वाटतें... मला वाटतं...अनुभवाच्या उत्कटतेचा....पातळीचा प्रश्न आहे...उत्कट अनुभुतीचे लहानसे क्षणहि सत्य असावेत. "

त्याचा तो मृदु, समांतर शब्दप्रवाह कुठलंहि उत्कट प्रतिपादन करताना, दुसऱ्याचं विधान खोडून काढतानाहि, कधीहि न उंचावणारा स्वर...एरवी तो शब्दप्रवाह सुखावणारा वाटायचा. .पण आज सारंच पालटलंय..... आज तरी याचा स्वर बदलावा...उंच सखल व्हावा...वर खाली व्हावा... पण त्याच अविचलित स्वरानं तो म्हणतो.

"इथंच .. अशीच भेट झाली होती आपली प्रथम....

"अं...दोन महिन्यापुरती. "

"पण त्याची आपण दोन वर्षं केली, असं वाटतं मला"

"पण कशासाठी ? ...मी कुठली कोण ! तूं दुसऱ्या कोपऱ्यातला. कांही अर्थ याला ? सांगना ?"

"असेल कांही अर्थ..."

"कळला तुला ?"

"आज नाही उद्या कळेल कदाचित्..."

"हे तुझं तारुण्य बोलतंय...उद्या माझ्या एवढा झालास को भाषा बदलेल तुझी...!"

"कोण जाणे !...आज तरी ॲल्डस हक्सलेच्या वाक्याचा आधार आहे माझ्या वाटण्याला..."

"कोणत्या ?"

"We live life in future ! It is only in retrospect that we understand its meaning !"

"कोणजाणे ! मला ही नुसती शब्दांची चिरफाड वाटते...कांही घटनांचा अर्थ कळला नाही म्हणजे मनाची शब्दजंजाळात केलेली फसवणूक !"

अनुक्रमणिका

"कांहीच अर्थ नाही याला ?"

"नाही वाटत..."

"हा तुमचा भारतीय निराशावाद ना ?"

"नाही...हा भारतीय नाही. .माझा स्वत:चा आहे. या ईश्वराच्या दुनियेतल्या साऱ्याच गोष्टींचा अर्थ लागत नाही. .माणूस चहुंबाजंनीच कोऱ्या भिंतींनी घेरलेला आहे...मागे जन्माची भिंत...कां जन्मला ? कशासाठी ? विशिष्ट ठिकाणीच कां ?..."

तो भिंतीसारख्या कोऱ्या चेहऱ्यानं पाहतो. मी विचारते "घावरलास ना ?"

"नाही. .बोला...बोलत रहा..."

"पुढची मृत्यूचीहि भिंत तशीच कोरी...अन् समोरच्या वर्तमानाच्या भिंतीवरची प्रश्नचिन्हं सोडवण्यात उभा जन्म घालवला...तरी एकहि ठामपणे सुटत नाही.. एकातून अनंत प्रश्नचिन्हं निघतात. .अन् चक्रवाढ व्याजासारखी वाढत राहतात...अन् शेवटी या प्रश्नचिन्हांच्या भोवऱ्यात माणसाची जगण्याची धडपड निपचित होऊन पडते. अर्थ हारवून बसतो. "

"पण आयुष्याचा अर्थ लागलाच पाहिजे, हा तरी अट्टाहास कां ?"

"त्याशिवाय कुठल्याहि घटनेला अर्थच कुठे उरतो. .कुठल्याहि कृतीला प्रयोजन काय ? त्याशिवाय, घराचा प्लॅन माहीत नसताना उगाच एकावर एक विटा रचण्यासारखं आहे ते."

"तुमच्या सारख्यांनीहि, जीवनात कांहीतरी मिळविलेल्यांनीहि असं म्हणावं ?"

"मग काय करू ? खरंय ते ?"

"मग तुम्ही एवढं कशासाठी केलंत. .?"

"नुसत्या विटा रचणं आहे ते !"

"खरं ?"

"नाहीतर काय ? प्लॅन माहीत नाही. इतर रचतात म्हणून रचायच्या... ह्या मानवी धडपडी बद्दल ठाऊक आहे मला काय वाटतं नेहमी ?"

"काय ?"

"जणु सारेच कुठल्यातरी दिशेनं धावत असतात. सतत...अन् त्यांच्या-मागून नवा आलेलाहि धावतो. कुठे ? कशासाठी ? .याचा मात्र कुणालाच पत्ता नसतो. क्षणभर थांबून या शर्यतीबाहेर उभं राहिलं की कळतं हे. .शेवटी काय ?...तर अनंत प्रश्नचिन्हं उभी करायची. .अन् सोडवायचं साधन मात्र द्यायचं नाही"

"नाही ? . . . हे मन आहे ना ?"

"ते घडवलंय . . . तसं अपुरं आहे नं ? ते वदलायचं . . . तर उभा जन्म निघून जातो ! . . . मला इमर्सनचं एक वाक्य वारंवार आठवतं . . ."

"कोणतं ?"

"तुमच्याशी कुणीतरी सतत बोलल्याचा भास होतो .पण बोलणाऱ्याचा चेहरा मात्र कधीच दिसू शकत नाही . . ."

"म्हणजे इकडून तिकडून सारी निराशाच . . . ?"

"असंच शेवटी म्हणायचं. मानवी जीवन मूलत: शोकांतिकच . . . अशा निर्णयाला आलेय मी"

"मग अशी माणसं जगतात कशासाठी ?"

"मरण येत नाही म्हणून . . . किंवा जीवना इतकंच मरण अज्ञात असतं म्हणून म्हण हवं तर !"

मला वाटतं . . . समोरच्या पेल्याप्रमाणे सारं कांही रिकामं होऊन पडलंय. . . . क्षणभर तो शांत बसून राहतो . . . मग म्हणतो . . .

"माझं चित्र इतकं काळंकुट्ट नाही . . ."

"नाही ?"

"अंहं ! मला वाटतं माणसानं जीवनाचा अर्थ लावण्याची उरस्फोडच करू नये . . . जोवर एक गोष्ट जगण्यासारखी आहे . . ."

"कोणती ?"

"माणसाला एकमेकांबद्दल वाटणं, ही . . ."

"पण तेहि वाटणं बदलतं ना ? कित्येकदा . . ."

"पण साऱ्यांचं बदलत नाही . . ."

"पण या वाटण्यातून दु:खाचा असह्य डोंगर निर्माण होतो . . ."

"पण त्यामुळे वाटण्याचं थांवत नाही . . . त्याचा अंत होत नाही . . ."

"पण कांहींना तो डोंगराचा भार सहन होत नाही . . . त्यांनी काय करावं ?"

"तरीहि जगावं . . ."

मला वाटलं त्याला विचारावं, एवढया लहान वयात एवढं शहाणपण कुठे शिकलास ? पण त्याचंहि उत्तर मला ठाऊक होतं . . . "जगण्याच्या धडपडीतून . . ." मी रिकाम्या पेल्याला कुरवाळीत बसून राहते . . . तो बाहेर पाहत म्हणतो.

"माय गॉड ! . . . मला वाटतं . . . मी गुदमरेन आतां . . ."

"कशानं ?"

"ह्या चर्चेनं...मला वाटतं..या आभाळातून खाली जमीनीवर येऊं या."

"हं ऽ ऽ ?"

"हं...! कशा हंसलात अता ?...मला वाटतं माणसानं आपलं हंसं कधीहि गमावू नये..."

"लक्षात ठेवीन..."

तेवढ्यात तो उठतो. .अन् समोरचे पेले काउंटरवर भरून घेऊन येतो... तो म्हातारा अजून स्टुलावर चिकटून आहे...ते जोडपं मात्र निघून गेलंय...

"ह्या सँडविचेसना अजून हात लावला नाही तुम्ही !"

"मला भूक नाही. .! खरंच...!"

"मी तुम्हांला उभाउभा दिवस खाताना पाहिलं नाही. .आम्ही चार-चारदा खातो...म्हणून विशेष..."

"बरं खाते आज...!"

मी सँडविचचा तुकडा तोडते...पण तिची चव गेली आहे.

"बाहेर पहा. .तुमच्या बोलण्यानं सगळ्या वस्तूंच्या छटा पालटून गेल्या आहेत. "

मी पाहते...आभाळ काळवंडून गेलंय. .झाडं आकसून गेलीयत. वारा निपचित पडलाय. .रस्त्यावरचे दिवे केविलवाणे दिसताहेत .अन् त्यांच्या क्षीण प्रकाशात ती पायवाट. .हताश होऊन पडलेली वाटतेय.

"कितीवेळ लागतो तुमच्या देशात पोचायला ?

"चौदा तास...चोवीस तासात मी इथून निघून कामावर रुजू होऊ शकते..."

"अगदी खरं वाटत नाही...एका दिवसरात्रीत इकडचा माणूस तिकडे अनेक सहस्र मैलांवर नाहीसा होतो ?"

"हं ! अन् ह्या जगातून दुसऱ्या अज्ञात जगात जायला तर सेकंदहि लागत नाही..."

"मघाशी मला म्हणालात...पण तुम्ही स्वतःच निर्दय आहांत.

"त्याला तुम्हांच मघाशीचं उत्तर देते...आयुष्यच निर्दय आहे. .त्याला कोण काय करील ?...असं दूर जाणं...म्हणजे एक प्रकारे माणूस जिवंत असून मृतवत् होणंच नाही का ?

"अंहं ! पुन्हा नको ती भाषा ..."

"बरं नको !"

मी हंसले...समोरचा पेला उचलून त्यात पहात तो म्हणाला...

"हा रंग मला फार आवडतो. . .जिवंत वाटतो. . ."

"हे रंगाचं जग तुझं आहे. . ."

"अन् तुमचं शब्दांचं. .! पण सांगू. . .? कधी कधी शब्दांना सुद्धा रंग असतात. .अन् रंगांना शब्दासारख्या छटा असतात. . .त्यांना भाषा असते. . ."

"हो. . .म्हणतात खरं असं. . ."

"म्हणतात नाही. . .मी म्हणतो. . ."

त्यानं पेला ओठाला लावला. . .अन् म्हटलं. . ."खरंच, मी तुम्हांला कधीच कांही वैयक्तिक विचारलं नाही. . .अन् आपण कितीदा तरी भेटलो. . ."

"तुमचे मॅनर्स ! माझी हरकत नाही..."

"कोण कोण आहे तिथं तुमचं ?"

"एक मुलगा आहे...लहान आहे तुझ्यापेक्षा..."

"उल्लेख आला होता एकदोनदा तुमच्या बोलण्यात."

"अन् एक म्हातारी सासू..."

"असं..."

"अन् मला तरी तुझ्याबद्दल कुठे काय माहीत आहे ? तूं रंगाचे खेळ खेळतोस...अन् त्यादिवशी जिम बरोबर तुझी ती खोली अन् चित्रं पाहिली... तेवढीच..."

"अगदीच भिकार आहे सारं...!...विशेष आणखी सांगण्यासारखं आहेच काय मजजवळ ?"

"कुणीच नाही ? एकटाच आहेस ?"

पण त्याचं लक्ष कुठे होतं ? त्याचे बारीक निळे डोळे इकडे तिकडे भिर-भिरत होते...त्यातल्या छटा...या इंग्रजी आभाळा सारख्याच कधी आकळल्या नाहीत मला...

"बाँड स्ट्रीट मध्ये जाऊन आलास आज ?"

" हं "

"काय झालं ? विकलं गेलं तुझं चित्र ?"

"अं...ह्या चित्राला खरीददार मिळाला होता..." त्याच्या वहीखालचं पार्सल मला दिसलं...

"मग ?"

"पण...मी ते विकलं नाही !"

"कांरे ?"

"मला ते दुसऱ्याला द्यायचं होतं..."

"भलतंच ! अरे पैशाची गरज आहे ना तुला? वेडा आहेस की काय?..."

"असंच समजा..."

अन् तो स्तब्ध बसून राहिला. त्याची हंसरी धडपड मंदावली होती. समोरच्या सँडविचेस तशाच उदास पडून होत्या...एकाएकी तो म्हणतो...

"मघांशी तुम्ही विचारलंत तेव्हां उत्तर दिलं नाही मी...पण मला आई आहे..."

"मग बोलला नाहीस कधी...? अन् भेटहि करवून दिली नाहीस...! तिच्याजवळ रहात नाहीस तू ?

पण त्याचं पुन्हां उत्तर नाही...संथपणे तो उठतो...अन् पेले भरून घेऊन येतो...दोनचार घोट घेतल्यावर त्याचं उत्तर येतं...

"मी तिला ओल्ड पीपल्स होम मध्ये नेऊन ठेवलंय..."

"कां ? म्हातारी आहे फार ?"

"नाही...तिला मी आवडत नाही म्हणून !"

"भलतंच...असं कधीच नसतं...निदान भारतीय आईचं तरी नसतं..."

"पण खरंय ते...!"

"कशावरून...?"

पुन्हा त्याचं उत्तर नाही...तो नुसते घोट घेत बसून राहतो...

"सॉरी !...हे एक पार्सल आणलंय तुझ्यासाठी ! घे उघड..."

त्यानं ते निर्जीवपणे माझ्या हातातून घेतलं हळूंच उघडलं अन् भिरभिरत्या नजरेनं म्हणाला;

"माझा आवडता रंग !...थँक यू...थँक यू व्हेरी मच...! ...'पीटर रॉबिन्सन' मधला शर्ट ना !"

"त्यादिवशीं तुला आवडला होता...म्हणून आणला. एरवी तुझी आवड निवड कळलीच नसती..."

"थँक यू हा शब्दप्रयोग आमच्या भाषेत इतक्यांदा येतो...की त्याला अर्थ उरेनासा होतो...पण मला जे वाटतंय...त्यासाठी दुसरे शब्द नाहीत"

"असू दे..."

कसंबसं हंसण्याचा तो प्रयत्न करीत होता. माझ्या नजरेसमोर त्याचे ते आलटून पालटून घातलेले दोन शर्ट दिसत होते...पण रोज नव्यानं ते घालत असल्यासारखं वाटायचं...! हंसत जगण्याची त्याची ती धडपड...

सलूनमधला प्रकाश एकाएकी मरगळलाय...माणसांची गर्दी मंदावलीय... पिते जीव तुष्ट आहेत...अन् स्वप्नात स्वतःला विसरत आहेत.

भिंतीवरच्या विग वेनमध्ये वाराचे ठोके पडतात...वेळ संपल्याची ती सूचना...आम्ही दोघेहि मनात ठोके मोजीत आहोत...आता फक्त थोडेच क्षण बाकी आहेत...काळाच्या लांब अनंत रेषेवरील दोन बिंदूंची धडपड...

ठोके संपतात... तो हळूच, शांतपणे उठतो...अन् हातात वही नि त्याखालचं पार्सल उचलतो.

नकळत मीहि उठते...पण पाय जमीनीला खिळल्यासारखे वाटतात... अंगात कोट चढवते...अन् मूकपणे खिडकी बाहेर पहात उभी राहते...तेवढा क्षणहि मला पुरे होतो...दिवे असून बाहेर दिसत नाही...पायवाट त्या अंधारात पुसली गेली आहे.

आम्ही बाहेर पडतो...निमूटपणे...हीथच्या कडेनं चालू लागतो. रस्त्यावरचं तिचं कुंपण दिव्याच्या पिवळ्या प्रकाशात...क्षणभर दिसतं...अन् दृष्टीत विरतं...कुठे काहीच दिसत नाही...केवळ पावलं मोजली जातात. दोन वाटा समोर फुटल्या आहेत...तोच पूर्ण विराम...त्या अंधारात त्याचा स्वर भेदून गेल्यासारखा वाटतो...

"मघाशी तुम्हांला सांगायचं धैर्य झालं नाही आई माझा तिरस्कार कां करते ते..."

"का ?"

"सांगू ?...मी Illegitimate आहे..."

क्षणभर मी अवाक्पणे त्याच्याकडे पहात राहते...मला शब्द सांपडत नाही...

"अशी क्रूर थट्टा करू नकोस, केन"

"स्वतःच्या जन्माबद्दल अशी थट्टा संभवते तरी ?" तो केविलवाण्या स्वरात म्हणाला...आता त्याचं हसूं मावळतं...नजर नुसती भिरभिरत राहते...पराभव झाल्यासारखा तो बसून राहतो...

मी मुकाट त्याच्याकडे नुसती पहात राहते...त्याचे ते निळे, विचारी डोळे, शांत, स्थिर वृत्ति, हस्तिदंती रंग, सोनेरी केस...तसाच मृदु रेशमी स्वर व त्याची ती हंसत जगण्याची धडपड...या साऱ्यात एक वेगळा अर्थ मला दिसू लागला... मला कांहीतरी बोलावंसं वाटत होतं...पण शब्द पुन्हा पुन्हा निसटून खाली पडत होते......

"मला वाटलंच...तुम्हीहि माझा तिरस्कार करू लागाल म्हणून !..."

"मी ? तुझा तिरस्कार ? नाही रे बाबा...!"

(पृष्ठ ८५ वर)

अनुक्रमणिका

अजात शत्रु गोविंदराव दोडके

लेखक–श्री. आनंद जोग

गोविंदराव गेले त्या सायंकाळची गोष्ट. श्री. सप्रे व मधुकर डांगरे त्यांना भेटण्यास गेले होते. दोन चमचे दूध पिण्याचीहि शक्ति त्यांच्यात राहिली नव्हती. पण ओळखीचे लोक आलेले पाहून गोविंदरावांनी उठून बसण्याचा प्रयत्न केला. उशीखाली असलेले "वालकवीचे" पुस्तक काढून ते श्री. डांगरे यांना म्हणाले, "तू वाचले का रे हे पुस्तक ? चांगलें आहे." मृत्यू गोविंदरावाजवळ आल्याची श्री. सप्रे व डांगरे यांना जाणीव झाली होती. पण गोविंदराव मात्र वालकवी-बद्दल बोलत होते. मरणाच्या दारातून श्री. डांगरे यांना 'वालकवी' वाच म्हणून सांगत होते. नाटककार कामूच्या "कॅलीगुला प्रमाणे" अखेरच्या क्षणी सुद्धा ते "I am alive" असेच सांगत होते जणू !

*　　　*　　　*

गॉर्कीने त्याच्या विश्वविख्यात "मदर" कादंबरीची सुरवात "Every Step an impeecrptible towards the grave" अशी केली आहे. जन्म–मरण हा निसर्ग नियम. केव्हांना केव्हां तरी मरण येते; कसल्या तरी व्याधींनी ते येते. कधी त्या समजतात; कधी त्यांचे निदान सुद्धा होत नाही. पण गोविंदराव रंगात आले कि सगळ्यांना माहित असलेल्या ह्या त्रिकालाबाधित सत्याचा–कटू सत्याचा विसर पडत असे. "कंटाळवाणा" ह्या शब्दाचे उच्चाटन होत असे. मरणोन्मुख असताना देखील गोविंदरावाची कलासक्ति गेली नव्हती. आपल्याकडे येणाऱ्या कुणाचेहि "या बसा" अशा शब्दात मनमोकळे पणाने स्वागत करायचे हा गोविंदरावांचा पिंड, मृत्यू आला तरी त्याच्या स्वागताकरिता ते कांहीतरी हुडकत होते.

*　　　*　　　*

गोविंदराव गेले अन् साखळीचा मधलाच दुवा तुटल्यासारखे झाले. ते होते तोपर्यंत श्री. सखारामपंत जोशी व नाना जोग ह्यांच्यात मतभेद झाले तरी नागपूर नाट्य मंडळाचे कार्य बंद पडले नाही. पदस्यांनी राजीनामे दिले तरी ते परत घेतले जात होते. नट नसून देखील नाटके चालू ठेवण्याची, उभी करण्याची गोविंदरावांत किमया होती, कारण ते जातिवंत कलाकार होते. स्वतः त्यांनी

अनुक्रमणिका

लौकीकदृष्टा संसार थाटला नाही, तरी बिघडू पाहणारे नाट्य—संसार त्यांनी विकोपाला जाऊ दिले नाहीत.

* * *

मी गोविंदरावांना जवळून पाहिले ते श्री. बाबूराव चिमोटे यांच्या संगतीत. त्यांच्यात आणि माझ्यात एका तपाचे अंतर. पण त्यांच्या वागण्यात त्याची कधी जाणीव सुद्धा होत नसे. कधी कधी श्री. चिमोटे म्हणायचे "गोविंदा मी तुला नाटकात काम करायला लावणार आहे." त्यावर गोविंदराव बहुतेक उत्तर देत नसत. पण कधी तरी लहर असली तर म्हणायचे "अरे जा ! तु का काम करायले लावते मला ! छप्पन पाहिले तुमच्यासारखे !" अन् मग त्यांचे मुक्त हासणे सुरू व्हायचे.

पहिल्या पहिल्यांदा श्री. चिमोटे असले तरच गोविंदराव "पंचशील" मध्ये थांबत असत; नसले तर निघून जायचे. आमचे त्यांचे संबंध फार घनिष्ट नव्हते. नंतर ते अंतर कमी होत गेले. आणि आमच्यात येऊन ते बसू लागले. आम्ही त्याना प्रश्न विचारत असू. विषय नाटक, सिनेमा, कादंबरी, एक ना दोन. गप्पा करण्याची जागा वि. सा. संघा बाहेर बांधकामासाठी आणलेली रेती किंवा रंगमंदिराच्या बाजूला असलेलं संत्र्याचं छोटेखानी झाड ! गप्पा-बरोबर चहा, शेंगदाणे, उसाचा रस अशा गोष्टी असत. ते गेले अन् वाळूवरील त्या गप्पा व तोंड चालू ठेवणे कमी झाले. बैठकी चालूच आहेत पण त्यातील रस कमी झाला आहे. गोष्टी करताना एखाद्या मुद्यावर गाडी अडली तर-मग नाटक असो, सिनेमा असो, कोणत्या सिनेमात वा नाटकात कोणत्या नटाने वा नटीने काम केले ह्या सारखे प्रश्न असोत. गोविंदरावांना विचारावे व शंका निरसन करून घ्यावे. ह्या गोष्टीची इतकी सवय जडली होती कि आता कांही अडचण आली कि त्यातून मार्ग सापडत नाही. गोविंदराव होते तेव्हां कुणाचं काही अडू देत नसत. गप्पांचा ओघ अबाधित चालायचा. आता आमचा संदर्भ ग्रंथ हारवला आहे, त्यामुळे पदोपदी अडते.

* * *

आताच्या काळात पुस्तके विकत घेऊन वाचण्याची संस्कृति जवळजवळ संपुष्टात आली आहे. घेतली तरी वाचायला देण्याची पद्धत बंद होत आली आहे. पण गोविंदरावांना दोन्ही गोष्टींचा छंद होता. नवनवी पुस्तकें विकत घेण्याचा, आपल्याला आवडलेली पुस्तके मित्रांना वाचा म्हणून सांगण्याचा, वाचायला देण्याचा. शाळेत ते भूगोल व गणित असले कोरडे विषय शिकवीत असत. पण शाळेची नोकरी इमानाने केल्यावर स्वतःच्या खाजगी आयुष्याचा बराचसा मोठा भाग नाटक, सिनेमा, वाचन, स्वछंद पायी फिरणे यासाठी राखून

अनुक्रमणिका

ठेवत असत. जाडे भरडे कपडे घालून, हातात काठी घेऊन, टोपीशिवाय, मानखाली घालून कधी जेल रोडवर, तर कधी लिबर्टी सिनेमाच्या रस्त्याने, कधी राजाराम वाचनालयाच्या दिशेने तर कधी श्री. चिमोटे यांच्या बरोबर महाराज बागेच्या रस्त्याने, कधी एकटेच तर कधी श्री. गलगलीकर यांच्या बरोबर ते पायी जाताना दिसायचे.

* * *

रंजन कला मंदिराचा सदस्य म्हणून त्यांच्या मदतीची, सहकार्याची जरूर लागली तर ती मिळेल अशी नक्की खात्री बाळगून मी त्यांच्याकडे जात असे. आणि विन्मुख कधीच परतावे लागले नाही. कधी परीक्षक होता का म्हणून तर कधी नाट्यप्रयोग पहाण्यास या म्हणून अथवा कधी नाट्यवाचनास या असे निरोप सांगण्यासाठी मी त्यांच्याकडे जात असे. गोविंदराव येत, पाहत, ऐकत पण अगांतुक टीका ते कधी करत नसत. कार्यक्रम संपल्यावर त्यांच्याकडे जावे त्यांचे मत मागावे हा नेहमीचा परिपाठ होता.

* * *

कलाक्षेत्रात असलेल्या व्यक्तींना एक शाप आहे–दुसऱ्याची गोष्ट सहजासहजी न पटण्याचा, त्याबद्दल चर्चा करण्याचा. गोविंदराव स्वतः लेखक होते, नाट्य, संगीत, मैफलीचे भोक्ते होते. पण विचारल्याशिवाय टीका नाही. फारच पिच्छापुरवला तर निवडक शब्दात थोडीशी; तीमुद्धा मवाळ शब्दात. त्यामुळे त्यांना शत्रू नव्हते. कलेचा आनंद स्वतः घ्यावा, जवळच्या लोकांना द्यावा हा त्यांचा खाक्या होता. त्यामुळे कोणत्याहि संस्थेचे कार्य करतांना त्यांना गटाची जरूर लागत नसे, मग ती संस्था लोकांची शाळा असो, वि. सा. संघ असो, अथवा राजाराम वाचनालय असो-की नागपूर नाट्यमंडळ असो !

* * *

मला माहीत असलेले गोविंदराव मितभाषी होते. प्रसिद्धी-पराङमुख होते. लघुनिबंधकार होते पण त्याची चर्चा करणारे नव्हते. ते दुसऱ्याच्या चांगल्या गोष्टी आवर्जून सांगत पण स्वतः बद्दल बोलत नसत. त्यांना पाहिले की एका आंग्ल कवीच्या ओळीची नेहमी आठवण होत असे. त्या काव्यपंक्ती अशा–

"Thus let me live, unseen, unknown;
Thus unlamented let me die;
Steal from the world and not a stone
Tell where I lie."

नेहमी त्यांचे मत ऐकावे, त्याप्रमाणे बदल करावेत ही आमची सवय. पण एकदा आम्ही त्यांचे ऐकले नाही—ते सांगण्यास हजर नव्हते म्हणून. ते unlamented गेले नाहीत. कदाचित त्यांना हे आवडले नसेल. पण त्याला इलाज नव्हता

* * *

असा माणूस भरल्या मैफलीतून निघून गेला. एक अजातशत्रू लघुनिबंधकार अनेक मित्रांना, संस्थांना, पोरके करून गेला. कां ? जास्त जगलात तर शत्रू निर्माण करीन अशी धमकी काळाने त्यांना दिली म्हणून ? की मृत्यूशीहि शत्रुत्व नको म्हणून, वैर नको म्हणून ?

पायवाट, वेदना अन् एक आभाळ (पृष्ठ ८१ वरून)

"मग तुम्ही गप्प राहिलात...?"

"तुझं मोठेपण...समोर उभं दिसतंय अचानकपणे...म्हणून भांबावलेय..."

आता समोरच्या दोन वाटा तेवढ्या नजरेसमोर दिसताहेत...

"एकाएकी त्याने हस्तांदोलनासाठी हात पुढे केलाय. अन् माझा निर्जीव हात आपल्या हातात घेत तो म्हणतोय...

"गुडबाय...! ...गुडबाय डियर फ्रेंड...!" अन् एकाएकी तो पाठ वळवतो ...माझा हात असहायपणे रिकामा राहतो.

"गुडबाऽय !"

केव्हांतरी माझे अस्पष्ट शब्द घुटमळतात...तोवर तो दूर चालू लागलाय ...अन् डोळ्यांना दिसेनासा होतोय...

अन् मला वाटतं...सगळा अर्थ निसटून निपचित खाली पडलाय...अन् मला वाटतं, रस्त्यावरचे सगळे दिवेहि आंधळे झाले आहेत.

तरंग शोभा

ले.—श्री. कृ. मा. घटाटे

[वैदर्भीय संत श्री गुलाबराव महाराज यांच्या 'भक्तिपदतीर्थामृत' या ग्रंथाला नागपुरातील एक तरूण भक्तिमार्गी अभ्यासक श्री. कृ. मा. घटाटे यांनी लिहिलेली ही प्रस्तावना येथे दिली आहे. हा ग्रंथ ' मधुर प्रकाशना'तर्फे लवकरच प्रकाशित व्हावयाचा आहे. —संपादक]

या ग्रंथाला परमगुरु श्रीगुलाबराव महाराज यांनी 'भक्तिपदतीर्थामृत' हे नाव दिलेले आहे. जशा अमृतावर सुंदर लहरी उठतात तशाच या भक्तिपद-तीर्थामृतावरील सुंदर लहरी म्हणजेच पंचाध्यायात्मक पाच तरंग होत; असे मनोहर रूपक करून अध्यायांना 'तरंग' म्हटलेले आहे. त्या तरंगाचे सौंदर्य अनु-भवण्याचा प्रयत्न करू या !

'तत्—त्वं—असि' ही महावाक्यातील तीन पदे भक्तिप्रतिपादक आहेत. हीच भक्तिमातेची तीन पाऊले होत. ह्या भक्तिमाऊलीचे पूजन करताना प्रथम तिच्या चरणांवर प्रेमरसाचा अभिषेक करावा लागतो. म्हणजे ते चरणाभिषेकाचे तीर्थ जीवाला मूळच्या प्रेमस्वरूपाला प्राप्त करून देणारे अमृत होते. या तीर्थरूपी सागरातील अमृतलहरी म्हणजे अध्यायरूपी पांच तरंग होत !

"अमृताचिया सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी ।
तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलिया ।।ज्ञाने०।।"

या अमृतसागरातील तरंगपंचकात अवगाहन केले असता "तिट्कारोनि पळे ज्ञानाभिमान" ! मी ब्रह्म आहें, या ज्ञानाभिमानासहित सर्व दुःखे पळ काढतात आणि हृदयात अखंड ब्रह्मानंदाच्या लहरींवर लहरी उठून प्रेमरसाने ओथंबलेली हरिसेवा प्रकट होते.

"प्रकाशे परम । नित्यसुखदात्री हरिसेवा"

'तत्त्वमसि' या सामवेदोक्त महावाक्यातून बहुधा जीव—ब्रह्माचा ऐक्यरूप ज्ञानबोधच दिला जातो व घेतला जातो. पण तो ज्ञानबोध 'अहंब्रह्मास्मि' रूपाने ऋणशेष राहतो.

अनुक्रमणिका

"ते ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनिया ।
ते पाया पडोनि मिया । सोडविले ॥"

—अमृतानुभव

या ओवीत ते वाणीवर असलेले ऋणशेष पाया पडून सोडवावे, हे ज्ञानेश्वर-माऊलीने सांगितले आहे. आणि त्यांच्याच कन्येने तीच नमनाची प्रक्रिया कशी असते, याचे अनेक दृष्टान्त देऊन आणि अनेक सूक्ष्म सूक्ष्म सिद्धान्त स्पष्ट करून, या ग्रंथात सविस्तर निरूपण केले आहे.

आणि विशेष असे की ज्या महावाक्यातून साधक अद्वैतज्ञान प्राप्त करून घेतो–चिदंशाचे ग्रहण करतो, त्याच महावाक्यातून त्याला आनंदांशाची प्राप्ति करून घेता येते. (येथे प्राधान्येन व्यपदेशः । हे सूत्र विसरता येत नाही.) हा आनंदांश म्हणजे "आनंदपद जया, म्हणती हरी" असे श्रीएकनाथ महाराज म्हणतात. या षड्गुणैश्वर्याने युक्त असलेल्या सगुण साकार श्रीहरीचे आत्मवत् परम-प्रेम, त्वंपदलक्ष्यांश अशा ज्ञान्याचे ठिकाणी आविष्कृत झाले की त्याला "समाधी व्युत्थानीं हरि विलसे" हा अनुभव येतो. आणि त्याची समाधी, व्युत्थानाने देखील, कधी खंडित होत नाही. हीच निर्विकल्प सहजावस्था म्हणजेच सहजा-भक्ति होय ! तिचे स्वरूप, ती प्राप्त होण्याची प्रक्रिया, आणि विषय समजावून सांगण्याकरता नवनवीन दृष्टान्त व युक्तिवाद श्रीमहाराज या ग्रंथात सहज लीलेने विखरून देतात. ते इतके सोपे, मार्मिक आणि प्रासादिक आहेत की वाचकाच्या अन्तःकरणाला ओढ लावतात आणि बुद्धीची खुमखुमी जिरवून "एकचि जे सद्-बुद्धी । जिये परमात्माचि अवधी । " असे तिला स्वरूप देतात.

श्रीगुलाबराव महाराजांनी अद्वैताचे ज्ञान झाल्यानंतर भक्तीचा उपक्रम करण्याची काय आवश्यकता आहे हा प्रश्न विचारात घेऊन त्यानुसार निरूपण केले आहे.

'ज्ञानामृत मिळाले. मृत्यूची भीति पार गेली. पण भूक मात्र तशीच राहिली. असे ज्ञानेश्वरमाऊलीने पाहिले. तिला लेकराचा कळवळा आला आणि पान्हा अनावार झाला. तोच हा भक्तीने ओसंडत असलेला–भक्तीच्या पदतीर्थामृताचा घट. तोच हा ग्रंथ ! पांच तरंगांच्या रूपाने ती आई माझ्याकडून करवून घेत आहे.'

हे सांगितल्यानंतर 'ज्ञानाने केवळ उपाधि कोणती आहे, कशी आहे, ते कळते. पण संसाराची ही उपाधि, वासना पूर्णपणे नाहीशी झाल्याशिवाय, निःशेष जात नाही. तेव्हा त्याला उपाय काय ? – तर भगवंताचे ठिकाणी संयोगी वियोग प्रीतीचा अखंड ओघ वाहत राहणे, हाच एक उपाय ! हे परमप्रेम कसे असते ?......

अनुक्रमणिका

"जारिणीचे परपुरुषी मन । की विरहिणीचा विरह गहन ।
तो विषयभाव वेगळा करून । हरिरूपी प्रेमयोजन, ते भक्ति ॥४३॥"

सांसारिक प्रेमातील विषय काढून टाकले असता जी एक प्रेमाची ओढ शिल्लक असते, ती भगवंताकडे लागली की, खरी अमृतस्वरूपिणी भक्ति भक्ताला प्राप्त होते. ही कशी मिळवावयाची ?...'तत्त्वमसि' या महावाक्यातून !

तत्पदनिरूपण

त्यातील 'तत्' पदाचा सगुण श्रीहरिपर अर्थ कसा आकलन करावयाचा ते पहा—

तत् पदार्थाचे दोन अर्थ होतात. एक वाच्यांशरूपी 'तटस्थ लक्षण' व दुसरे 'स्वरूप लक्षण' !

तटस्थ लक्षणात्मक ईश्वराची गौण भजनाने प्राप्ति होते. हेच ईश्वराचे तटस्थ निर्गुण स्वरूप होय !

यातील तटस्थ लक्षणात्मक वाच्यार्थाचा त्याग करून षड्गुणैश्वर्यसंपन्न सच्चिदानंदघन अखंड लीलाविग्रही सगुण श्रीहरि म्हणजेच तत्पदाचे 'स्वरूप लक्षण' होय !

हे सांगताना प्रतिबिंबवादाचे निराकरण केले. नंतर अज्ञानी, ज्ञानी आणि भक्त यांना हरिण, मनुष्य आणि चक्रवाक यांची उपमा देऊन भक्ताचे श्रेष्ठत्व कसे असते, हे स्पष्ट केले आहे.

पुढे भक्तीचे दोन प्रकार सांगितले.

(१) तटस्थ अशा वाच्यांशाला धरून भीति वगैरे द्वैतभावनांनी किंवा मोक्षइच्छेने जे भजन होते ते मर्यादा भजन असते.

(२) आपल्या स्वरूपाला जागून, द्वैत अद्वैत या भावनांचा निःशेष त्याग करून जे केवळ प्रेमरूप भजन होते ते लक्ष्यांशस्वरूप भजन होय !

हे लक्ष्यांश भजन कसे असते ? आणि तत्पदाचा अर्थ लीलाविग्रही सगुण श्रीहरीच कां घ्यावयाचा ? याचे विवरण सुवर्ण आणि त्याचे अलंकार वगैरेची उदाहरणे देऊन अत्यंत नाविन्यपूर्ण रीतीने व मूलग्राही असे केलेले आहे.

त्वंपद निरूपण

महावाक्यातील 'त्वं'पदाला यथार्थ जाणणाराच पराभक्तीचा अधिकारी होय. त्वंपदाचे तीन अर्थ आहेत. (१) अविद्येचा आश्रय केलेला, कर्मफलाची इच्छा असणारा देहाभिमानी जीव आणि (२) मोक्षप्राप्तीची इच्छा करणारा सात्विक जीव हे दोन्ही त्वंपदाचे वाच्यार्थ आहेत.

(३) व्यतिरेकाने चारी देहांचा संबंध सोडणारा, अन्वयाने सर्व ब्रह्मरूप पाहणारा, वुद्धयादिकांचा साक्षी झालेला, संचित क्रियमाणांचा संबंध सुटलेला पण प्रारब्ध भोगणारा तो त्वंपदाचा लक्ष्यार्थ आहे. हाच भक्तीचा अधिकारी.

इतके सर्व असताना भक्तीची काय आवश्यकता आहे ? याचे स्पष्टीकरण करताना पतिव्रता आणि वेश्या, लोहबेडी व सुवर्णश्रृंखला यांचे दृष्टान्त देऊन हा विषय आकलन करण्यास सोपा केलेला आहे. महाराज म्हणतात—

"अहं ब्रह्मास्मि ज्ञाने फुगला । तो अभिमानबंधी मात्र राहिला ।
आणि उत्थानभये तयाला । व्याकूळता न सोडी ॥६॥
जेणे कामे तारिल्या गोपिका । तें सामर्थ्य तुज नये लेका ॥
ब्रह्म होऊनी जगी विचरणे । लाजीरवाणे, हेहि एक ॥
हरि असोनि ब्रह्मपूर्ण । तूं ब्रह्मचि तनु ये घेऊन ।
अन्वयव्यतिरेके ब्रह्म होऊन । भौतिक तनु कैशी राहे ? ॥४३॥

तरी बापा ! असे करू नकोस. भक्ति ही तुझ्या ब्रह्मज्ञानाची शोभा आहे. त्वंपदलक्ष्यांश जाणून तत्पदलक्ष्य हरीचे भजन कर. तू भक्तिजननीच्या कुशीत शिरलास की मुक्ति वेश्येसारखी लाजेल आणि तटस्थ उभी राहील !

'असि'पद विवरण

आता त्याचे 'असि'पदाने म्हणजेच सद्‌गुरुकृपेने ऐक्य कसे होते, ते पाहूं. असिपद विवरण म्हणजेच ऐक्यभजन होय !

एकंदरीत भजनाचे तीन प्रकार. (१) अलंकार भजन (२) स्वरूप भजन (३) ऐक्य भजन.

या तीन भजनांना (१) कुंकू लावणारी कुमारी (२) विवाहोत्तर श्वशुराज्ञेने पतिसेवा करणारी स्त्री आणि (३) पतीशी ऐक्य पावणारी पत्नि अशाप्रकारे स्त्रीच्या वेगवेगळ्या आविष्कारांचा दृष्टांत देऊन मोठ्या मार्मिकतेने या तिन्ही भजनांचे स्वरूप समजावून दिले आहे.

याप्रमाणे तत्पदलक्ष्यांश श्रीहरी आणि त्वंपदलक्ष्यांश शुद्धप्रीति यांचे ऐक्य झाले की,

" सर्वाभूती सुंदर सगुण । सांवळे दिसे "

आणि भक्तिलक्षण प्रकट होते. पण हेहि भजन 'औपचारिक' आहे असे महाराज सांगतात.

पतिव्रता स्त्री, काम पूर्ण होवो किंवा न होवो पतीवर आत्यंतिक प्रेम करते त्याप्रमाणे 'आनंदप्राप्ति होवो की न होवो पण हरिविषयी अगदी स्वाभाविक आणि आत्यंतिक प्रेम असणे' हे खरे पारमार्थिक भजन होय !

अनुक्रमणिका

या आनंदरूप भजनात सत् व चित् या पदांचा अन्तर्भाव कसा आहे, हे--

"जीभ आणि साखर । त्यात रस एकचि मधुर ।।"
"वृत्ति उठे ते सत्पद । वृत्ति मुरें ते चित्पद ।"
अखंड हरिप्रीती तो आनंद । सच्चिदानंद स्वयंरूप ।। ३२ ।।

अशा प्रकारच्या अनेक ओव्यांनी अद्वैत सिद्धान्ताच्या नवनवीन छटा हळू-वारतेने आणि सूक्ष्मतेने उलगडून दाखविल्या आहेत.

"भजता कृष्णरूपडें । सच्चिदानंद हाता चढें ।
आणि सच्चिदानंद बोलता कोरडें । दोन्ही न मिळे ।।"

अशाप्रकारे प्रेमभक्तीचे महत्व सांगून आत्मज्ञानी अशा त्वंपदाच्या लक्ष्यांशाने षडगुणैश्वर्यसंपन्न तत्पदलक्ष्यांशाशी परमहरिविरहासक्तिरूप माधुर्यभक्तीने ऐक्य करण्यास सांगितले.

ब्रह्मज्ञान झाले असता सत्, चित् आणि आनंद या तीन अंशापैकी चिदंशच 'प्रामुख्याने' असतो, त्यामुळे उत्कट आनंदावस्था प्राप्त होत नाही. हा आनंदांश प्राप्त करून घेण्यासाठी भगवंताच्या अखंड संयोगातहि विरहिणीच्या प्रेमाची उत्कट ओढ सारखी लागलेली असणे, किती महत्वाचे आहे हे स्पष्ट केलेले आहे.

"धारावाही रसो भक्तिः ईशे तत्पदगोचरे ।
'त्वं'पदज्ञो परो भक्त, इति स्वमतनिर्णयः ।।"

ही धारावाही रसभक्ति प्राप्त झाली की भक्ताला--

"कोटि सूर्यासम सोज्वळ । कोटि चंद्रासम शीतळ ।
श्यामस्वरूप घननीळ । अन्तर्बाह्य ।। ९ ।।"

आत बाहेर एक श्रीकृष्णप्रेमच व्यापून टाकते. मग ज्ञान्याला किंवा योग्याला व्युत्थानावस्थेत जगाच्या ठिकाणी उदासीन राहून जे प्रारब्धदुःख भोगावे लागते ते भक्ताला मुळीच भोगावे लागत नाही, समाधीत ब्रह्मनंद तर असतोच पण व्युत्थानात देखील अनव्यस्तविवर्त पूर्णब्रह्म अशा भगवंताचे प्रेमच असते अशा-प्रकारे त्याची समाधि-अवस्था कधीच खंडित होत नाही.

"फिटलियाहि वाचाऋण । न यावा भक्तिधन अभिमान ।
या लागी ऐक्यत्वे श्रीकृष्णचरण । प्रीतीने सेवूं ।। ५५ ।।"
"ज्ञानेश्वरगुरुमुखपिकप्रसाद । तेथे आटले दुःखानंद ।
शेखीं अर्पणरूपे शुद्ध । प्रेमचि उरला ।। ७२ ।।"

'मी सच्चिदानंद आहे' हा अभिमान विरहभक्तीने गळाल्यानंतर 'अर्पणरूप' शुद्ध प्रेम आतबाहेर ओतप्रत भरून जाते. हीच खरी निर्विकल्प ब्रह्मावस्था म्हणजे सहजा प्रेमभक्तीची अवस्था होय !

अनुक्रमणिका

या ग्रंथाला श्रीज्ञानेश्वर महाराजांनी आशीर्वाद दिला आहे. या ग्रंथाचे एकविस दिवस रोज एक पारायण करावे. पारायण करताना 'ज्ञानेश्वरमाउली' हा मंत्र प्रत्येक ओवीच्या आधी आणि नंतर लावावा म्हणजे प्रत्येक ओवी संपुटित म्हणावी. अशी एकवीस पारायणे व्रतस्थ राहून अत्यंत प्रेमाने केली असता प्रेमस्वरूपिणी भक्ति प्राप्त होईल !

"हे करिताचि अर्पण । सद्गुरूने दिधले वरदान ।
हा ग्रंथ एकवीस वेळ पठण । संपुटी लावून करावा ॥
ज्ञानेश्वरमाऊली अनुलोम । प्रेमे तोचि प्रतिलोम ।
पठण करिता प्रकाशे परम । नित्यसुखदात्री हरिसेवा ॥"

अशाप्रकारे 'तत्वमसि' या महावाक्यद्वारा अद्वैत ज्ञानबोध प्राप्त झाल्या-नंतर, त्याच महावाक्यातून स्वतः अनध्यस्त विवर्त होऊन, अनध्यस्त अशा श्रीकृष्णस्वरूपाची. अद्वैतप्रेमभक्ति कशी करावी; याचे दशविध रसांनी भरलेले सुंदर आणि मार्मिक विवेचन यात आढळते. शेवटी श्रीमहाराज सर्वांना आवाहन करतात—

प्रेमाचा करूं कळस ।
हरीस अर्पूं ब्रह्मरस ।
श्रीकृष्णपदी सावकाश ।
सख्यांनो भृंगी होऊं चला ॥"......

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिती

सत्र ऑगस्ट : १९६३

वि. सा. संघाच्या परीक्षा समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या ऑगस्ट १९६३ सत्रातील परीक्षा नुकत्याच संपल्या असून ह्या परीक्षांना पुढील प्रमाणे परीक्षार्थी संमिलित झाले--

एम. ए. समकक्ष साहित्य पारंगत ६, बी. ए. समकक्ष साहित्य स्नातक १३८, प्री-युनिव्हर्सिटी समकक्ष साहित्य परिचित १४०, मॅट्रिक समकक्ष साहित्य विनीत २८९, मराठी प्रारंभ १८९, आणि मराठी प्रवेश १७८ एकूण ९२९. यावेळी ३३ परीक्षा केंद्रे होती.

साहित्य पारंगत एम. ए. समकक्ष परीक्षा

कु, नीलम माधव आठले सर्वप्रथम-- भारतीय भाषाध्ययन मंदिर केंद्र नागपूर
डॉ. वा. ग. सिंगणापूरकर सुवर्ण पदक.

कु. अलकनंदा नारायण मुनशी-- भारतीय भाषाध्ययन मंदिर केंद्र नागपूर

साहित्य पारंगत प्रथम खंड

सौ. राजलक्ष्मी केशव मुनशी-- भारतीय भाषाध्ययन मंदिर केंद्र नागपूर
शरश्चंद्र व्यंकटेश वराडपांडे, नागपूर

साहित्य स्नातक बी. ए. समकक्ष
पदवी परीक्षा

श्री. गो. पि. कमाने २, सौ. इंदु धनंजय नाकाडे २, कु. शकुंतला गो. भांडारी ३, श्री. आ. म. पाटील २, श्री. शि. वा. भुरे २, श्री. श्री. पां. साठवणे २, श्री. द. वा. रार्घोते २, श्री. द. दो. राऊत २, श्री. गु. आ. कळस्कर ३, श्री. च. रा. लोणारे ३, कु. प्रेमा बल्लाळ २.

साहित्य स्नातक खंड २ उत्तीर्ण विद्यार्थी

श्री. पु. वा. रामेकार

अनुक्रमणिका

साहित्य स्नातक खंड १ उत्तीर्ण विद्यार्थी

श्री. स. झि. हुकरे, कु. इंदुमति नी. सगदेव, श्री. वा. त्रि. गोरडे, श्री. गो. रा. उमेकर, श्री. म. र. आसरे, श्री. वा. गुं. घोटे, श्री. वा. ज. ताठे, श्री. मा. मा. वार्भिटकर, श्री. अ. तु. मोघे, श्री. घ. रा. राठी, कु. वासंती ग्रा. खानोलकर, कु. चित्रा पु. पेठणकर, कु. पुष्पा रा. काळीकर, कु. कुमुद ना. पांडे, कु. शांता घ. वढिये, कु. विजया ना. कवीश्वर, कु. उषा रा. घाटे, श्री. र. न. मराठे.

साहित्य परिचित परीक्षा

मा. वि. मेश्राम ३, कु. शशिकला श. वंजारी २, सौ. शं. पा. मुंजेवार ३, प्र. मा. गोमाशे २, सु. गु. गुप्ता २, मं. सी. कावडे २, म. रा. चुनुरवार २, वा. दे. कामडी २, मु. सी. दोनाडकर २, ना. वि. महावादीवार २, कि. प. गोरडे ३, रा. मा. झरकर २, सु. गु. डांगे २, घ. ना. भुरे, भै. सी. कावळे ३, रा. भो. मलेवार ३, चि. ए. सोनकुसरे २, अ. प. हेडाऊ २, वा. सि. भांडारकर १, कु. शिलावती के. जोशी २, खु. न. पिंपडामुळे २, ना. वा. रेवतकर १, दे. मा. चरडे, २, स. वि. राऊत ३, कु. सुलोचना दा. कानिटकर १, मा. ग. राऊत २, बा. या. नेरड्डीवार १, रा. ब. भगत ३, पु. हि. गोंगले, २, सु. ना. संतोषवार २, प्र. जा. विदमलवार २, कु. वत्सला रा. दानव २, वि. शं. साळवे ३, र. कृ. वानखेडे ३, शि. शे. सास्ते २, त्रि. का. भुसारी ३, र. ग्या. गवई २, सी. तु. आंबेकर ३, वि. कि. भारूडकर ३, ता. गं. ठोंबरे ३, स. म. सानप २, वि. त्र्यं. पानगोळे २, श्री. स. नासरे २, वि. कि. वाकोडे ३, रं. भा. देशमुख, २, पां. को. पिसे २, म. त्र्यं. डुकरे २, आ. ना. गोसावी २, सी. मो. राऊत ३, शा. रा. खेडेकर २, कृ. आ. राऊत २, दा. म. कळसकर २, म. शि. राऊत ३, कृ. अ. वोरे २, कु. चंद्रकला ग. देशकर २, कु. शंकुतला ग. देशकर २, कु. पुष्पा रा पिवटकर ३, शि. श्री. खंडारे २, सु. मा. वेलसरे २, दे. तु. निमकर २, भा. उ. उडगोकर ३, कु. मीना वा. आंबुलकर ३, अ. दि. पोफळे २, ल. दि. आसटकर. २, भा. रा. वोरकर ३, रा. स. रोकडे २, श. कुं. पशीने २, दा. न. डामरे २, र. पां. वासनिक २.

साहित्य विनीत मॅट्रिक समकक्ष परीक्षा

श्री. ब. स. समर्थ--सर्वप्रथम

कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषक---केंद्र लोकमान्य विद्यालय भद्रावती.

कु. आशालता मा. नारिंगे २, कु. अरुणा गुंदेचा ३, सौ. इंदु अ. ढोले ३, कु. जना रं. मराठे ३, कु. कांता जी वाजा ३, कु. पुष्पा म. चौहाण ३, कु. शकुंतला द. चौधरी ३, कु. शकुंतला ह. लालगे २, कु. सुशीला श्री. निल्लावार ३, कु. विजया व. देशपांडे ३, कु. विमल ओं. मानेकर ३, अ द. खोडवे ३, अ. के. दुधुलवार ३, अ. मा. जोशी ३, बा. ज. अंडलकर २, मा. मा. अस्वार २, हबीब राजेखान ३, ज. वि. आरोडा ३, कि. का. चिरडे २, मा. भि. नाईकवाडे ३, मा. य. नपते ३, म. शा. डेहणकर ३, मा. रा. आसवे ३, म. तु. जाधव ३, ना. मा. दारव्हेकर ३, पां. भ. लभाने २, प्रे. रा. बाफणा ३, प. रा. मराठे ३, रा. म. तिवारी ३, शा. दे. ठाकरे ३, सु. ना. राठोड ३, सु. मा. बनगिनवार ३, वि. वा. पद्मवार ३, त्रि. सां. पद्मवार ३, या. ज्ञों. कापगते ३, शा. मा. मेंढे ३, मा. मा. कापगते ३, गो. तु. कळस्तर ३, ज. ठि. साखरे ३, मा. आ. चुटे ३, ह. ग. गेडाम २, अ. वा. कापगते ३, कु. सुवर्णलेखा ल. वक्षी १, कु. सुशीला म. हळवे ३, ल. उ. काळवांडे ३, वि. ज. घोडखांदे ३, वा. मु. राऊत ३, म रा. शिंदे ३, कु. रेखा रा. राईचवार २, कु. पूर्णावती आ. मेश्राम २, रा. ग. मेश्राम २, सु. या. नागुलवार २, अ. गो. श्रीरामवार २, बा. ना. संतोषवार २, म. गं. भ्याडावार ३, प्र. या. कावडेंय २, र. वा. ताटकोंडावार २, रं. गु. मिरे ३, ना. न. ढोमणे २, सु. डो. नागपुरे २, नी. ल. चौधरी ३, घों. ह. लिखार २, स. जं. वनपूरकर ३, आ. शं. मदने ३, प. न. मांडवे ३, शा. रा. बावने ३, का. ज. धुर्वे ३, वा. गु. मडावी ३, ल. त्रि. सोमकुंवर ३, शं. म. आंबेडारे ३, मा. चं. राऊत २, कृ. द. काहळे २, वा. न. तिडके ३, वा. मो. मेंढे २, वा. दे. गजधाटे ३, भा. वा. कवळे ३, रं. जा. घाटोळे २, पु. के. गोडबोले २, वि. वा. वासनकर ३, ग. प्रि. रडके ३, वि. पे. चिमोटे ३, ह. स. काशीकर ३, सु. दे देशमुख २, भि. वि. तडस ३, प्र. सा. गोंगे २ शं. वा. खवाले २, रा. ह. अडंक ३, अ. गो. तडस २, म. स. गाडगे ३, ना. म. डेहनकर २, ज्ञा. शं. काळे ३, आ. ना. भोकसे ३, भि. म. गांवडे ३, वा. तु. कल्हाने ३, तु. ज. कुरवाडे ३, वि. भ. जावरकर ३, प्र. अ. देशमुख ३, चि. मा. माहुले २, वा. कि. मनोहर २, र. गु. विघात ३, किस्मतुला अमानुल्ला ३, रा. मि. गायकी २, पुं. न. पागृत २, रं. रा. ढोमणें ३, कु. रेखा. के. मेहरे २, कु. उषा हरिभाऊ शेरेकर २, कु. चंद्रकला गं. पापळकर २, कु. मंगला मा. घोटे २, कु. कुसुम भि. भुसारी २, विमल ज. सौदाघरे २, कु. चंद्रकलां रां जांभोळे, २, कु. कमल मा. गोटेफाडे २. कु. विमल ल. देशमुख ३, कु. राजकांता ना. भुयारकर ३, कु. विजया कु. कुरळकर २, कु. रमा मा. खाडे २, कु. लिला सु. अडकणे ३, शांताबाई काळे ३,

कु. अनुसूया हि. नासरे २, कु. शकुंतला दे. चिंचमलातपुरे २, लीला न नासरे ३, कु. योजना गो. उचके २, ग. रा. दिवाणे ३, सु. ना. देशमुख २, ग. मो. कामडी २, म. कृ. डोंगरे ३, रा. वा. कामडी ३, ना. घु. भांगे ३, ना. श. अंतुरकर २, ब. न. ढांले ३, का. स. अहिरे ३, गो. ह. देशमुख ३, चु. वु. पाटील ३, तु. मो. भोळे ३, रा. तू. कोळी ३, नं. ना कोंडवतूनवार ३, मु. ना. जवकुलवार ३, य. मा. कोंडकावार ३, वि. रा. आडेंपवार २, रा. आ. शेंडे २, दौ. हु. गलगट २, शं. जा. संगीडवार २, म. आ. शेंडे ३, म. मं शेंडे २, पा. सां. डांगे ३, म. ग. भुते ३, ना. ना. सोनुले २, र. ल. येनगंदेवार २, वि. ना. वासालवार २, कु. नर्मदा सां. चिलवे २, व. स. समर्थ १, श्रा. भि. चोखे ३, म. ज. आसुटकर ३, कै. गो. शेळके ३, वि. द. गुंडावार २, ना. व. वडस्कर २, कृ. वा. गायकवाड ३, ल. गु. अंभोरे ३, ज. वा. मकेसर ३, श्री. व. धर्माळेकर ३, गफूर सु. ओंधकर २, वि. कृ. देशमुख ३, अ. नी. वानखेडे ३, उ. गु. सरोदे २, रा. नी. गावंडे ३, दे. वी. गावंडे ३, पुं. शे. तायडे ३, हिं. ना. काळे ३, शं. ज. कोटार ३, म. श्या. टुले ३, रू. शे. पिंगळे ३, म. कृ. राजगुरे २, कु. सरोजिनी ह. देशमुख ३, सौ. सुमन पं. नेभाडे २. म. म. चव्हाण २, कु. तु. विजया कसने २. कु. आशा र. रघुवंशी २, कु. सुलभा स. कोल्हे ३, शं. सरदेशमुख ३, कु. कुसुम स. कोल्हे २, कु. आशा श्री. डोईफोडे २, कु. कनल व. चिंचोळकर ३, कु. गीता कि. अग्रवाल ३, कु. विमल सू. नांदुरकर ३, कु. नलिनी दे. घिवे ३, कु. रत्नप्रभा मा. गोवरे ३, कु. रत्ना रा. कयाल ३, कु. लीला ना. नेमाडे ३, कु. उषा अ. चव्हाण ३, कु. शकुन्तला सा. चिकाटे ३, कु. कुसुम म. लोणकर २, कु. चंद्रकला तु. गणोरकर ३, कु. कमल स. लोखंडे ३, कु. ताई वि. शेंगोकार २, कु. वेणी रा. साळुंके ३, कु. त्रिवेणी मा गोवरे ३, कु. अन्नपूर्णा श. हरणे २, शारदा वि. राजा २, कु. प्रमिला मा. भोपळे २, कु. रत्ना. रा. पाटील ३, कु. इंदिरा अ. गहुले ३, कु. हंसा मा. गढिया ३, कु रेखा श. आसरकर २, कु. सुमन र. श्रावगी २, कृ. ल. पडोळे २, मो. सी. आदमणे ३, जा. द. कीराटे ३, भी. जं वेताळ ३, अ. शा. चांदेकर २, वा. त्रि. ढोणे २, तु. चं. निवल ३, कु. पुष्पा वि. नवाडे ३, कु. विमल म. अर्भळ ३, कु. कमल मा. केवटे ३, प्र. के. भागवत ३, प्र. रा. इंगळे २, शेख रसुल अब्दुल कादर ३ मा. तु भागत ३, व. गो. लोखंडे २, वा. त्र्यं. पाटील ३, प्र. मा. वऱ्हेकर २ कु. कमल श्री. बनसोड २, सौ. नलिनी कृ. पाटील २, अ. रा. पांडे ३, ज्ञा. स चोपडे ३, जीवत ले. चेलानी ३, रा. का. बाहुरवधि ३, कु. कुन्दा ल. उपाध्ये ३, वा. मा. कळंबे ३, भा. कृ. चेपे ३, प. टि. सुखदेव ३, सु. ह. नागदेव ३ शं. श्री. कळंबे ३, स. ग. क्षीरसागर ३,

मराठी प्रारंभ परीक्षा

कु. पुष्पा आ. गज्जलवार ३, कु. शोभा बा. ताटकोंडावार २, शा. मा. वाकडे २, क. तु. संगीडवार ३, ढे. रा. गेडाम ३, ग. बु. निकुरे ३, य. डो. शिंदे ३, वा. झु. शिंदे ३, रा. श्री. भुजाळे ३, सु. दे. शेंडे ३, दे. शा. गजभे ३, व. तु. कोंघे ३, या. वि. भागवतकर ६, प. य. ठाकरे २, रा. रा. कडू २, घ. पुं. क्षीरसागर २, का. जा. शास्त्री ३, दा. द. सोमकुंवर २, मा. चं. सावळे ३, रा. वि. सुके ३, ल. ग. चौधरी ३, सु. पं. कवडू ३, वा. वा. करमकर ३, ह. प्र. मैसकर ३, क. सौ. वनसोड ३, गु. ना. गोस्वामी ३, चं. के. मस्की ३, प्र. वि. कोढाळकर २, दा. गं. तिडके २, पु. गों. ठवकर ३, वि. पां. कुळकर्णी ३, बा. ना. देवगळे १, कु. मंजुळा तु. गायकवाड ३, कु. मंजुळा वा. मेश्राम ३, शा. स. भोयर २, दे. ऋ. डोंगर ३, अ. व. वैद्य २, शा. आ. दुरवुडे ३, पां. मा. घाटोळे २, ग. का. पिंगळे ३, अ. झिं. जोशी ३, का. श्रा. वारवुद्धे २, मो. र. धर्माळे २, रा. रा. म्हसके २, म. रा. मांडळे ३, ज्ञा. रू. वोरकर ३, म. वा. निभोरकर ३, म. न. गोमकाळे ३, रा. स. मानेकर, शां. कि. लोखंडे ३, म. कि. चर्जन ३, द. तु. मून २, भा. छो. कालीवाले २, दू. छो. अग्रवाल ३, प्र. ल. तडस २, स. ह. अडंक ३, म. स. गजभे २, प्र. ना. भट्ट ३, सु. छ. मेले २, वा. रा. दिवाणे ३, गु. तु. टोपले ३, मो. का. चौधरी ३, गो. ज. तिवारी २, र. वा. झाडे २, सु. शा. पाटणे २, ल. इं. रघुवंशी ३, शे. मा. नारिंगे ३, प्र. व्यं. वोनगिरवार २, दि. व. काटपल्लीवार २, मा. जो. घोडाम ३, श्री. वि. कुंटावार ३, मं. सि. भंडारे २, प. धों. सोनुले ३, नी. डो. कस्तुरे ३, या. डो. गेडाम ३, शं. ढे दुधे ३, प. दि. तुम्भे ३, सु. आ. शेंडे ३, प्र. वा. राईचवार २, कु. शोभा वि. चल्लावार ३, कु. प्रमिला आ. शेंडे २, कु. विजयमाला व. चितलवार २, कु. पुष्पा न. मार्मीडपल्लीवार २, कु. गीता र. वारंगे ३, कु. कमल न. गोंडाणे ३, कु. पुष्पा र. पनपालिया २, पुं. ना. पाटील ३, ग. ग. धुर्वे २, ना. वि. भांगे ३, अ. फ. गायकवाड ३, के. कृ. देशपांडे १, सु. ना. पराये ३, रू. रा. इंगळे ३, श्री. ना. पाटील ३, घ. रू. निलडे ३, सु. वा. राठोड ३, उ. तु. भटकर २, वा. वा. गवई ३, रा. ग. मान्डळे ३, मि. मि. राखोडे ३, कु. शांता द. फुसे ३, प्र. रा. वोरकर ३, कु. सरला मो. चोपडे ३, कु. विमल प. रांगोळे ३, अ. गो. चितळे ३, कु. याया कि. दर्यावाणी ३, कु. सिंधू म. नाईक २, कु. शालिनी म. नितनवरे २, बा. र. अग्रवाल ३, घू. ज. जैन ३, द. की. वागवानी ३, म. म. छावड्या ३, ई. घ. छाब्रिया ३, नं. गि. प्रोहित ३, ना. प्र. शर्मा ३, उ. ट. दामवानी ३, रा. शि. मिश्रा ३, मो. सि. सोनटक्के ३, पं. शि. चांदेकर ३, वि. तु. इंगोळे ३, कु. रा. गुहा २,

मराठी प्रवेश परीक्षा

वि. न. गोमाशे २, र. ग. कुटेमाटे ३, पां. वि. शेंदरे २, मी. न. गोमाशे २, वि. ल. बालपांडे १, कु. निर्मला दि खेरडे २, शे. बा. मावळे १, त्र्यं. गो. ढोके १, दे. गु. जावरकर १, कु. मीरा म. तोडकर २, ई. छां. चौधरी २, र. गा. पाली २, चं. त. लालवाणी ३, ग. क. गुहरे १, अ. द. ठाकूर २, नि. रा. भारुका २, र. खा भरद्वाज ३, फु. कि. गजभिये २, या ह. मेश्राम ३, ह. गो. गंगावानी २, मो. कि. चावला २, ह. बै. उ. मंघ्याना २, रा घ. अग्रवाल १, म. न. तरारे २, या. म. मोहतुरे २, उ. तु. चामट ३, वि. बा. लांजेवार २, रा. ज. आकरे २, म. सो. वैद्य ३, उ. मो. गहेरवार २, आ. टा. दलदले २, वा. ल. हुमने २, कु. कान्ता उ. चव्हाण २, कु. कुसुम शि. तंडन २, कु. विमल मं लांजेवार १, कु सुमित्रा उं. चव्हाण २, उ. मा. सुखदेव ३, पु मो मडावी २, दि. ज. हिवसे १, सं. न. कडव ३, वि. न. लांजेवार २, दा. मं. शेंडे ३, चु. गु. हिवसे २, भ. व. चकोले २, गफ्फार हुसेन शेख २, वा. म. अुके २, पु. रा. घाटोळे २, वि वि हिवसे २, स. ये. भोयरकर २, ल द वैद्य २, कु. प्रभा क. भोंतमागे २, क. रा. संसारे २, क मा. पंजाबी २, ज. सो पवार १, म अं कांगणे २, सु मु जाधव २, कु गंगु दा. दराडे २, कु लिला पा. सुर्यवंशी १, कु. विमल वा मोरे १, कु शकुन्तला खं. बनसोडे १, कु शकुन्तला प्र. पाठक १, अ. का. चिलमवार २, सु रा. कुंटावार ३, तु ना. मार्मीडपल्लीवार १, पुं जं. कलसारे ३, र हु सेख ३, ना. सी. चुदरी १, वि वि दिकोंडावार २, ना. तु. भेसारे २, गु ना मत्ते १, क. दे. गोवर्धन १, चं सां. चिलवे १, ना. ता. राऊत ३, दि. त्र्यं. यासुलवार २, आ वि. सोपनकार २, ह सटु गेडाम ३, पं ल पाल २, आ गि. देशमुख ३, पां. सो घोटेकार २, कि. वा शिंदे ३, अ व गुंडावार ३, श्री या. वाकरे ३, चं. नि. गुंडावार ३, ओ. म शर्मा २, सं द. गुंडावार ३, दि आ. जिचकार ३, आ. गो. भारमते ३, कु. शाहस्ता बेगम अब्दुल रहेमान ३, आ. शं. बुवनळे २, आ. आ. कागले २, म. बा. उपाध्ये २, मा न. पाटील १, आ. रा. पहणकुटे १ शां. बा. मिणेचे १, सु. रा. पट्टणकुडे २, वि. बं पहेकारी १, कु. रा. पट्टणकुडे ३, ना. द खुरपे २, आ. भ. दत्तवाडे २, बा जि. खुरपे २, पुं. आ. नरूटे ३, रा. र. मडीवाल २, म. क. मठपती १, व. द. घोरपडे २, अ. ता. पट्टणकुडे २, ता. न. खुरपे १, आ. ने. झटाणे २, मा. ने. हिरकुडे २, आ. रा. बुनवाळे १, स. वा. कागले २, ई. खे. चव्हाण २, आ. बा. बुवनाळे २, नि, बा. बंडगर १, कु. पद्मावती बा. पाटील १, कु. निर्मलाबाई रा. बवनाळे

१, गो. म. देशमुख २, र. का. ताढे ३, श्री, मा. सावळे २, कु. भारती ना. वंजारी ३, कु. पुष्पा द. घाके २, कु. कमल पुं. परमाळे ३, कु. चंद्रकला कि. उमाळे २, कु. चंद्रकला गो. व्यास २, लीला मा. कटारमल १, नजीरखान सिकंदरखान २, नसीम अहमद २, बबूल्ला अनसारी ३, सयीद अहमद २, म. हुसेन २, अब्दुल हबीब ३, नवाब अहमद २, म. स्नैल अनवर २, रहीमबेग २, मुशताक अहमद ३, शमशीरखां ३, वा. मा. रासेकार २, पी. न. दरस ३, खि. हो. थद्यानी २, ली. बो. लालवाणी २, ह. जे. जानी २, खे. ने. चंदनाणी १, कु. भगवंतीबाई रफ्तानी २, सी. चां. विराणे ३, काजी महमंद ३,

केंद्राधिकाऱ्यांना सूचना–

६४ सत्रातील आवेदन पत्रे केंद्र व्यवस्थापकामार्फत संघकार्यालयाकडे पाठविण्याची तारीख १० नोव्हेंबर ६३ ही आहे. यापूर्वी साहित्याचार्य प्रबंध परीक्षेची आवेदनपत्रे कार्यालया पोचणे आवश्यक आहे. यानंतर येणाऱ्या आवेदनपत्रांना १ रु. विलंब शुल्क भरावे लागेल.

दि. २९–९–६३ नागपुर

(प्रा) माणिक के. वैतुले
संचालक, परीक्षा समिति

हे मासिक एन्. जी. सराफ यांनी नागपुर टाइम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर-१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका